म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. ना.
दा. क्र. ४५६१.

BVBK-0404561

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. क. ...४५६१ नों. दि ............
वि. ...

# बुलबुलांची जोडी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार

सौ. कुमुदिनी रांगणेकर

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

किंमत २ रुपये

प्रकाशक :
गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिग्टन रोड, मुंबई ७

सर्व हक्क स्वाधीन

प्रथमावृत्ति : १५-७-५४

वेष्टन : केशव फडके

मुद्रक :
विष्णु पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

आमची बुलबुलांची जोडी
चि. माधव व चि. कलिका
ह्यांना
ही 'बुलबुलांची जोडी'
सप्रेम अर्पण –

–आई

BVBK-0404561

## 'बुलबुलांच्या जोडी'चें घर

'बाळपणींचा काळ सुखाचा' असें कवींनीं मोठ्या आवडीनें वर्णन केलें आहे तें उगीच नव्हे. बाळपणींचा हा काळ प्रत्येक माणसाला, विशेषतः आपलें बाळपण अगदीं दूर गेल्यानंतर तर, फारच सुखाचा वाटतो! तो काळ निःशंक, जबाबदारीरहित मौजेचा, आनंदाचा असल्यामुळें बाळपणींच्या आठवणीहि फार मौजेच्या वाटतात!

व म्हणून बुलबुल आणि चंदू ह्या बहीणभावांच्या बाळपणींचें हें चित्र माझ्या व माझ्या भोंवतींच्या मंडळींच्या बाळपणांतील आठवणींच्या सत्याला अधून-मधून कल्पनेची मुरड घालून मीं रंगविलें आहे. हेतु हा कीं, मध्यम स्थितींतील बालवाचकांना कांहींसा आपला व कांहींसा वेगळा वाटणारा एक जिवंत आदर्श त्यांच्यापुढें ठेवावा.

बुलबुल व चंदू निव्वळ सद्गुणांचे पुतळे मुळींच नव्हते. निव्वळ सद्गुणी मुलांचा आदर्श बालवाचकांना स्फटिकाच्या पुतळ्याप्रमाणें निर्जीव वाटेल!

आदर्श हा नेहमीं असा असावा कीं, त्यांत प्रत्येकाला आपलें थोडें तरी साम्य वाटलें पाहिजे व म्हणजेच आपल्यामध्यें नसलेलें जें त्या आदर्शांत आहे तें आपल्या अंगीं आणण्याची उमेद वाटेल! नि ह्याच दृष्टीनें मीं ही बहीण-भावांची जोडी रंगविली आहे. ह्या जोडीच्या हातून शक्य तों कमी चुका घडल्याचें मीं दाखविलें आहे, कारण त्यांच्या आईवडिलांची शिकवणच तशी छान होती!

बाळपणांत बाळजीवांच्या—आपल्या भावी पिढीच्या—अंगांतील गुणा-वगुणांचें बीजारोपण होत असतें. व म्हणून आपल्या मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासाकडे पालकांनीं अगदीं बाळपणापासून पूर्ण लक्ष देणें अत्यावश्यक आहे.

शंकरराव आणि उमाबाई तसें लक्ष देत असत. त्यांच्या 'बुलबुलांच्या जोडी'च्या ह्या घरट्यांत मुलांच्या वाढीला अत्यावश्यक असलेला मायेचा

मऊपणा, शिस्तीचा कठिणपणा, सात्त्विक व पौष्टिक अन्नाचा पुरवठा, जिभेला गोड वाटणाऱ्या पण शरीराला अपायकारक असणाऱ्या विकाऊ, शिळ्या अस्वच्छ वस्तू खाण्याची बंदी, खेळाच्या वेळीं खेळ व कामाच्या वेळीं काम ही विभागणी, स्वावलंबनाची आवड वगैरे अनेक उपयुक्त योजनांची शंकररावांनीं व उमाबाईनीं फार काळजीपूर्वक आंखणी केली होती.

वस्तुतः अशी आंखणी करावयाला त्यांना मुळींच पैसा खर्च करावा लागला नाहीं. मात्र आपल्या मुलांच्या हितासाठीं त्यांनीं फार झीज सोसली, आपल्या शरीराला व बुद्धीला फार झिजविलें हेंच खरें. प्रत्येक आईवडिलांना हें अत्यावश्यक कर्तव्य अशा किंवा ह्याहूनहि अधिक उत्तम तऱ्हेनें पार पाडणें मुळींच अशक्य नाहीं. फक्त त्याची उपयुक्तता त्यांना पटली पाहिजे.

तेव्हां ही छोटी कादंबरी मीं जेवढी मुलांसाठीं लिहिली आहे तेवढीच त्यांच्या पालकांसाठींहि लिहिलेली आहे.

माझ्यापेक्षां वयानें व अनुभवानें श्रेष्ठ असणाऱ्या पालकांना माझा हा लहान-तोंडीं मोठा घांस वाटणार नाहीं अशी माझी खात्री आहे. कारण प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगवेगळा असल्यामुळें एकच घटना प्रत्येकाला वेगवेगळी दिसूं शकते व म्हणून प्रत्येकानें आपापल्या अनुभवांची एकमेकांबरोबर देवघेव करणें इष्ट व भावी पिढीच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

मला जें दिसलें तें व तें जसें आदर्शरूप दिसावयास हवें होतें तसें ह्या दोन्हींची सांगड घालण्याचा मीं प्रयत्न केला आहे.

लहान मुलांच्या नैसर्गिक आवडीची योग्य जोपासना केल्यास त्यांच्या भावी आयुःक्रमाची व त्यांच्या ध्येयाची दिशा सांपडण्यास आपल्याला पुष्कळ मदत होऊं शकेल, हें बुलबुलच्या गणितप्रेमी बुद्धीचें व चंदूच्या शोधक वृत्तीचें त्यांच्या आईवडिलांनीं कसें चीज केलें त्यावरून कळून येईल.

भावी पिढीनें व पालकांनीं ही कादंबरी वाचून त्यांतील जें थोडेंफार ग्राह्य असेल तें ग्रहण केलें तर माझ्या श्रमांचा मोबदला मला खास मिळेल.

—**सौ. कुमुदिनी रांगणेकर** (प्रभावळकर)

१ जोडीची चौकडी !

८ त्रिकूट

१५ तीन ‘ पिल्लां ’ची दिवाळी !

२३ सणांत सदुपदेश !

३३ शाळा !

४३ दुरुस्तीचा शनिवार

५१ मुलांचें हळदकुंकु !

५८ ताईचा दादा

६५ बंडूच्या सहवासाचा छोटा परिणाम !

७१ मोठा परिणाम

७७ चंदू शाळकरी बनला !

८३ परी देवता !

९० मोहाची ‘ लस ’

९७ भीतीचा बळी

१०३ रोजनिशींतील नोंद व शेरे

११० रँग्लर बुलबुल व संशोधक चंदू



‘ चंदू—नऽहे, चंदा, दोघी बहिणी झालों हं आपण. ’

२८८६१ वा वी २१३१ ३।८।६१

# • १ •

## जोडीची चौकडी !

"ए चंदू, त्या शेजारच्या कमळीला बहीण आहे तशी मलासुद्धां एक बहीण असती तर किती छान झालं असतं! साऽरखी जंमत-जंमत केली असती आम्हीं! खूप खूप खेळलों असतों!" फुरंगटलेल्या स्वरांत बुलबुलनें काढलेला हा उद्गार चंदूला—तिच्या धाकट्या भावाला—फार टोंचला.

उतरलेल्या चर्येनें त्यानें विचारलें, "म्हणजे ताई, मी नाहीं का तुझ्या-बरोबर खेळायला? जंमत करायला?"

"तूं आहेस रे. पण तूं पडलास भाऊ—मुलगा! हें बघ चंदू, देवानं आपल्याला आणखी एक बहीण नि एक भाऊ दिला असता, म्हणजें छानशी बहिणींची जोडी नि भावांची जोडी झाली असती. तुला नाहीं असं वाटत?" बुलबुलनें असें स्पष्टीकरण करितांच चंदूची कळी जरा खुलली.

तो हंसून म्हणाला, "खरं गऽखरं, ताई, मला एक भाऊ हवा असं मला-सुद्धां वाटतं बघ कधीं कधीं! ताई ग, मला एक भाऊ नि तुला एक बहीण! वाः वाः! छान! ए, चल ना आपण आईला सांगू या कीं, आपल्याला आणखी एक बहीण नि एक भाऊ दे म्हणून—अं? येतेस?"

"उं हुं! मोठ्या माणसांच्या मदतीनं आपली आवड पुरविण्यात खरी जंमत नसते कांहीं! त्यापेक्षां असंच करूं या चंदू. अधूनमधून माझा फ्रॉक घालून तूं होत जा माझी बहीण—"

"शीः शीः! मी नाहीं जा तुझा फ्रॉक घालणार! मीं नाहीं ज्जा मुलगी होणार! मी पुरुष आहें म्हटलं, ताईसाहेब!"

"एहेरे सहा वर्षांचा पुरुष! अगदीं वेडा आहेस तूं चंदू. तुला जंमत कळतच्च नाहीं मुळीं. अरे, अधूनमधून तुझा शर्ट, पँट घालून मी मुलगा व्हायचं नि अधूनमधून माझा फ्रॉक घालून तूं मुलगी व्हायचं अशी केवढी गंमतीची कल्पना सुचली मला—पण तूं कसला रडया!"

आठ वर्षांच्या ताईनें असा मारा करितांच चंदूनें आपला पवित्रा चटकन् बदलला व उसन्या उल्हासानें तो म्हणाला, "अरेच्चा! अशी जंमत आहे होय? मग ठीक आहे. मला वाटलं कीं, मीच एकस्थानं मुलगी बनायचं! तूंहि कधींकधीं मुलगा होणार आहेस तेव्हां हरकत नाहीं. मग ताई, आतां जाऊन आणूं माझी शर्ट-पँट?"

"अंहं, आतां नको! चंदू, ही मूळ कल्पना माझी आहे, म्हटलं! तेव्हां आतां तूं बहीण हो. मग उद्यां मी भाऊ होईन, अं?"

बिचारा चंदू! बुलबुलच्या हरेक ध्वनीचा हुबेहुब प्रतिध्वनि काढण्यांत त्याची सहा वर्षांची हयात गेलेली! तिची आतांची सूचना त्याला फारशी पसंत नसली तरी तो तसें सांगणार कसें?

"हंऽ!" त्यानें मानेनेंच होकार दिला.

पण ताईसाहेबांना तेवढें पुरें झालें! तिनें झट्दिशीं आपला एक फुला-फुलांचा, गुलाबी, सुंदर फ्रॉक आणला.

चंदूनें आपला सदरा काढला व अवघडत तो फ्रॉक अंगांत चढविला. बुलबुलला गुडघ्याच्या किंचित् खालीं पोंचणारा तो फ्रॉक चंदूला साहजिकच पायघोळ झाला!

सुटसुटीत शर्ट नि लांडी चड्डी घालणाऱ्या मुलाला अशा अपरिचित वेषाचें बंधनच वाटणार! नि त्यांतच बुलबुनें आपले चापाचे डूल त्याच्या कानांत अडकविले, गतवर्षीच्या आपल्या 'बाटा' च्या सँडल्स त्याच्या पायांत घातल्या, कचकड्याच्या भरपूर सहा-सहा बांगड्या त्याच्या हातांत चढविल्या, गळ्यांत मण्यांची माळ घातली.

पण केस ? केसांची उणीव कशी भरून काढणार ?

बुलबुलच्या पाठीवर कशा सुंदर, हातभर लांबीच्या दोन वेण्या डौलांत रुळत होत्या. मग तिच्या ह्या 'बहिणी'ला एकादी टीचभर तरी वेणी नको कां ?

जरा वेळ विचार करून बुलबुल म्हणाली, "हो गडे, आपली मालुमावशी अंबाड्यांत गंगावन घालते तें मिळालं तर—पण छे ! ती रहाते दादरला ! मग काय करावं ?"

"ताई, मग—मग—पुनः केव्हांतरी होईन मी बहीण अं ?" चंदू चुळबुळत बोलला.

एवढ्यांत बुलबुलला कांहीं तरी युक्ति सुचली. भुंवया उडवीत ती म्हणाली, "हं–हं ! थांब जरा तूं इथेंच. आत्तां येतें मी."

नि बुलबुल धांवत आपल्या वडिलांच्या खोलींत गेली व त्यांची काळ्या पायमोजांची एक जोडी घेऊन पळत परत आली. नंतर त्या दोन्ही पाय-मोजांचीं पावलें चंदूच्या डोक्यावर ठेवून आपली गवती हॅट तिनें त्यावर बसविली. आपल्या किरमिजी रंगाच्या रिबनच्या त्या पाठीवर लोंबणाऱ्या मोजांवर चार बोटें जागा खालीं सुटी सोडून तिनें 'बो'च्या गांठी मारल्या व आपल्या हस्तकौशल्याच्या ह्या पुराव्याकडे ती कौतुकानें पहात राहिली.

चंदूला ह्या साऱ्या प्रकाराची लाज वाटत होती; पण थोडी गंमतहि वाटत होती.

बुलबुलनें त्याच्या खांद्यावर संभाळून हात ठेवीत म्हटलें, "चंदू–नव्हे, चंदा, दोघी बहिणी झालों हं आपण. चल, आईला दाखवूं या तिच्या दोन मुली !" आणि हातांत हात घालून तीं दोघें दिवाणखान्यांत उमाबाई—त्यांची आई—होत्या तिथें गेलीं.

शेजारच्या राधाकाकूंबरोबर बोलत बसल्या होत्या उमाबाई नि एवढ्यांत "आई, आई, ह्या बघ तुझ्या दोन मुली !" हे बुलबुलचे हंसऱ्या, उंच स्वरांतील शब्द त्यांच्या कानांवर पडले. आणि बोलणें थांबवून त्यांनीं पटकन् मुलांकडे वळून पाहिलें.

किती विचित्र दिसत होता चंदूचा वेष ! पुरुषासारखे कापलेले केस,

मुलालाच शोभणारे ठसठशीत नाक डोळे व मुद्रेवरील दांडगट आविर्भाव नि ह्या सर्वाला विशोभित दिसणारा तो फ्रॉक, हॅट, कानांतील डूल नि आतां बुलबुलनें चंदूच्या खांद्यावरून पुढें टाकलेली एक नि पाठीवर रुळणारी दुसरी अशा त्या दोन 'वेण्या'!

हा सारा थाट पाहून उमाबाईंना साहजिकच एकदम हंसूं आलें. राधाकाकूंनीं तर तोंडाला पदरच लावला.

पण उमाबाईंनीं लगेच हंसूं दाबीत विचारलें, "बुलबुल, हा काय आहे ग प्रकार?"

"अग, मला किनई, एक बहीण असावी अशी हौस वाटली नि म्हणून ही बहीण बनवलीय मीं! आई, चंदूलासुद्धां भाऊ हवासा वाटतो नि त्यासाठीं त्याचा शर्ट, पँट घालून मी मुलगा बनणार. कशी आहे गंमत?"

"गंमत? छाऽऽन!" आपला खालचा ओठ दांतांखालीं दाबून उमाबाईंनीं हंसूं परतवीत म्हटलें' वा! मजेशीर आहे ही कल्पना! म्हणजे बहीण-भावाच्या जोडीची चौकडी करणार तर तुम्ही?"

"हो गऽ हो! अगदीं आमच्या मनांतलं बोललीस तूं आई! जोडीची चौकडी! जोडीची चौकडी!" बुलबुल खूष होऊन उद्गारली.

इतक्या वेळांत चंदू कांहींच बोलला नव्हता. एवढेंच नव्हे तर त्याची मुद्रा भारीच अवघडल्यागत भासत होती! उमाबाईंच्या तें केव्हांच लक्षांत आलें होतें व म्हणून त्या आतां मुद्दाम त्याला उद्देशून म्हणाल्या, "आणि चंदू, माझे दोन मुलगे रे कधीं दाखविणार मला? आज कीं उद्यां?"

आईचा हा प्रश्न ऐकून चंदूची गढुळलेली चर्या चटकन् निवळली; व आपली आतांची मुलीची उसनी वेषभूषा विसरून नेहमींच्या दांडगेपणानें त्यानें टुण्‌दिशीं चार उड्या मारल्या व म्हटलें, "ए ताई, आत्तांच, आत्तांच हो ग तूं मुलगा!"

नि हें काय? अरेच्या! बुलबुलनें आपल्या मतें व्यवस्थित हॅटखालीं दडपलेल्या चंदूच्या 'वेण्या' त्याच्या ह्या धडपडीमुळें हॅट हालतांच खालीं घसरल्या. बिचारा चंदू त्या सांवरायला गेला तर त्या सबंधच त्याच्या हातांत आल्या.

तें दृश्य इतकें चमत्कारिक दिसलें कीं, स्तंभित झाल्यामुळें आतांपर्यंत स्तब्ध

राहिलेल्या फटकळ राधाकाकू पट्‌कन् म्हणाल्या, "इश्श! कसले हे एकेक चाळे तरी! उमाबाई, कांहींच्याबाहींच खेळ हे तुमच्या मुलांचे! चंदू तर शुद्ध—"

पण काकूंना त्यांचें वाक्य पुरें करूं न देतां उमाबाई घाईघाईनें मुलांना म्हणाल्या, "मुलांनों, आतां जा बरं तुम्ही तुमच्या खोलींत. थाणखी तास-भरा तुमचे बाबानं ऑफिसांतून येतील. मग फिरायला जायचं आपण. कपडे करून तयार व्हा हं तुम्ही. जा आतां, बाळांनों."

नि आईच्या सांगण्यानुसार तीं दोघे आंत जातांच उमाबाई राधाकाकूंना म्हणाल्या, "काकू, मघां मलाहि हंसूं आलं हो. पण तें मीं आंवरलं. कारण असं बघा, मुलांच्या कल्पना नि आपल्या कल्पना ह्यांत जमीनअस्मानाचं अंतर असतं! मुलांच्या कल्पना साध्या, सरळ नि म्हणून अव्यवहारी असतात! त्या समजून घेण्यासाठीं आपल्याला मुलांच्या पातळींतच वावरावं लागतं! मुलाबरोबर मूल व्हायला हवं आपण. म्हणजेच मुलांचा विश्वास संपादन करतां येतो नि मग आपोआपच त्यांना आपल्याबद्दल प्रेम नि आदर वाटूं लागतो! मुलांचा उत्साह, हुरूप दर वेळीं आपण वडील माणसांनीं मोडून काढला तर त्यांच्या मनाची वाढ खुरटून जाते!"

"म्हंजे? मुलांच्या वाटेल त्या चाळ्यांना फूस कां द्यायची आपण?" राधा-काकूंनीं स्तंभित होऊन प्रश्न केला.

"छे छे! वाटेल त्या चाळ्यांना नव्हे काकू. त्या बाबतींत आपलं ज्ञान तारतम्यानं वापरायला हवं आपण! मुलांच्या शरीराला किंवा मनाला अपायकारक असणाऱ्या खोड्यांना आपण आळा घालायला हवा! पण बुलबुलला बहीण हवी वाटली नि म्हणून तिनें चंदूलाच आपली बहीण बनवलं. आतां ही कल्पना हास्यास्पद नि आपल्या डोळ्यांना कशीशीच भासली, तरी खरं म्हणजे ती निष्पाप, बालिश आहे! तेव्हां त्याच भावनेनं आपण ती पहायला नको का?"

"उमाबाई, मीं नव्हता बाई कधीं ह्या बाबतींत इतका विचार केला."

"पण काकू, आतां मीं सांगितलं तें पटतंय का तुम्हांला?" उमाबाईनीं आपल्या गोड, आर्जवी स्वरांत हा प्रश्न करतांच काकू चट्‌कन् म्हणाल्या, "होय बरं. तुमचे विचार रास्त वाटले मला! अहो, अशिक्षित बाईमाणूस

मी. मला कसं हें असलं कांहीं कळणार ? पण खरंच, उमाबाई, तुम्ही कुठें शिकलांत हो हें ? पुस्तकांत ?”

“हो—थोडं पुस्तकांत वाचलं, थोडं व्यवहारानं शिकविलं. नि मुख्य म्हणजे आमच्या बुलबुलच्या जन्मापासून हे नि मी नेहमीं ह्या बाबतींत साधक-बाधक चर्चा करीत असतों ! त्याचं असं आहे काकू, बालमानसशास्त्रावरील पुस्तकांत पुष्कळसे नियम लिहिलेले असले तरी ते सर्वच नियम साऱ्याच मुलांना कसे लागू पडतील ? तेव्हां आपल्या मुलांची मनोवृत्ति आपण समजावून घेऊन त्याप्रमाणं त्यांचं एक स्वतंत्र बालमानसशास्त्र बनवावं लागतं नि मग त्याबरहुकूम मुलांशीं वागायचं !”

“बाई, बाई, बाई, बाई ! उमाबाई, अहो, नखाएवढालीं चिमुरडीं पोरं हीं, नि त्यांच्यासाठीं एवढ्या कशाला त्या उठाबशा ?”

“वाः ! असं कसं म्हणतां काकू ! हीं चिमुरडीं मुलं म्हणजे आपल्या राष्ट्राचे भावी आधारस्तंभ ! मग ते मुळापासून चांगले बळकट, सत्त्वपूर्ण, सत्त्वशील व्हावेत अशी काळजी नको का घ्यायला ? काकू, अहो, एकादं बारीकसं रोपटं आपण अंगणांत लावलं तरी त्याची किती काळजी घेतों आपण—पाणी कमी झालं तर मुळं सुकतील, जास्त झालं तर तीं कुसतील, हवा, ऊन, पाणी सारं योग्य प्रमाणांतच मिळायला हवं तरच त्या चिमुकल्या रोपट्याचा सुंदर, शोभिवंत वृक्ष होतो नि सर्वांना सावली देतो ! खरं ना ?”

नेहमींच्या पहाण्यांतलं हें उदाहरण राधाकाकूंना लगेच पटलें. व त्या मनापासून म्हणाल्या, “खरं हो उमाबाई. तुम्ही सांगतां तें अगदीं बरोबर आहे ! ह्यापुढं आमच्या वंड्याला त्याच्या खोड्यांबद्दल नुसतंच राग न भरतां मी त्याबद्दल नीट विचार करीन हो. अन् उमाबाई, त्याच्या खोड्यांचं मला आकलन झालं नाहीं एखाद्या वेळीं, तर तुमच्यापाशीं येईन हो मी विचारायला.”

“अवश्य या. माझ्या बुद्धीप्रमाणं मी तुम्हांला मदत करीन. अं ? निघालांत ? पुन्हां या हं सवड मिळाली कीं.” उमाबाई निरोप देत म्हणाल्या.

राधाकाकूंना पोंचवून घरांत जातांना उमाबाईनीं मुलांच्या खोलींत डोकावलें.

बुलबुल आपल्या बाहुलीला निजवीत होती व आपली सुटसुटीत सदरा-चड्डी घालून चंदू खुर्च्यांची आगगाडी वरून एकटाच क्रमाक्रमानें गार्ड, तिकीट-चेकर व पॅसेंजर होत मजेंत खेळत होता.

गंमत म्हणून चंदू बुलबुलची 'बहीण' बनला तरी त्यामुळें तो बायकी बनणें शक्य नाहीं ही आपली खात्री अस्थानी नव्हती, हें पटून उमाबाई स्वतःशींच किंचित् हंसल्या व स्वयंपाकघराकडे वळल्या.

· २ ·

# त्रि कू ट !

**त्या रात्रीं** जेवणें आटोपल्यावर शंकरराव व उमाबाई नेहमींप्रमाणें बाहेरील व्हरांड्यांत बसून संसारांतील बारीकसारीक गोष्टींबद्दल बोलत होतीं.

थोडा वेळ त्या उभयतांभोंवतीं बागडून आणि त्यांच्याशीं बडबडून मुलें निजावयाला आंत जातांच उमाबाईनीं जोडीची चौकडी करण्याची मुलांची कल्पना पतिराजांना सविस्तर सांगितली.

नि तो सारा देखावा परत डोळ्यांसमोर आल्यामुळें त्या हंसून म्हणाल्या, "चंदूच्या त्या 'वेण्या' कोसळल्या नि तो असा कांहीं मजेदार दिसलाय म्हणून सांगूं! मला भारी हंसूं येत होतं. पण त्याचा अहंकार दुखावेल, तो शरमिंधा होईल नि दोघांहि मुलांचा एकंदर विरस होईल म्हणून मीं कसं तरी हंसूं आवरलं."

अन् हें ऐकून शंकररावहि खूप हंसले. "वा:! तूं वर्णन असं उत्तम केलंस कीं कांहींहि न पहातां सगळं डोळ्यांसमोर दिसून मला हंसूं येतंय."

"होय ना! अन् बरं का, आपल्या शेजारच्या राधाकाकू इथं होत्या त्यावेळीं नि त्या बरीक एकदम बोलून घोटाळा करणार होत्या."

"अरेच्चा! मग काकूंच्या तोंडाला खीळ कशी घातलीस तूं?"

"मुलांना मीं लगेच घरांत पिटाळलं नि नंतर आम्हीं त्या वेळीं हंसणं, टीका करणं किती गैर झालं असतं, त्यामुळें मुलांच्या हुरुपावर कसं विरजण

पडलं असतं तें समजावून सांगितलं. नि आश्चर्य असं कीं, काकूंना तें पटलं!" अगदीं समाधानानं उमाबाई म्हणाल्या.

"अग, तुझ्यासारखा उत्तम गुरु भेटल्यावर काकूंना तें न पटलं तरच आश्चर्य!" शंकरराव विनोदानें उद्गारले.

त्यामुळें उमाबाई लाजल्या. पण ह्या विनोदाच्या पापुद्र्याखालीं पतिराजांच्या मनांत आपल्याविषयींचें प्रेम व कौतुक स्फुरत आहे हें ओळखल्यामुळें त्यांना आनंदहि वाटला व त्या मृदु स्वरांत म्हणाल्या, "वाः! मला जें कांहीं थोडं-बहुत येतंय् त्याचं श्रेय मला नाहीं कांहीं! माझी बुद्धि ती कितीशी? पण आपण नेहमीं मला सांगतां, शिकवतां, बालमानसशास्त्राची माहिती प्रत्येक मातेला असणं किती आवश्यक आहे हें आपण मला पटविलं व त्या विषयाची मला गोडी लावली म्हणून मला इतरांना त्या बाबतींत थोडंफार सांगतां येतं. म्हणून म्हणतें कीं, ह्याबद्दलचं सर्व श्रेय मला मिळणं योग्य नव्हे. सोन्याचा गुण असेल थोडा, पण सोनाराचाहि तितकाच, किंबहुना अधिकच आहे, म्हटलं!"

"वाः वाः! म्हणजे 'अहो रूपम् अहो ध्वनिः' सारखाच प्रकार केलास कीं हा!" शंकरराव हंसून म्हणाले.

त्यावर उमाबाईनीं विचारलें, "खरंच बाई, ही संस्कृत म्हण आपल्या तोंडून दोनचारदां ऐकलीय मीं. पण त्याचा अर्थ नाहीं मला ठाऊक. सांगा ना तो आतां."

"पाहिलंस? मी उगीच नाहीं तुला श्रेय देत. तुझ्या अंगीं जो बहुश्रुतपणा आलाय त्याला कारण तुझी ही जिज्ञासा! ऐकलेल्या प्रत्येक नव्या गोष्टीबद्दल तूं माहिती मिळवून घेतेस नि योग्य प्रसंगीं ती माहिती तूं मुलांना देतेस. नि म्हणूनच मी म्हणतों कीं, तूं आदर्श माता आहेस!"

"आतां पुरे ही स्तुति. त्या संस्कृत म्हणीचा अर्थ सांगणार ना?"

"सांगतों ना. पण ऐकलंस कां, ती म्हण नव्हे हं. सुभाषित म्हणतात त्याला. एखादं गंभीर किंवा विनोदी सत्य ज्यांत गुंफलेलं असतं त्याला सुभाषित म्हणतात. तसं सुभाषित आहे हें! नि त्याचा अर्थ असा आहे कीं, एकदां उंटाच्या घरीं लग्न निघालं होतं तेव्हां समारंभाच्या वेळीं गाण्यासाठीं त्यानें गाढवाला बोलावलं. त्यामुळें खूष होऊन गाढवानें घरीं

जातेवेळीं त्या उंट नवरदेवाला म्हटलं कीं, 'अहो रूपम्' म्हणजे 'वाहवा, काय साजरं रूप आहे हें तुझं!' त्यावर ह्या स्तुतीची परतफेड करण्याच्या हेतूनं उंटानें म्हटलं, 'अहो ध्वनिः,' म्हणजे 'वा! अन् तुझा आवाज तरी किती गोड आहे!' असा विनोद आहे हा! समजलं? नि मघां आपण अशीच परस्परांची स्तुति केली म्हणून मीं म्हटलं कीं, 'अहो रूपम् अहो ध्वनिः'-सारखाच प्रकार झाला हा!"

"अस्सं होय?" ह्या सुभाषिताचा अर्थ कळल्यामुळें गंमत वाटून हंसत उमाबाई म्हणाल्या, "पण उंटानं नि गाढवानं कांहीं मनापासून ही स्तुति केली नव्हती ना? निव्वळ औपचारिक व्यवहार होता तो! होय ना? मग आपणहि मघां माझी स्तुति केली ती अशीच खोटी खोटी होती असंच ना समजायचं?"

संस्कृत सुभाषिताचा अर्थ कळतांच तो लगेच आपल्यावर उलटविण्याची पत्नीची ही हुषारी सुस्वभावी, प्रेमळ शंकररावांना फार आवडली. मनापासून हंसत ते म्हणाले, "वाः वाः! खूप केलीस बुवा! ही तुझी अक्कलहुषारी, हें वाक्चातुर्य जर आपल्या चंदोबाच्या अंगांत उतरलं तर पट्टीचा वकील होईल तो! मार्मिक उलट प्रश्न विचारून प्रतिपक्षाच्या साक्षीदारांची अगदीं गाळण उडवील! पण पोरगा तसा हुषार निघेल तेव्हांची गोष्ट! सध्यां तरी बहिणीचा फ्रॉक घालण्यांत भूषण मानतोय तो!"

"अंहं, भूषण नाहीं हं! त्यानें अगदीं नाइलाजानं तो पोषाख केला होता हें त्याच्या त्या वेळच्या ओशाळ्या मुद्रेवरून दिसत होतं स्पष्ट! पण बुलबुल पडली त्याची ताई! तिच्या शब्दाबाहेर जाववेना त्याला! त्या दोघांची नेहमीं गट्टी असते, ती बुलबुलनें तुट्टी केली असती तर? हें भय होतं ना? नि म्हणून बापड्यानें चढवला तो साज अंगावर! बाकी, त्या दोघांना किनई, खरोखरच सजातीय सवंगड्याची अधूनमधून उणीव भासते हं! चंदूला भाऊ नि बुलबुलला बहीण हवीशी वाटते! नि म्हणून त्यांनीं आपल्या बालबुद्धीनं काढली ही तोड!"

"ती तोड गंमतीची खरीच! मलाहि त्याबद्दल कौतुक वाटलं! मी आतां सहज बोललों तें चंदूचा कमीपणा दाखवण्याचा हेतु नव्हता माझा!" शंकररावांनीं उत्तर दिलें.

"इश्श ! हें काय मला कळत नाहीं ?" उमाबाई म्हणल्या. व क्षणभर थांबून त्यांनीं म्हटलें, "पण खरंच, मीं म्हणतें, आपण आपल्या मुलांना शेजारच्या मुलांमध्यें फारसं मिसळूं देत नाहीं हें चुकीचं तर नाहींना ?"

"चुकीचं कसं बरं ? मध्यंतरीं त्या म्हाळसाकाकूंची सुंद्री नि वामन आपल्याकडे वारंवार येत असत तेव्हां वाईट दिसूं नये म्हणून आपणहि आपल्या मुलांना चारदोन वेळां त्यांच्याकडं धाडलं होतं. तर तेवढ्या सहवासांत नाकातोंडांत बोटं सारण्याच्या, केस व अंग उगीचच खराखरा खाजविण्याच्या, बोटांना थुंकी लावून पुस्तकाचीं पानं उलटण्याच्या, खातांना मिटक्या मारण्याच्या, तोंड उघडं टाकण्याच्या वगैरे किती तरी घाणेरड्या संवयी आपल्या मुलांनीं उचलल्या, नि मग त्या संवयी घालवितांना आपल्याला केवढा त्रास पडला ! तसाच तो श्रीधरपंतांचा बाबू ! त्या एवढ्याशा मुलाच्या तोंडीं कसल्या अचकटविचकट शिव्या आहेत ! मग अशा मुलांत बुलबुल-चंदूला कसं मिसळूं द्यायचं ?"

"होय बाई !—" एक श्वास सोडून उमाबाई म्हणाल्या, "अन् राधाकाकूंचा बंडू तरी काय ? एरवीं बरा मुलगा आहे तो ! पण काय वेडीवाकडी मस्ती ती त्याची ! तो बारा वर्षांचा आहे तरीसुद्धां रोज कोपर-ढोपर फोडून घेतोच तो ! मग त्याच्याबरोबर चंदूला कसं खेळायला धाडायचं ? दांडगाईचे नि धिंगामस्तीचेच खेळ त्याचे ! मग मुलांना शेजारीं पाठवायचं तरी कुणाकडे ?"

"तेंच म्हणतों मी ! नि ह्या कुसंगतीच्या भयानंच तर बुलबुलला अद्यापि शाळेंत न घालतां घरीं मास्तर ठेवून तिचं शिक्षण करतोंय आपण ! कारण आपल्या जवळपास अगदीं उत्तम अशी शाळाच नाहीं. तेव्हां तिला जरा समज आल्यावर ती कसल्याहि शाळेंत गेली म्हणजे बऱ्या वाईटांतला फरक कळूं लागल्यामुळं शाळेंतील मुलींच्या दिसलेल्या संवयी उचलण्याचं अंध अनुकरण ती करणार नाहीं !"

"ह्यासाठींच मला नेहमीं वाटतं कीं, छोट्या मुलांना शिकविण्यासाठीं मॉंटेसरी पद्धतीवर, अंमळ माफक फी घेणाऱ्या पुष्कळ शाळा निघायला हव्यात ! अशा शाळांतून मुलांकडे वैयक्तिक लक्ष पुरविलं जातं ! आपल्या

त्या मीनाताई नि पुष्पाताईनीं काढलेली असली शाळा पहायला गेलें होतें मी त्या दिवशीं. किती छान आहे ती! पण साडेतीन वर्षांच्या आंतल्या मुलांनाच प्रवेश मिळतो तिथं. त्यामुळं आपल्या मुलांना फायदा नाहीं घेतां येणार त्या शाळेचा! पण सरीस अडीच-तीन वर्षांवर मुलं असल्या शाळांत जाऊं लागलीं कीं त्यांना मुळापासूनच चांगली रीत लागेल नि मग त्यांच्यापासून इतर मुलांना उपद्रव होण्याचं भय रहाणार नाहीं! अन् लहान वयांतच मुलं शाळेंत जाऊं लागलीं कीं, त्यांचा एकलकोंडेपणा पुष्कळ कमी होईल नि मग घरांत जोडीला भावाला भाऊ नाहीं, किंवा बहिणीला बहीण नाहीं म्हणून होणारी त्यांची चुळबुळहि टळेल, नाहीं कां?"

"होय तर! नि आतां दिवाळीची सुटी संपली कीं बुलबुलला त्या विद्यामंदिरांत घालूया."

"त्यामुळं बुलबुलचा प्रश्न सुटेल खरा पण चंदूबद्दल काय करणार? घरांत असणारी बहीणहि शाळेला जाऊं लागली म्हणजे त्याला सध्यांसुद्धां भासत असलेली भावाची उणीव अधिकच भासूं लागेल कीं!"

"खरं आहे बुवा! ह्यावर कांहींतरी उपाय शोधायलाच हवा! बघूं या जरा विचार करून."

शंकरराव असें म्हणाले व खरोखरीच त्यांना एक सुंदर तोड सुचली.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ऑफिसांतून येतांच नेहमींप्रमाणें दारांत सामोऱ्या आलेल्या उमाबाईकडे हंसून पहात ते म्हणाले, "मुलांना जरा आतांच बाहेर बोलाव बरं."

उमाबाईनीं आपल्या मुलांना अशी शिस्त लावली होती कीं, दिवसभराच्या दगदगीनें श्रमून शंकरराव संध्याकाळीं घरीं आल्याबरोबर मुलांनीं तिथें यायचें नाहीं. वडील घरीं येतांच मुलांनीं त्यांच्या भोंवतीं दंगा करायचा, कांहीं तरी तक्रारी सांगून सतावयाचं, योग्य वेळीं आपलें चहा-खाणें झालें असूनहि वडिलांचें चहापान चाललें असतां त्यांच्याकडे खायला मागावयाचें ह्या गोष्टी उमाबाईंना गैर वाटत. त्यामुळें शंकरराव घरीं आल्यावर त्यांचें हात-तोंड धुणें व चहापान आटोपतांच मुलांना बाहेर हांक मारावयाची अशी त्यांची रीत होती.

पण आज शंकररावांनींच हा नियम बदलला. व ते गंमतीनें आपल्या मुलांचा तसा उल्लेख करीत त्यांनीं पुनः उमाबाईंना म्हटलें, "कुठं आहे आपली बुलबुलांची जोडी? बोलाव ना त्यांना बाहेर. बुलबुल, एऽ चंदू, इकडे या बघूं लौकर."

वडिलांच्या हांका ऐकतांच कांहींतरी 'जम्मत' आहे हें ओळखून मुलें धांवतच दिवाणखान्यांत आलीं. त्यांना पहातांच शंकरराव हंसून म्हणाले, "हं, आतां डोळे बंद करा बघूं एक मिनिट. खरेखरे बंद करायचे हं. नाहींतर आमची गंमत पळून जाईल."

वडिलांनीं असें सांगतांच मुलांनीं हंसत–खिदळत प्रामाणिकपणें डोळे मिटून घेतले. त्याबरोबर दाराबाहेर उभ्या असलेल्या आपल्या शिपायाच्या हातांतून शंकररावांनीं ती 'गंमत'—कुत्र्याचें एक गोजिरवाणें छोटें पिलूं—घेऊन दिवाणखान्यांत जमिनीवर ठेवली व 'सूऽऽटयोऽ' म्हटलें.

त्यासरशीं मुलांनीं डोळे उघडले—

अन् ओहो! डोळे उघडतांक्षणीं तें पिलूं दिसतांच चंदूनें आनंदानें टुण्टुण् उड्या मारल्या व बुलबुलनें खूष होऊन एका पायावर गिरकी घेतली.

तें पिलूं होतेंहि भारी सुंदर! पांढरा शुभ्र चेंडूच जणूं! डोक्यावर एक नि पाठीवर एक काळा ठिपका, लुकलुकणारे इवलेसे तपकिरी डोळे—क्षणभर त्या पिलानें वाकडी मान करून इकडेतिकडे पाहिलें व धांवायला सुरवात केली. त्याच्यामागून चंदू व बुलबुलहि आनंदानें ओरडत धांवत सुटलीं.

त्या गुळगुळीत फरशीवरून त्या पिलाचा पाय मध्येंच सरके-अर्धवट कोलांटी-खाई तें; पण पुनः नव्या दमानें पळावयास लागे. ससाच्या पोरासारखें दिसे तें पळतांना. कसलं लठ्ठ, गुबगुबीत होतं तरी तें!

"बाबा, आमचं—आपलं हें?" चंदूनें प्रश्न केला.

"होय तर! आपलं—खास तुमचं दोघांचं हं हें! आवडला का हा नवा खेळगडी?"

"होय तर! फारच आवडला!" मुलांनीं एक सुरांत उत्तर दिलें.

नि खरोखरच त्या तिघांचें लगेच छान त्रिकूट जमलें!

आनंदाचा व आश्चर्याचा पहिला भर ओसरतांच पिल्लाच्या नामकरणाचा प्रश्न निघाला.

बुलबुलनें घरमालकांच्या कुत्र्याचें नांव आठवून 'टॉमी' असें सुचविलें. शंकररावांनीं 'जॅक' व उमाबाईनीं 'टिपू' सुचविलें. पण कोणतेंच नांव सर्वानुमतें पास होईना.

एवढ्यांत चंदू ओरडून म्हणाला, "मला सुचलं रे ऽ सुचलं एक सुंदर नांव! सांगू मीं? चं-बु!"

"चंबु? उंः! हें कसलं सुंदर नांव?" बुलबुलनें नापसंती दर्शविली.

पण त्यामुळें जराहि नाराज न होतां चंदू म्हणाला, "ताई, त्या नांवांतली जंमत तुला कळली नाहीं म्हणून असं म्हणतेस तूं! अग, चंदूचा चं आणि बुलबुलचा बु मिळून चंबु! म्हणजे तुझा नि माझा! काय? आहे कीं नाहीं छान नांव?"

कमळाचा क, गरुडाचा ग वगैरे घेतलेले पाठ अद्यापि चंदूच्या डोक्यांत ताजे होते नि ह्या ज्ञानाला आपल्या कल्पनेची जोड देऊन त्यानें काढलेलें तें नांव सर्वांनाच मग भारी आवडलें. व चंदूच्या स्वतंत्र बुद्धिमत्तेची ही चुणूक पाहून त्याच्या आईवडिलांना फार समाधान वाटलें!

उत्तम वकील न झाला तरी आपला मुलगा उत्तम शोधक होईल का अशी कौतुकपूर्ण कल्पना शंकररावांच्या मनांत चमकून गेली!

× × ×

## • ३ •

# तीन 'पिल्लां'ची दिवाळी !

**आजकाल** चंदूची किंवा बुलबुलची वेळ जात नाहीं अशी तक्रार मुलींच ऐकूं येत नसे. चंबु म्हणजे अगदीं मनपसंत खेळगडी मिळाला होता मुलांना.

परंतु मुलें सारा वेळ मात्र त्याच्या भोंवतींच रमत नसत. उमाबाईंनीं त्यांना लहानपणापासून अभ्यासाच्या वेळीं अभ्यास, खेळाच्या वेळीं खेळ, झोंपेच्या वेळीं झोंप अशी वेळेची विभागणी करण्याचें बाळकडू दिलें होतें ! त्याचप्रमाणें 'लौकर निजे, लौकर उठे, तया ज्ञान आरोग्य, संपत्ति लाभे.' हें सुभाषितहि त्यांच्या मनांवर ठसविलें होतें !

नि त्यामुळें नियमितपणें सकाळीं सहा वाजतां उठून मुलें ठराविक वेळीं अंघोळ, अभ्यास, जेवण वगैरे उरकीत व खेळाच्या वेळीं चंबूबरोबर खेळत.

बुलबुल चंबूला 'शेकहँड' करावयला व 'बेग' म्हटल्यावर पाठच्या दोन पायावर उभें रहावयाला शिकवी नि चेंडू टाकतांच धांवत जाऊन तो आणण्याची तालीम त्याला चंदू शिकवी.

नि संध्याकाळीं आईबाबांबरोबर पायीं फिरायला जातांना चंबूलाहि तीं बरोबर नेत.

चंबु जात्याच फार खेळकर नि तेवढाच खोडकर होता. मुलें खेळत बसलीं कीं बुलबुलची बोळकीं, बाहुली नाहींतर चंदूचा चेंडू तो हटकून पळवी. आणि मुलांचे बूट व चप्पल ह्यांवर त्याचा भारी डोळा असे. हळूच एकादा बूट

घेऊन कोपऱ्यांत बसावयाचें व दांतांनीं तो कुरतडण्यांत रमावयाचें—कचित् त्या बुटावर घाण करायची व एकाद्या वेळीं त्यांत डोकें खुपसून झोंपून जावयाचें ह्या चंबूच्या आवडत्या लीला होत्या.

चंबूनें कसलीहि खोडी केली तरी चंदू त्याचें नेहमीं कौतुकच करी. तो व बुलबुल जरी एकाच आईवडिलांच्या शिस्तींत वाढलीं होतीं तरी चंदू लहान असल्यामुळें त्याला शिस्तीचें महत्त्व तितकें कळत नव्हतें. पण बुलबुल जरा जाणती होती त्यामुळें चंबूच्या अवखळपणाबद्दल ती कधीं कधीं त्याला रागें भरे. त्याचे पुढले दोन पाय धरून ती त्याला उभा करी व त्याचें तोंड वर उचलून व आपल्या नजरेला नजर देणें त्याला भाग पाडून ती त्याला उपदेशाचे लांबलचक 'डोज्' पाजीत असे. तिनें कधीं त्याला मारलें मात्र नाहीं.

अगदीं मोठ्या माणसाचा आव आणून ती त्याला म्हणे, "चंबू, आपण अशी बुटांत घाण केली तर लोक आपल्याला हंसणार नाहींत काय? आपल्याला घाणेरडं माणूस म्हणून चिडविणार नाहींत काय? अं? मग असं कां बरं करतोस तूं? आतां नाहीं ना पुन्हां करणार? शहाणा आहे आमचा चंबुनाना!" व आतां पुनः असा वेडेपणा न करण्याचें वचन त्याच्याकडून घेण्यासाठीं त्याचा उजवा पुढला पंजा ती आपल्या हातावर मारून घेई व मग समाधानाचा सुस्कारा सोडी.

तिचें हें संभाषण जसें तिच्या आईबाबांना ऐकावयाला गंमतीचें वाटे तसेंच चंबूनें कसलीहि गैरखोडी केली तरी त्याला उराशीं कवटाळणाऱ्या चंदूचें त्याच्यावरील प्रेम पहावयास त्यांना आनंद वाटे!

चंबू घरीं आल्याच्या दुसऱ्या दिवशीं बुलबुलनें जेवतांना शंकररावांना विचारलें, "खरंच, बाबा, आपल्या चंबूचं वय किती हो?"

"सव्वा महिन्याचा आहे तो. आज सोळा तारीख ना? मग गेल्या महिन्याच्या—पण तसं कशाला? बुलबुल, तुला हें उदाहरणच घालतों मी. बघ, काल सप्टेंबर महिन्याची पंधरा तारीख नि काल चंबु वारानें पांच आठवड्यांचा झाला. तेव्हां ह्यावरून तो कोणत्या तारखेला जन्मला ती तारीख तूं काढ. अं? कळलं?"

झालं! कसं तरी जेवण आटोपून बुलबुल आपल्या खोलींत गेली व पाटी पेन्सिल घेऊन हें उदाहरण सोडविण्यास बसली.

—काल १५ तारीख, वार बुधवार नि काल चंबूला पांच आठवडे झाले. नि त्याच्या आदल्या बुधवारीं—म्हणजे पंधरांतून सात गेले. उरले आठ—आठ तारखेला त्याला चार आठवडे झाले. नि त्याच्याहि आदल्या बुधवारीं, एक तारखेला चंबू तीन आठवड्यांचा होता. आतां १ तारखेला बुधवार म्हणजे ३० तारखेला मंगळवार नि तिसांतून सात गेले कीं उरतात तेवीस. म्हणजे २४ तारखेला चंबूला दोन आठवडे झाले. मग त्याच्या आदल्या बुधवारीं म्हणजे २४ मधून सात गेले कीं उरतात १७ तेव्हां १७ तारखेला चंबु १ आठवड्याचा व त्यांतून सात जातांच उरले दहा म्हणजे दहा तारखेला चंबूराव जन्मले !

चला ! आतां हें वरचं गिचमिड पुसून उत्तर लिहूं या हं ! चंबूराव १० तारखेला जन्मले अन् महिना ?—हा सप्टेंबर नाहीं का ? मग त्याच्या आधींचा —लगेच बुलबुलनें पटकन् जानेवारी, फेब्रुआरी, मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर अशीं महिन्यांचीं नांवें उच्चारण्यास सुरुवात केली व सप्टेंबर-पर्यंत येतांच त्याच्या आधींचा ऑगस्ट हें ध्यानांत ठेवून तिनें सुवाच्य अक्षरांत पाटीवर लिहिलें: 'चंबूराव ऑगस्ट महिन्याच्या १० तारखेला जन्मले.'

व शंकररावांना दाखविण्यासाठीं ती पाटी घेऊन धांवत निघाली. आपलेंहि जेवण घाईघाईनें आटोपून मघांपासून बुलबुलच्या ह्या आंकडेमोडीकडे व पुटपुटण्याकडे कौतुकादरानें पहात बसलेला चंदूसुद्धां तिच्या पाठोपाठ धांवला.

शंकरराव म्हणाले, "हं, काय आलं उत्तर ? ऑगस्टची दहा तारीख ! पण काय ग बुलबुल, ऑगस्ट महिन्याला तारखा किती असतात ? मुठीच्या खळग्या, उंचवट्यावरून महिन्याच्या तारखा मोजायला आईनं शिकविलेलं लक्षांत आहे ना तुझ्या ?"

"आहे कीं ! ज्या महिन्याचं नांव उंचवट्यावर येतं त्या महिन्याच्या ३१ तारखा नि ज्याचं नांव खळग्यांत येतं त्याच्या ३० तारखा ! फेब्रुवारीला मात्र २८ तारखा !"

"बरोबर !"

"मग मोजूं आतां ?" बुलबुलनें विचारलें. व डाव्या हाताची मूठ बंद करून क्रमानें उंचवट्यावर, खळग्यावर असें बोट ठेवीत ती मोजूं लागली. "जानेवारी

उंचवट्यावर, फेब्रुवारी खळग्यांत, मार्च उंचवट्यावर, एप्रिल खळग्यांत, जुलै उंचवट्यावर, अन् पुनः ऑगस्ट उंचवट्यावर—अरेच्च्या! म्हणजे, बाबा, ऑगस्टच्या ३१ तारखा तर? अन् मीं धरल्या ३० म्हणजे माझं उत्तर चुकलंय् तर! थांबा हं बाबा. तुम्ही नका सांगू. मी आत्तां दुरुस्त करतें."

बुलबुलची ही चिकाटी खरोखर कौतुकास्पद होती! तिनें परत पाटी घेतली व आंकडेमोड करावयास प्रारंभ केला.

"अं–अं–हो ऽ! पहिल्या तारखेला चंब्याला तीन आठवडे झाले इथवर बरोबर आहे माझं! पहिल्या तारखेला बुधवार म्हणजे ३१ ला मंगळवार नि ३१ तून सात गेल्यावर उरले २४. तेव्हां २४ ला मंगळवार अर्थात् २५ ला बुधवार अन् २५ ला चंबूला दोन आठवडे झाले. मग २५ मधून गेले सात, उरले १८. अठरा तारखेला एक आठवडा. तेव्हां अठरांतून सात गेले अन् उरले अकरा. म्हणजे ऑगस्टच्या ११ तारखेला, बुधवारीं हे रावसाहेब जन्मले! आतां बरोबर आहे ना बाबा?"

"होय बाळ, अगदीं बरोबर! चंदू, बघ तुझी ताई कशी गणितांत हुषार आहे ती! बघ कशी तिनें आपल्या चंबुरावाची जन्मतारीख शोधून काढली ती!"

चंदूला तर ताईचें कौतुक होतेंच! पण त्या वेळीं त्याच्या डोक्यांत एक वेगळीच कल्पना घोळत असल्यामुळें वडिलांचे हे शब्द ऐकून तो किंचित् हंसला व म्हणाला, "बाबा, एवढासा तर आहे चंबु! नि त्याला राव काय लावतां? मी जसा चंदू शंकरराव कालेलकर तसा तो चंबु शंकरराव कालेलकर, होय ना बाबा?"

चंदूचे हे शब्द ऐकतांच शंकरराव, उमाबाई व बुलबुल खूप हंसलीं. व मग चंदूला त्यामुळें वाईट वाटेल असें मनांत येऊन उमाबाई म्हणाल्या, "चंदू, अरे, असं कुत्र्याला आडनांव लावतं का कुणी?"

"मग त्याचं नांव कसं ठेवलंय् आपण? अन् मग आडनांव कां नको?" चंदूनें चटकन् असा प्रतिप्रश्न करितांच उमाबाई जरा गोंधळल्या व त्यांनीं शंकररावांना म्हटलें, "खरंच, चंदूचं म्हणणं चुकीचं नाहीं! आपल्याला काय वाटतं?"

"मला बुवा अगदीं बरोबर वाटतं! बस्स बस! आजपासून चंबूचं नांव

चंबु शंकरराव कालेलकर! चंदू, कुत्र्यांना जर बोलतां आलं असतं ना तर त्यांनीं तुझ्या ह्या कल्पनेबद्दल आभार मानले असते तुझे! कुत्र्याला आपला नातलग—नव्हे भाऊच—बनवलंस ना तूं?"

अन् जणूं शंकररावांचें हें बोलणें कळून चंबु बारीक-बारीक ओरडला. त्याबरोबर त्याला जवळ घेऊन चंदू लाडिक, बोबड्या आवाजांत म्हणाला, "चंबु, माजे आभाल मानतोस होय तूं? अल्ले लबाडा!"

एवढ्यांत बुलबुल उंच स्वरांत उद्गारली, "अय्या! बाबा, आई, चंबूचा जन्म ११ ऑगस्टला नि माझा ११ जुलैला! किती मज्जा! चंदू, अरे, चंबूची नि माझी जन्मतारीख एक आहे!"

हें ऐकतांक्षणीं चंदूचें तोंड गोरेंमोरें झालें. चंबूची व ताईची जन्मतारीख एक आहे म्हणजे त्यामुळें ताईचा चंबूवर अधिक हक्क प्रस्थापित होतो कीं काय अशी शंका त्याच्या बालमनाला व्याकूळ करूं लागली. हातांत चुळबुळणाऱ्या चंबूला त्यानें खालीं ठेवलें नि एकदम त्याला कांहीं तरी आठवलें. फुगऱ्या स्वरांत तो म्हणाला, "पण ताईसाहेब, चंबूचं नांव मीं शोधून काढलंय म्हटलं!"

आपण चंबूची जन्मतारीख शोधून काढली ह्या विजयानंदामुळे स्वतःवरच खूप असलेल्या बुलबुलनें ह्यावर उदार मनानें म्हटलें, "अरे वेड्या, चंबु आपला दोघांचाहि आहे. अं? तूं नि मी नि चंबु!"

"हो ऽ हो! तूं नि मी नि चंबु! आईचीं आपण तिघं पिल्लं! होय ना आई? तुझीं तीन पिल्लं ना आम्ही?—ताई शंकरराव कालेलकर, चंदू शंकरराव कालेलकर नि चंबु शंकरराव कालेलकर!" चंदू आनंदानें म्हणाला. त्यानें उमाबाईंना क्षणापूर्वी प्रश्न विचारला होता तरी आईकडून उत्तर मिळा-यला हवें अशी कांहीं अपेक्षा नव्हती त्याची! कारण, त्याच्या मतें एका सत्य गोष्टीचा निव्वळ उच्चार होता तो! त्याला आईच्या कबुलीचा दुजोरा मिळाला तरी वाह्वा नि नाहीं मिळाला तरी वाह्वा! तीं तिघें उमाबाईंचीं तीन पिल्लें होतीं हें ठरलेलेंच होतें. अगदीं त्रिकालाबाधित सत्य होतें तें! अन् शिवाय तेवढ्यांत बुलबुलनें चंबूला उचलून त्याच्या हातांत दिलें व तिनें त्याच्या गळ्याभोंवतीं आपला हात टाकला व तें त्रिकूट—तीन पिल्लें समाधान-पूर्ण अंतःकरणानें आपल्या 'खास' खोलींत गेलीं.

दर वर्षी धनत्रयोदशीला सकाळीं शंकरराव आपल्या मुलांना दोन-दोन रुपये देत व त्यांना दारूसामान विकत आणण्याची परवानगी देत. वास्तविक, परदेशी दारूसामानांत मुलांनीं शक्य तों पैसा उडवूं नये असें त्यांचें स्वतःचें मत होतें. परंतु बालवयात मुलांना हौस असते व प्रत्येक गोष्टीचा साधक बाधक विचार करण्याची शक्ति त्यांच्या अंगांत आलेली नसते तेव्हां निव्वळ वडीलकीच्या जोरावर मुलांची ही हौस आपण मारून टाकावी हें त्यांना योग्य वाटत नव्हतें. मुलांची बुद्धि तितकी प्रगल्भ झाल्यावर त्यांनीं आपल्या स्वतंत्र विचारान्वयें ह्या बाबतींत काय तें मत बनवावें अशा विचाराचे ते होते.

म्हणजे प्रत्येक बाबतींत ते आपल्या अज्ञ मुलांना भलतेंच स्वातंत्र्य देत असत असें मात्र नाहीं हो! कपडे, बूट अशा ज्या वैयक्तिक हौशीच्या बाबी असत त्यांमध्यें अमुक एका सीमेपर्यंत ते मुलांना स्वातंत्र्य देत. प्रत्येक माणसानें देशी कपडे वापरून स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन द्यावें, हें शंकररावांना पटत असल्यामुळें मुलांकरितां कापड वगैरे घेण्यासाठीं ते स्वदेशी मार्केटांतच त्यांना नेत असत व अमुक किंमतीपर्यंत कापड घ्यावयाचें हें मुलांना समजावून कापडाचा रंग, नमुना वगैरे गोष्टी ते ज्याच्या त्याच्यावर सोंपवीत. अशा रीतीनें वडिलांचा मान राहून मुलांच्या आवडीलाहि वाव मिळाल्यामुळें सर्वच खूष असत!

यंदा परदेशी दारूसामान विकत घ्यावयाचें नाहीं असें मुलांनीं आपण होऊनच ठरविलेलें ऐकून शंकररावांना फार आनंद वाटला. व त्यांच्या ह्या शहाणपणाबद्दल बक्षीस म्हणून त्यांनीं यंदासुद्धां धनत्रयोदशीदिवशीं मुलांना दोन-दोन रुपये दिले.

परंतु नरकचतुर्दशी दिवशीं पहाटेपासून फटाकड्यांचा कडकडाट कानीं येऊं लागल्यावर चंदूचा वेत डळमळूं लागला. तो हळूच बुलबुलला म्हणाला, ‘ ताई ग, पुढल्या वर्षी आपण अजिबात फटाकड्या घेऊंया नको, पण यंदा थोड्या तरी आणूंया. त्याशिवाय दिवाळीशी वाटतच नाहीं. ताई, तूं सांग ना बाबांना!”

म्हणजे चंदूला आपल्या वडिलांची अतिशय वा अकारण भीति वाटत होती असा ह्याचा अर्थ नाहीं. शंकरराव मुलांकडे अगदीं खेळमेळीनें वागत. ते मुलांना

अ. पं. सं. हाके, ग्रंथालय शाखा

कारणावांचून कधींच रागवत नसत नि अशा वेळींसुद्धां शक्यतों सौम्य शब्दांत घडलेल्या चुकीबद्दल मुलांना समजावणी देत. ऑफिसांत काम फार पडलें अगर कांहीं अपमान झाला तर त्याचा राग घरीं पत्नीवर व मुलांवर काढणारे कांहीं बहादुर पुरुष असतात. पण शंकरराव असे बहादुर नव्हते !

त्यामुळें फटाकड्या घेण्याबद्दल आपण परवानगी विचारल्यास बाबा रागावतील असें भय चंदूला वाटलें नाहीं. पण फटाकड्या न घेण्याची बढाई मारलेली आतां मागें घ्यायची ह्याची जरा लाज वाटत होती त्याला ! नि जात्या जरा लाजवटच होता तो. व बाबांकडे व्यवस्थित बोलण्याची कला त्याच्या मतें त्याच्यापेक्षां त्याच्या ताईला जास्त साधत असे व म्हणून त्यानें तिलाच आपला वकील केलें.

बुलबुलला तरी काय ? हेंच हवें होतें. फटाक्यांची उणीव तिलाहि भासत होतीच. त्यामुळें चंदूचे शब्द तिला फार रुचले. ती धांवत शंकररावांकडे गेली— अर्थात् चंदूहि तिच्या मागून गेलाच —व म्हणाली, "बाबा, हा चंदू पहा काय म्हणतोय् तें-अं-अं-फटाकड्याशिवाय म्हणे दिवाळीशी वाटतच नाहीं ह्या वेड्याला ! अन् बाबा, खरंच कीं, आपल्या चंबुनानाची ही पहिलीच दिवाळी ! मग थोड्या तरी फटाकड्या आणून नको का ती साजरी करायला ? तेव्हां बाबा, यंदा आम्ही एकेक रुपयाच्या फटाकड्या आणूं काय ? अं ?"

बुलबुलची ही एकंदर मखलाशी ऐकून शंकररावांना खूप हंसूं आलें. ते उद्गारले, "अस्सं ? म्हणजे परदेशी वस्तूंवर तुम्हीं पायरीपायरीनें बहिष्कार घालणार तर ! गेल्या वर्षी दोन-दोन रुपयांच्या, यंदा एकेक रुपयाच्या नि पुढल्या वर्षी मुळींच नाहीं, असंच ना ? हरकत नाहीं."

शंकररावांच्या बोलण्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ न कळला तरी चंदूला त्यांतील मुख्य सार कळलें व तो लगेच म्हणाला, "हो, बाबा ! पुढल्या वर्षी आम्ही मुळींच आणणार नाहीं."

नि फटाकड्या आणण्याची परवानगी मुलांनीं मिळविली. पण ती मिळविण्या-साठीं मदत म्हणून बुलबुलनें चंबूचें नांव घुसडलें असलें तरी वस्तुतः त्या बेट्याला फटाकड्यांची मुळींच आवड नव्हती ! एवढेंच नव्हे तर तो फटाकड्यांच्या आवाजांना फार भ्यायचा. शेजारीं पाजारीं फटाकड्या जोरांत

वाजल्या तरी स्वारी अगदीं आंतल्या खोलींत पलंगाच्या किंवा कपाटाच्याखालीं लपून बसे. पण गंमत अशी कीं, चंदू संध्याकाळीं गॅलरींत फटाकड्या लाऊं लागतांच आपली भीति विसरून चंब्रु धांवत तिकडे आला व ओरडून ओरडून चंदूला घरांत येण्याच्या खुणा करूं लागला. नि चंदू हें ऐकत नाहीं असें पहातांच त्याचा सदरा तोंडांत धरून तो त्याला आंत ओढूं लागला.

फटाकड्या उडविण्यानें चंदूला अपाय होईल तेव्हां त्यापासून त्याला परावृत्त करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें त्या मुक्या जीवाला वाटत होतें व म्हणून आपल्या कर्तव्याची जाणीव बाळगण्यासाठीं त्यानें स्वतःला वाटणारी भीति प्रयत्नपूर्वक दूर सारली.

चंबूची आपल्यावरील ही माया पाहून चंदूला एवढा आनंद झाला कीं, स्वतः फटाकड्या लावण्यांत त्याला मौज वाटत असूनहि त्यानें विश्राम गड्याला खालीं वाडींत त्या लावण्यास सांगितलें. व चंबूला उचलून घेऊन त्याला थोपटीत व न भिण्याविषयीं समजावीत चंदूनें गॅलरींतून पहाण्यांतच समाधान मानलें.

अन् चंदूच्या मानानें हा मोठाच त्याग होता. पण गृहशिक्षण योग्य प्रकारें मिळत असलें म्हणजे लहान मुलांच्या मनांतसुद्धां त्यागाची भावना अशी आपोआप रुजत असते.

× × ×

# ·४·

## सणांत सदुपदेश !

'सणांत सोयरा' म्हणून आपल्यांत एक म्हण आहे. म्हणजे एकाद्या सोयऱ्याला—नातलगाला—जेवावयाला बोलवायचें असलें म्हणजे आपण कांहीं तरी गोड पक्वान्न करतों. तेव्हां अनायासें सणाच्या दिवशीं जेवायला बोलावलें कीं सणानिमित्त गोड-धोड केलेलें असतें त्यांतच भागतें!

उमाबाईंनीं ह्या म्हणीचें 'सणांत सदुपदेश' असें नामांतर केलें होतें. व प्रत्येक सणादिवशीं मुलांना त्या त्या सणाबद्दल सोप्या शब्दांत त्या नीट माहिती सांगत व त्यावरून योग्य उपदेश करीत.

आतां दिवाळी जवळ येतांच त्यांनीं हाच प्रघात सुरू केला.

दिवाळीच्या आधीं वीस दिवस दसरा येतो. व त्या दिवशीं त्यांनीं मुलांना त्या सणाबद्दल थोडी माहिती दिली.

त्या म्हणाल्या, "मुलांनों, आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्राला प्रारंभ झालाय्. हा अष्टभुजादेवीचा उत्सव असतो! महिषासुर ह्या नांवाचा एक राक्षस होता नि तो फार उन्मत्त झाला होता म्हणून ब्रह्मा, विष्णु व महेश ह्या तिघांनीं आपल्या शक्तीच्या अंशापासून एक देवी उत्पन्न केली—"

एवढ्यांत मध्येंच बुलबुलनें विचारलें, "आई, मागें तूं आम्हांला दत्त-जयंतीची गोष्ट सांगितली होतीस ना? त्यांत दत्तात्रेय हा ब्रह्मा, विष्णु नि महेश ह्या तिघांच्या अंशांनीं उत्पन्न झाला असं म्हटलं होतंस तूं!"

"होय. बरोबरच आहे तें! पण त्याचं काय?"

"मग आई, दर वेळीं ब्रह्मा, विष्णु व महेश ह्या तिघांबद्दल बोलतांना ब्रह्मा, विष्णु, महेश असं म्हणण्याऐवजीं दत्तात्रेय म्हटलं तर काय हरकत आहे? एका नांवांत भागेल!"

बुलबुलची ही कल्पना ऐकून उमाबाईच काय, पण बाजूला बसलेले शंकररावसुद्धां थक्क झाले. बुलबुलच्या बुद्धीची ही पारख झालीच, परंतु आतां उमाबाई तिला काय उत्तर देतात हें कळण्याची शंकररावांना उत्सुकता वाटली. त्यामुळें एकप्रकारें उमाबाईच्या बुद्धीचीहि पारख होणार होती! नि ती उत्तमच झाली!

क्षणभर विचार करून उमाबाई म्हणाल्या, "बुलबुल, असं बघ, दत्तात्रेय म्हणजे त्या तीन देवांचा अंश होता. खरं ना? पूर्ण स्वरूपांत तीन देव नव्हते ते. तेव्हां ज्या ठिकाणीं त्या देवांच्या पूर्ण स्वरूपाची–पूर्ण शक्तीची आवश्यकता आहे तिथें ब्रह्मा, विष्णु, महेश असंच नको कां म्हणायला? कळल ना आतां? बाकी, तुझा प्रश्न फार चतुराईचा होता. नाहीं कां?"

शेवटला प्रश्न उमाबाईंनीं शंकररावांना विचारला. व ते हंसून उत्तरले, "बुलबुलचा प्रश्नहि चतुराईचा होता नि तूं उत्तरहि फार चतुराईचं दिलंस!"

हें ऐकून त्या मायलेकींना फार आनंद वाटला!

कर्त्या पुरुषानें घरांतील इतर माणसांच्या—पत्नीच्या, मुलांच्या, आश्रितांच्या किंवा नोकराच्या—अंगांतील गुणांचें कौतुक केलें कीं त्यांना असा आनंद होत असतो! नि त्या कर्त्या पुरुषाबद्दलचा आदर व प्रेम त्यामुळें दुणावतें.

शंकरराव घरांत नेहमीं असे समजूतदारपणानें वागत नि म्हणून त्यांच्या माणसांना शंकररावांबद्दल प्रेमादर तर वाटेच, पण त्यांचा मोठाच आधार वाटे उमाबाईंना नि मुलांना! आपल्या हरेक लहान-मोठ्या समस्या निःशंक मनानें तीं तिघें त्यांना सांगत व शंकरराव हंसत, बोलत त्यांच्या त्या समस्या सोडवीत.

प्रसन्न मुद्रेनें उमाबाई मुलांना पुढें सांगूं लागल्या, "तर ही जी देवी उत्पन्न केली तिनें त्या महिषासुर राक्षसाला मारलं. नि म्हणून तिला महिषासुरमर्दिनी म्हणतात. बुलबुल, मुलींनीं व स्त्रियांनीं ह्या गोष्टीपासून असा बोध घ्यायचा कीं, स्त्रियांनीं मनांत आणलं, तेवढा प्रयत्न केला तर त्याहि चांगल्या

बलवान् होऊं शकतील !–नंतर आश्विन शुद्ध दशमीला आपण दसरा म्हणतों. त्या दिवशीं आपट्याची किंवा शमीचीं पानं एकमेकांना सोनं म्हणून देण्याचा प्रघात पडलाय् ! फार पूर्वी रघु नांवाचा राजा होऊन गेला. तो फार उदार होता. एकदां त्यानें आपल्याकडील सर्व संपत्ति प्रजेला देऊन टाकली नि त्याच वेळीं कौत्स नांवाचा एक ब्राह्मण त्याच्याकडे बऱ्याचशा मोहरा मागायला गेला. कारण त्याला आपल्या गुरूला दक्षिणा म्हणून त्या द्यायच्या होत्या. पण रघूकडे तर सध्यां मुळींच पैसा नव्हता. तेव्हां त्यानें कौत्साला तीन दिवस थांबायला सांगितलं व त्यानें इंद्राकडून मोहरा मिळवण्यासाठीं त्याच्यावर स्वारी करण्याचा बेत केला. इंद्राला हें कळलं व त्यानें कुबेराला आज्ञा केली कीं, रघूच्या राज्याच्या बाहेर असलेल्या शमीच्या व आपट्याच्या झाडांवर मोहोरांचा पाऊस पाड. नि म्हणून अजुनि शमीच्या व आपट्याच्या पानांना सोनं मानतात दसऱ्याच्या दिवशीं !"

"पण आई, त्यापेक्षां खरं सोनंच एकमेकांना दिलं तर ?" बुलबुलनें प्रश्न केला.

"त्यामुळें बऱ्यापेक्षां वाईटच अधिक होईल !" शंकरराव म्हणाले, "कारण मग मीं तुला अधिक दिलं होतं नि तूं मला कमी दिलंस वगैरे तंटे सुरू होतील ! खरं ना ?"

"अन् मुलांनों, दसरा हा मोठा सण आहे, बरं का ! कोणतीहि महत्त्वाची गोष्ट करण्यासाठीं आपण मुहूर्त पहातों ना ? तसे चांगल्यांतले चांगले साडेतीन मुहूर्त मानतों आपण. बुलबुल, साडेतीन म्हणजे किती ग ?" उमाबाईंनीं विचारलें.

"तीन आणि अर्धा—" बुलबुलनें चट्कन् उत्तर दिलें.

"बरोबर ! चैत्रांतला गुढी पाडवा, दसरा नि दिवाळींतला पाडवा हे तीन व वैशाखांतली अक्षतृतीया हा अर्धा मिळून साडेतीन मुहूर्त होतात ! तेव्हां दसरा हा अगदीं उत्तम मुहूर्त आहे !"

"आई, मग माझी मुंज पुढल्या वर्षी करायची ती दसऱ्यालाच करूं या ! अं ?" चंदूनें म्हटलें.

"छेः छेः ! दसऱ्याच्या मुहूर्तावर मुंज नाहीं कुणी करीत. मुंजीचे मुहूर्त

वेगळे असतात! हा दसऱ्याचा मुहूर्त पूर्वीच्या काळीं शत्रूवर स्वारी करायला निघण्यासाठीं उत्तम मानीत राजे लोक! नि ह्याला सीमोल्लंघन म्हणतात!" उमाबाईनीं सांगितलें.

नि शंकरराव त्यावर हंसून उद्गारले, "बाकी, चंदूच्या म्हणण्याप्रमाणें चातुर्मासांत दसऱ्याच्या मुहूर्तावर त्याची मुंज केली तर तेंहि वेगळया अर्थानें रूढीचं सीमोल्लंघनच होईल! नाहीं कां?"

उमाबाईहि ह्यावर हंसल्या. मुलांना अर्थातच ह्याचा बोध झाला नाहीं. पण त्यांना हें पूर्ण ठाऊक होतें कीं, आईबाबा आपल्यासमक्ष एकमेकांशीं जें बोलतात तें सर्व आपल्याला समजण्यालायक आहे असें मानायचें नाहीं व म्हणून तीं दोघें बोलत असतांना मध्यें प्रश्नहि विचारावयाचे नाहींत! जें आपल्याला सांगण्यासारखें असेल तें आई-बाबा आपल्याला सांगणारच!

नि आईबाबांवर असा विश्वास असल्यामुळें बुलबुल व चंदू फाजील चौकस बनलीं नव्हतीं!

दसऱ्याचा सण पार पडला! संध्याकाळीं बुलबुलनें व चंदूनें सर्वांना, चंबूला सुद्धां सोनं दिलं व त्याच्याकडून घेतलं!

रात्रीं उमाबाई म्हणाल्या, "मुलांनो, आणखी वीस दिवसांनीं दिवाळी, बरं का! मराठ्यांच्या, कुळवाड्यांच्या बायका जात्यावर दळतांना गीत म्हणतात कीं, 'दसऱ्यापासूनि दिवाळी वीस दिशीं! माझ्या रे बंधूराया, कधीं भाऊबीजेला येशीं.' तेव्हां आतां दिवाळी नि भाऊबीज जवळ आली बरं का!"

ज्या त्या सणाची माहिती व महत्त्व त्या त्या दिवशीं सांगत असत उमाबाई. पण आतां मुलें, विशेषतः बुलबुल जरा जाणती आहे; तेव्हां ह्या माहितीचा तीं प्रत्यक्ष उपयोग करूं शकतील, असें वाटून दसरा उलटल्यावर १०।१२ दिवसांनीं—रविवार होता तो—दुपारीं उमाबाई मुलांना म्हणाल्या, "मुलांनो, दिवाळी ८।१० दिवसांवर आली. मी किनई, आज तुम्हांला दिवाळींतल्या ४।५ सणांच्या गोष्टी सांगतें हं."

गोष्टी म्हटल्यावर मुलें खूषच झालीं. पण शंकररावांनींहि हातांतील वर्तमानपत्र बाजूला टाकलें व ते म्हणाले, "मीहि ऐकणार बरं का."

हें ऐकून मुलें आनंदानें हंसलीं व चंदूनें म्हटलें, "आई, चंबूला आणूं जाऊं ?"

"चंबूला ?" बुलबुल तटकन् उद्गारली, "त्याला काय रे कळणार ? नि मग तुझंहि लक्ष लागणार नाहीं नि सगळ्यांनाच त्रास वाटेल त्यामुळें."

बुलबुलला नवीन माहिती ऐकण्याची, ज्ञान मिळविण्याची फार आवड होती. त्यामुळें तिनें असे म्हणावें हें साहजिक होतें व रास्तहि होतें.

पण चंदूला गोष्टींची आवड होती तरी त्याहून अधिक त्याला चंबू आवडत होता. त्यामुळें त्याचें तोंड उतरलें.

त्याबरोबर उमाबाई म्हणाल्या, "चंदू, ताई म्हणाली तें खोटं नाहीं बरं. मी मुद्दाम तुम्हांला माहिती सांगणार नि तूं तिथें लक्ष दिलं नाहींस तर मला नाहीं का वाईट वाटणार ? तेव्हां तूं असं कर. आतां लक्ष देऊन सगळं ऐक नि मग तूं तें चंबूला सांग म्हणजे झालं ! अं ?"

ही तडजोड चंबूला मानवली तो हळूच हंसला.

उमाबाईनीं सांगायला सुरुवात केली, "आजपासून आठ दिवसांनीं, म्हणजे येत्या बुधवारीं धनत्रयोदशी येते. त्या दिवसापासून दिवाळीच्या मौजेला, उत्सवाला प्रारंभ झाला असं मानतों आपण !"

"होय. त्या दिवशीं बाबा आम्हांला फटाकड्या आणण्यासाठीं पैसे देतात ! होय ना बाबा ?" चंदूनें नेमकी मुद्द्याची आठवण केली.

"हो." शंकररावांऐवजीं आपणच होकार देत उमाबाई म्हणाल्या, "अन् त्या दिवसापासून पांच दिवसांपर्यंत पणत्या, विजेच्या दिव्यांचीं तोरणं लावून रोषणाई करतात. पूर्वी म्हणे, एका देवानें असं सांगितलं होतं कीं, ह्या पांच दिवसांत जे अशी रोषणाई करतील त्यांना पुष्कळ आयुष्य मिळेल ! पण असे पांच दिवस खूपसे दिवे लाऊन आयुष्य वाढेल का ? लोकांना उत्तेजन यावं, त्यांनीं आपल्या प्रकृतीची वर्षभर काळजी घ्यावी म्हणून लावलेलं मधाचं बोट आहे हें नुसतं ! नि ह्याचा अर्थ असा कीं, धनत्रयोदशीला धनाची पूजा करतात. आरोग्य हें मोठ्यांतलं मोठं धन आहे. तेव्हां वर्षभर ह्या आरोग्यधनाची नीट जोपासना करून गेल्या धनत्रयोदशीपेक्षां ह्या धनत्रयोदशीला आपली उंची, वजन, सुदृढता ह्यांत किती वाढ झालीय हें पहाणं हीच ह्या धनाची पूजा !"

"मग आई, ह्या धनत्रयोदशीला आमची उंची, वजन वगैरे घेऊन लिहून ठेवायला हवं तर?" आपल्या व्यवस्थित स्वभावानुसार बुलबुल म्हणाली.

"होय ना. बाबा करतील तें सगळं! मुलांनों, धनत्रयोदशीच्या दुसऱ्या दिवशीं नरकचतुर्दशी येते. ह्या सणाची गोष्ट अशी सांगतात कीं, श्रीकृष्णाची बायको सत्यभामा—"

"आई, पारिजातकाच्या फुलांसाठीं रुक्मिणीबरोबर भांडली तीच ना ही सत्यभामा?" बुलबुलनें प्रश्न केला.

"होय, बाळ. अन् ह्या सत्यभामेनें नरकासुर नांवाच्या राक्षसाला ठार मारलं! नरकासुर म्हणजे मूर्तिमंत नरक—घाण! अन् अशी घाण दूर करण्याचं काम बायका करतात. दिवाळीं जवळ आली कीं, सारं घर झाडून स्वच्छ करायचं, कुठेंहि केरकचरा पडूं द्यायचा नाहीं."

"मग आई, उद्यांपासून आम्ही स्वच्छ करायला लागूं का आपलं घर?" चंदूनें उत्साहानें विचारलें.

उमाबाईंना हेंच हवें होतें. त्या म्हणाल्या, "होऽ! करा ना. अन् चंदू, नुसती दिवाळीच्या वेळीं तात्पुरती साफसफाई करण्यापेक्षां वर्षभर आपलं घर आपण स्वच्छ, झळझळीत ठेवलं तर तें दिसेलहि किती छान! नि मघां मीं आरोग्याबद्दल सांगितलं ना? तें आरोग्य अशा स्वच्छतेमुळें आणखीच वाढेल! अन् मुलांनों, तुम्हीं हें लक्षांत ठेवा कीं, कोणतंहि काम आपलं आपण करण्यांत मुळींच कमीपणा नसतो!"

"चंदू, आजपासून आपण आपली खोली अगदीं व्यवस्थित ठेवण्याचा नियम करूं या रे. कपडे, पुस्तकं, खेळ सारं जिथल्या तिथें ठेवायचं! अं?" बुलबुल म्हणाली. वस्तुतः तिच्या सर्व वस्तु ठाकठीक असत. पण चंदूला वाईट वाटूं नये नि काम करावयाला त्याला हुरूप यावा म्हणून तिनें स्वतःचेंहि नांव घेतलें व ह्या तिच्या समजुतदारपणाचा योग्य उपयोग झाला.

चंदूनें लगेच म्हटलें, "हो, हो! कबूल! पण ताई, तूं मला आठवण करत जा ग. तुझ्या वस्तू कशा जागच्या जागीं असतात नि माझ्याच कां अशा इकडे तिकडे पडतात?"

"त्यांना पाय फुटत असतील रे चंदू!—" शंकरराव हंसून म्हणाले, "तुझा

बँडवाला बँड वाजवायला जात असेल कुठें तरी, आगीचा बंब आग विझवायला धांवत असेल, मोटर चौपाटीवर पळत असेल. खरं ना?"

ह्यावर सगळींच हंसलीं.

"हं. मग दुसऱ्या दिवशीं लक्ष्मीपूजन असतं! व्यापारी लोक आपल्या हिशेबाच्या वह्या, माल वगैरेची पूजा करतात, मित्रमंडळींला बोलावतात—"

"हो, हो! गेल्या वर्षीं आपल्या त्या कुळकर्णीकाकांच्या दुकानांत मी गेलों होतों कीं बाबांबरोबर." चंदू बोलला. त्याची स्मरणशक्ति तशी छान होती.

"होय. पण मुलांनों, असं पहा, प्रत्येक जुन्या गोष्टीला बदलत्या काळानुसार वेगळं नि योग्य रूप द्यावं लागतं! माझी आई, म्हणजे तुमची आजी, नऊवारी लुगडींच नेसते. मी अधूनमधून पांचवारी पातळं वापरतें. एक तर आजकाल तशी पद्धतहि आहे नि तीं पातळं स्वस्त मिळतात नि त्यांत नमुनेहि भरपूर असतात! पण आपल्या सणावारीं किंवा घरीं कामकाज करतांना मी नऊवारी लुगडींच नेसते. पण बुलबुल साडी नेसणारी झाली कीं ती फक्त पांचवारी साड्याच नेसेल. तोंवर नऊवारीचं महत्त्व आणखी, आणखी कमी होणार! ह्याला काळाचा महिमा म्हणतात! काल नवी वाटणारी गोष्ट आज थोडी कमी नवी व उद्यांला पार जुनी होते!"

"वाः! किती छान प्रस्तावना केलीस!" शंकरराव कौतुकानें उद्गारले. त्यावर त्यांच्याकडे कृतज्ञतेनें पहात उमाबाई म्हणाल्या, "तर बरं का, मुलांनो, प्रत्येक चालीरीतीच्या बाबतींतहि असंच होत असतं! आतां लोक शिकलेत, त्यांना फक्त नवंच हवं वाटतं! त्यामुळें जुन्या गोष्टी त्यांना टाकाऊ वाटतात!"

"पण आई, जुनं तें सोनं असं म्हणणं चुकीचं आहे असं सांगितलं होतंस तूं मला त्या दिवशीं." बुलबुलनें आठवण केली.

"होय, बुलबुल! जेव्हां तेव्हां जुनं तें सोनं मानणं चूकच! पण म्हणजे जुनं तेवढं टाकाऊ असा नाहीं त्याचा अर्थ! तर जुन्यांतलं चांगलं नि नव्यांतलं चांगलं असेल तें निवडून त्याचा मेळ घालायचा हा खरा शहाणपणा! पण आजकाल काय होतं, जुनं तें टाकाऊ असं समजतात नवे लोक! खरं म्हणजे त्या जुन्या चालीरीतींच्या मुळाशीं काय होतं तें शोधून त्याला आजच्या काळाला योग्य असं रूप द्यायला हवं! आतां हेंच पहा!

अमावास्येला लक्ष्मीपूजन करीत जुनीं माणसं! अमावस्येला अगदीं काळोख असतो! त्या दिवशीं चंद्र अजिबात उगवत नाहीं! नि म्हणून दिव्यांचा खूप लखलखाट करीत. आतांच्या माणसांना हें खुळ्यासारखं वाटतं. तेव्हां त्या ऐवजीं त्यांनीं अज्ञानरूपी अंधार दूर करण्यासाठीं ज्ञानाचा लखलखाट करावा! अडाणी, अशिक्षित लोकांना लिहावाचायला शिकवावं. त्यामुळें किती उत्तम लक्ष्मीपूजन साजरं होईल! पण हल्लीं हेंहि नाहीं नि तेंहि नाहीं असं होतंय!"

"आई, येत्या लक्ष्मीपूजनापासून मी आपल्या विश्राम गड्याला लिहा-वाचायला शिकवीन हं रोज." बुलबुलचे स्वयंस्फूर्तीचे हे बोल ऐकून उमा-बाईंना धन्य वाटलें. त्यांनीं केलेले श्रम सार्थकीं लागले.

"अन् आई, मी कुणाला शिकवूं?" चंदूनें प्रश्न केला.

"तूंहि त्याला शिकव कीं. तुझ्याइतकंसुद्धां येत नाहीं त्याला बिचाऱ्याला."

"होय ना! रेशन कार्डावर आंगठा देतो तो. सही नाहीं त्याला करतां येत. हो ऽ हो ऽ! आई ग, पुढल्या लक्ष्मीपूजनापर्यंत विश्रामला मीं—अं—चंदू नि मी सही करायला शिकवू हं! बरं का रे चंदू?"

चंदूला अर्थातच ताईची ही कल्पना आवडली नि शंकररावांना व उमाबाईंना ती फारच आवडली!

नि साहजिक नाहीं का तें? चार पावलें धावून आपण बस पकडली तरी आपल्याला किती कृतार्थ वाटतें! मग गेलीं आठ वर्षें मुलांच्या संगोपनासाठीं रात्रंदिवस खाल्लेल्या खस्ता सार्थकीं लागल्या, ह्याची अशी साक्ष पटल्यावेळीं त्या आईवडिलांना किती कृतार्थ वाटत असेल!

"शाबास, मुलांनों, अशींच शहाणीं व्हा बरं. आतां पुढें ऐकतां ना? हं! मग लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशीं येतो बळीपाडवा!"

"साडेतीन मुहूर्तांतला एक मुहूर्त!" आपल्या ज्ञानाला वारंवार 'पॉलिश' देण्याच्या संवयीला अनुसरून बुलबुल उद्गारली.

तिच्या त्या उद्गाराचें उमाबाईंनीं हंसून कौतुक केलें. कारण बुलबुलच्या ह्या संवयीमुळें ऐकलेली माहिती तिच्या स्मरणांत ठाम बसते हें ओळखलें होतें उमाबाईंनीं व म्हणून तिच्या ह्या संवयीला त्या नेहमीं उत्तेजन देत.

"बरोबर !" त्या पुढें म्हणाल्या, "मुलांनों, बळी ह्या नांवाचा एक राजा होऊन गेला. तो फार गर्विष्ठ बनला होता नि त्यामुळें आपल्या प्रजेला तो भारी त्रास देत असे. नि म्हणून विष्णूनें वामनावतार घेतला व ब्राह्मण मुलगा बनून तो बळींकडे गेला व त्याच्याकडे त्यानें तीन पावलें जमीन मागितली. छोटा दिसला तरी देवच होता ना वामन ? त्याच्या एका पावलानें स्वर्ग व्यापला, दुसऱ्या पाउलानें सबंध पृथ्वी मापली—आतां तिसरं पाऊल कुठं ठेवायचं ? पण बळीनें माघार घेतली नाहीं. त्यानें आपल्या डोक्यावर तिसरं पाऊल ठेवण्यास वामनाला सांगितलं. व त्याप्रमाणें ठेवून वामनानें त्याला पाताळांत घालविलं ! परंतु त्यानें आपलं वचन पूर्ण केलं म्हणून त्या दिवसाला बळीपाडवा असं नांव देऊन लोक तुझी आठवण करतील असं वामनानें त्याला सांगितलं. नि त्याप्रमाणें अद्यापि आपण ही आठवण काढतों."

"पण आई, 'देवानं असं रूप बदलून यायचं नि बळींचा पराभव करायचा हें चुकीचं नाहीं का ?" बुलबुलनें विचारपूर्वक म्हटलें.

"पण बुलबुल, कांहीं प्रसंगीं जशास तसं ह्या न्यायानें वागावं लागतं ! बळी वाईट रीतीनें वागत होता, पण तो अतिशय प्रबळ झाला असल्यामुळें त्याच्याशीं असं वागण्यावांचून गत्यंतर नव्हतं ! नि मुलांनों, ह्या गोष्टीपासून तुम्ही बोध घ्या कीं फार गर्व कधीं करूं नये. 'गर्वाचं घर खालीं !' कळलं ना बुलबुल ? तुम्ही हुषार असलां, सुंदर असलां, गुणी असलां तरी तुमच्या अंगांतील ह्या गुणांचं लोकं कौतुक करूं द्या. तुम्हीच आपलं आपण तुणतुणं नका वाजवूं. त्यांत गंमत नाहीं !"

उमाबाईंचे हे शब्द ऐकून बुलबुल जरा चमकली. तशी अद्यापि तिला 'ग'ची बाधा झाली नव्हती, पण ती कधींच होऊं द्यायची नाहीं असा तिनें स्वतःशीं निश्चय केला.

एवढ्यांत उमाबाई म्हणाल्या, "हं, आतां आली भाऊबीज ! खास बहीण-भावांचा—बुलबुल-चंदूचा सण ! भाऊबीजेदिवशीं भाऊ दूर गांवीं असला तरी बहिणीच्या घरीं येतो. तेव्हां एकत्र रहाणाऱ्या तुमच्यासारख्या बहीणभावांनीं तर भाऊबीज फारच प्रेमानें साजरी करायला हवी. अन् पुढलं वर्षभर एकमेकाशीं

न भांडण्याचं, एकमेकाला वेडंवाकडं न बोलण्याचं वचन त्या दिवशीं बहीण-भावांनीं ओवाळणीच्या निमित्तानें एकमेकांना द्यायला हवं!"

आपला उजवा हात पुढें करीत चंदू उत्साहानें बुलबुलला म्हणाला, "ताई ग, हें घे मी तुला आतांच वचन देतों कीं, मी तुझ्याशीं मुळीं भांडणार नाहीं किंवा—"

इतक्यांत बुलबुल हंसून उद्गारली, "अरे वेड्या, भाऊबीजेदिवशीं वचन द्यायचं असतं. आज काय देतोस?"

"असं नाहीं कांहीं, बुलबुल. चांगली गोष्ट केव्हांहि करावी. चंदू एवढ्या प्रेमानें, उत्साहानें तुला वचन देतोय तर तें घे नि तूंहि त्याला वचन दे प्रेमानें वागण्याचं. भाऊबीजेपर्यंत हें वचन पाळा नि मग भाऊबीजेदिवशीं पुनः असं वचन द्या एकमेकाला—म्हणजे झालं!"

आईचे हे शब्द ऐकतांच चंदूला फार बरें वाटलें. त्याची आपल्या ताईवर फार भक्ति होती. आपल्या वागण्या, बोलण्याला तिनें नांव ठेवलीं कीं चंदूला स्वतःची भारी लाज वाटे! आतां असेंच होणार होतें. इतक्यांत आईनें त्याची बाजू सांवरली. पण ताईला तें पटलें का?

ओहो ऽ! पटलें, पटलें! ताईनें हंसून आपला हात पुढें केला. नि त्या छोट्या बहीणभावांनीं प्रेमानें वागण्याचें,—न भांडण्याचें एकमेकाला वचन दिलें.

आईच्या धाकामुळें मुलांनीं सरळ वागण्याचें कबूल करणें वेगळें नि आईचा गोड शब्दांतील उपदेश पटल्यामुळें मुलांनीं तसें वागण्याचें स्वयंस्फूर्तीनें कबूल करणें वेगळें!

आईवडिलांच्या शिकवणीला मुलांनीं नकळत दिलेलें मोठ्यांतलें मोठें प्रशस्तिपत्र तें! मग तसलें प्रशस्तिपत्र आतां असें मिळतांच उमाबाईंनां व शंकररावांना धन्य वाटल्यास नवल काय?

× × ×

२९९६७
आ-भा
२७३१
३।२।६१

# • ५ •

# शा ळा !

अन् यंदाची दिवाळी अनेक कारणांनीं मुलांना नेहमींपेक्षां अधिक आनंदाची, मौजेची वाटली !

त्यांनीं दुसऱ्या दिवसापासून खरोखरीच घरांत साफसफाई करायला सुरुवात केली. त्यांच्या मानानें त्यांना तेवढे श्रम भरपूर झाल्यामुळें चांगली भूक लागूं लागली, जेवण आवडीनें जाऊं लागलें व प्रकृति उत्तम राहिल्यानें मुलें फार आनंदी बनलीं. त्यांतच हा आनंद वाढविण्यासाठीं चंबू मिळाला होता. नि मग त्याचें निमित्त पुढें करून मुलांनीं एकेक रुपयाच्या फटाकड्याहि आणल्या होत्या.

मिळून सर्व आनंदीआनंद झाला !

मुलांनीं फटाकड्या आणल्या तेव्हां एक गंमत झाली. चंदूनें शंकररावांना म्हटलें, "बाबा, फटाकड्या उडविणंच वाईट कीं परदेशी असल्यामुळें त्या विकत घेणं वाईट ? अं ?"

"त्या परदेशी असल्यामुळें त्या विकत घेतल्यानें आपला पैसा परदेशाला मिळतो ! नि म्हणून त्या विकत घेणं वाईट ! कारण आपल्या देशी उद्योग-धंद्याला त्यामुळें कांहीं फायदा होत नसतो !"

"मग बाबा, मी मोठा झालों कीं मी फटाकड्या बनवायला शिकेन. म्हणजे परदेशाला आपला पैसा न देतां मुलांना फटाकड्या खूप उडवितां येतील ! नाहीं का ?" चंदूची ही महत्त्वाकांक्षा ऐकून शंकररावांना हंसूं आलें.

पण त्यांनीं तें बाहेर दिसूं दिलें नाहीं. आतांपर्यंत चंदूनें अशा अनेक महत्त्वाकांक्षा बोलून दाखविल्या होत्या.

रस्त्यावरील गॅसच्या बत्त्या पेटविणारा माणूस दिसला कीं, मोठेपणीं तसा बत्तीवाला व्हावें असें वाटे चंदूला! त्याचप्रमाणें बसचा कंडक्टर, एंजिन-ड्रायव्हर, विमान चालविणारा, बोटीचा कप्तान वगैरे अनेक भूमिकांचें आकर्षण वाटल्यामुळें त्याची महत्त्वाकांक्षा अशा कितीतरी भराऱ्या मारून आली होती. त्यामुळें त्याच्या महत्त्वाकांक्षेपेक्षां नवीन नवीन महत्त्वाकांक्षा सुचविणाऱ्या त्याच्या कल्पकतेचें शंकररावांना कौतुक वाटे व ह्या कल्पकतेचें पुढें योग्य चीज व्हावें अशी इच्छा ते मनापासून करीत. असो!

अशा अनेक गमतींत दिवाळीचा सण संपला. दिवाळीची सुटी संपून शाळा उघडल्या व आदर्श बालिकाश्रम ही शाळा उघडतांच पहिल्याच दिवशीं बुलबुलला घरीं शिकवायला येणारे दाणी मास्तर तिला घेऊन शाळेंत गेले.

उमाबाईंना फार पडसें आलें असल्यामुळें त्या व ऑफिसांत जरा विशेष काम असल्यामुळें शंकरराव बुलबुलबरोबर शाळेंत जाऊं शकले नाहींत.

शाळेंत जाण्यापूर्वी बुलबुलनें देवाला, आईवडिलांना व मास्तरांना नमस्कार केला. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' हें वचन शंकररावांनीं व उमाबाईंनीं मुलांच्या मनावर चांगलें ठसविलें होतें!

"आई," बुलबुलनें म्हटलें, "शाळेंत माझं बुलबुल हें नांव लावायचं नाहीं असं तूं सांगितलं आहेस ना मास्तरांना?"

"होय हं. शाळेंत तुझं पाळण्यांतलं वृन्दा हेंच नांव लावणार बरं!"

"मग हरकत नाहीं! नाहीं तर शाळेंतल्या मुली माझं बुलबुल हें नांव ऐकून हंसायच्या आणि! त्या सुंद्रीची मामेबहीण बेळगांवहून तिच्याकडे आलीय ना, ती काल आपल्याकडे आली होती तेव्हां माझं नांव ऐकून किती हंसली म्हणतेस! नि मला साऽरखी चिडवूं लागली कीं, बोल रे बुलबुला, गोड, गोड बोल!" बुलबुल फुंग होऊन म्हणाली.

त्यावर उमाबाईंनीं समजुतीच्या स्वरांत म्हटलें, " मग त्यांत काय झालं? तूं सांगायचंस तिला कीं, आपल्याला बुलबुलासारखं गोड बोलायला येणं ही

आनंदाची गोष्ट आहे! नि तूं ६।७ महिन्यांची झाल्यापासून गोड आवाजांत सारखी कांहींतरी अर्थशून्य बडबड करायचीस नि त्यामुळें मीं एकदां मजेनें 'कसा गोड गोड बोलतोय माझा हा बुलबुल!' असं म्हटलं नि सर्वांना तें आवडून तुझं बुलबुल हेंच नांव तोंडांत बसलं आमच्या! अन् बुलबुल, गोड बोलण्यानें आपण दुसऱ्यांना सुखी करूं शकतों हें लक्षांत ठेव तूं. नि तुझ्या ह्या टोपणनांवावरून तुला कुणीं 'बोल, गोड बोल' असं चिडविलं तरी न रागावतां त्यामुळें आपला मान झाला असंच दाखवीत जा तूं म्हणजे चिडविणारं माणूस गप्प बसेल! आणि हें बघ, तुला घरगुती नात्यानें ओळखणारी एकादी मुलगी तुझ्या वर्गांत किंवा शाळेंत असेल कदाचित्! मग तिनें तुला बुलबुल म्हणून हांक मारली तर काय करशील तूं? चिडशील काय?"

"उंहूं! आतां नाहीं चिडणार! अन् आई, गोड शब्दांत चिडतां येतंच कुठें? गोड बोलणाऱ्या बुलबुलानें चिडायचं नसतंच मुळीं! खरं ना?" बुलबुलनें प्रसन्न मुद्रेनें आईला प्रश्न केला व तो ऐकून आईच्या मुद्रेवर उमटलेलें समाधान पाहून बुलबुल आनंदित मनानें मास्तरांबरोबर शाळेंत गेली. नव्यानें शाळेंत जावयाचें म्हणून वाटणारी साशंक भीति व आई, बाबा बरोबर येऊं शकत नाहींत म्हणून वाटलेला खट्टूपणा हें सारं ह्या आनंदांत बुलबुल विसरली.

शाळेंत बुलबुलची चांचणी परीक्षा घेण्यांत आली व परीक्षेंत ती चांगल्या रीतीनें पास झाली!

तिसऱ्या इयत्तेचा तिचा अभ्यास बराचसा झालेला असला व विशेषतः तिचा गणित विषय त्या इयत्तेच्या मानानें पुष्कळ पुढें गेलेला असला तरी आरोग्य व व्याकरण हे दोन विषय थोडे मागें असल्यामुळें व वयानेंहि ती लहानच असल्यामुळें तिला मराठी तिसरींत बसविण्यांत आलें. व दाणी मास्तर तिचा निरोप घेऊन घरीं निघून गेले.

तेव्हां मात्र बुलबुलला फार अवघड वाटलें. मास्तरांच्या मागून धांवत जाण्याचा मोह पडला तिला! पण असें करणें चुकीचें होईल नि वर्गातील मुली आपल्याला हंसतील असा पोक्त विचार करून तिनें मन आंवरलें. शिवाय पहिलाच तास गणिताचा—बुलबुलच्या सर्वांत आवडीच्या विषयाचा—असल्यामुळें तिचें मन चटकन् तिकडे रमलें.

बाईंनीं पांच उदाहरणें घातलीं. नि सबंध वर्गांत फक्त बुलबुलचीं पांचहि उदाहरणें बरोबर आलीं. बाकी कुणाचें एक, कुणाचीं दोन नि शिकस्त तर कुणाचीं तीन! बस्स! त्यामुळें बाईंनीं बुलबुलचें कौतुक केलें. व अर्थांतच त्यामुळें बुलबुलला फार आनंद झाला. पण ती शेफारून मात्र गेली नाहीं. कारण 'संध्यावंदन हें ब्राह्मणाचें कर्तव्य आहे. तें केल्यानें पुण्य लागतेंच असें नाहीं. पण न केल्यानें मात्र पाप लागतें.' ही शिकवण जशी मुंज होतांच बटूला देण्यांत येते तशी शंकरराव व उमाबाई ह्या उभयतांनीं आपल्या मुलांना अशीच शिकवण दिली होती कीं, व्यवस्थित अभ्यास करून परीक्षेंत उत्तम यश मिळविणें हें गौरवास्पद असलें तरी तें विद्यार्थ्यांचें कर्तव्यच आहे! पण ह्यांत कसूर करून नापास होणें मात्र अगदीं गैर आहे!

अन् कांहीं अपवादात्मक मुलें सोडलीं तर बहुधा असें आढळून येतें कीं, गर्व हा वयानुसार व योग्य गृहशिक्षणाच्या अभावीं मुलांच्या मनाला जडणारा रोग आहे!

बुलबुलला गृहशिक्षण योग्य मिळालें होतें व वयानेंहि ती लहान होती. त्यामुळें तिच्या मनाला हा रोग अद्यापि फारसा जडलेला नव्हता! ती आनंदली मात्र खूप! व नवखेपणामुळें तिला वाटणारी भीतीहि थोडी दूर झाली!

दुसरा तास भूगोलाचा होता. पण तो शिकविणाऱ्या बाई आल्या नव्हत्या व म्हणून बुलबुलच्या वर्गभगिनी मैत्रिणीमैत्रिणींचे गट करून गप्पा मारीत किंवा सागरगोट्यांनीं खेळत बसल्या. त्यामुळें बुलबुल अगदीं एकटी पडली!

बुलबुलचा वर्ग व मराठी चौथीचा वर्ग असे दोन्ही वर्ग एकाच मोठ्या दिवाणखान्यांत भरत असून दोन वर्गांमध्यें भिंत किंवा पार्टिशनहि नव्हतें. तिसरीच्या वर्गांतील मुलींना बसावयाला बिनपाठीचे बांक होते.

वर्गांतील मुलींनीं तिच्याकडे अगदींच दुर्लक्ष केल्यामुळें कंटाळलेल्या बुलबुलनें बसल्या जागींच आपला मोर्चा फिरविला व ती आपल्या वर्गाकडे पाठ आणि चौथ्या इयत्तेकडे तोंड करून बसली.

तें पहातांच चौथींतील मुलींचें साहजिकच तिच्याकडे लक्ष वेधलें. त्या वर्गावरहि अद्यापि बाई आल्या नव्हत्या. त्यामुळें तिथल्या एका मुलीनें बुल-

बुलला म्हटलें, "काय ग, ए नव्या मुली, तूं आहेस तरी कुठल्या यत्तेंत? तिसरींत कीं चौथींत ?"

हा प्रश्न ऐकतांच बुलबुल साहजिकच गोंधळली. नि त्यांतच तिच्या गणितांतील प्रगतीमुळें तिचा मत्सर वाटलेल्या तिच्या कांहीं वर्गभगिनी हा प्रश्न ऐकून हंसल्या. त्यासरशीं बुलबुलचें तोंड गोरेंमोरें झालें. पण आपल्या हातून कांहींच चुकी झालेली नाहीं अशी तिची खात्री असल्यामुळें पहिल्याप्रथम ती अंमळ बिचकली तरी लगेच गोडसें हंसून आपल्या गोड आवाजांत ती उत्तरली "मी किनई, साडेतिसरींत आहे."

"साडेतिसरींत ? म्हणजे ग काय ?" चौथींतील त्याच मुलीनें प्रश्न केला.

"म्हणजे असं कीं," बुलबुल उत्तरली, "कांहीं विषयांचा माझा अभ्यास तिसऱ्या यत्तेपेक्षां अधिक झालाय. पण चौथीपेक्षां तो कमी आहे. तेव्हां मी साडेतिसरींतच आहें म्हणायचं, नाहीं का ?"

बुलबुलचें हें उत्तर ऐकून चौथींतील मुलींनीं, कुणीं कौतुकानें, तर कुणीं शिष्टपणानें 'मोठी चुणचुणीत आहे बरं का ही', 'चिटुकली आहे मोठी,' असे शेरे दिले. व तिला ते प्रश्न विचारणारी चौथींतली ती मुलगी खिलाडू वृत्तीची असल्यामुळें तिची व बुलबुलची त्या दिवसापासून गट्टी जमली !

नि बुलबुलच्या वर्गभगिनींना गणितांतील तिच्या हुषारीमुळें मघां तिचा मत्सर वाटला होता तरी आजवर त्यांच्यावर वडीलकीचा व अधिक ज्ञानसंपन्नतेचा शिष्टपणें हक्क गाजविणाऱ्या चौथींतील एका मुलीच्या प्रश्नाला बुलबुलनें सडेतोड उत्तर देऊन तिला गप्प बसविलें, हा तिनें आपल्या वर्गाला एक प्रकारें मोठेपणाच मिळवून दिला असें वाटून तिसरींतील सर्व मुली बुलबुलवर एकदम खूष झाल्या.

अशा रीतीनें पहिल्याच दिवशीं शाळेच्या त्या चिमण्या जगांत बुलबुलनें मानाचें स्थान पटकाविलें !

त्या दिवशीं शाळेंतून बुलबुल घरीं येण्याच्या वेळीं चंदू तिची वाट पहात दारांत उभा होता. बुलबुल येतांच त्यानें म्हटलें, "ताई, एऽ ताई, आई जशी रोज संध्याकाळीं बाबा येण्याच्या वेळीं दारांत उभी असते तसा मी बघ, तुझ्यासाठीं उभा राह्यलोंय !"

अल्लड, अजाण चंदू किती उत्साहानें हें बोलला. व ताई तेवढ्याच उत्साहानें आपलें कौतुक करील ही त्याची अपेक्षा! पण पोक्तपणाचा आंव आणून बुलबुल म्हणाली, "अरे वेड्या, आई बाबांची बायको आहे नि मी तुझी ताई आहें!"

"होय ना? मग तेंच तर म्हणतोंय मी." मघांच्याच उत्साहानें चंदूनें उत्तर दिलें, "माझं चुकलं कुठें? बाबा पुरुष आहेत, मीहि पुरुष आहें. आई बायको आहे नि तूंहि छोटी बायको आहेस!"

चंदूचें हें समीकरण दिसावयाला सरळ असलें तरी त्यांत कुठें तरी कांहीं तरी चुकतें आहे असें बुलबुलला वाटलें. पण तिला स्वतःलाच तें नीटसें न कळल्यामुळें ती चंदूला तें कसें समजाविणार? त्यामुळें तो विषयच बदलण्यासाठीं ती म्हणाली, "बरं, तें राहूं दे. चंद्या, तुला माझ्या शाळेंतल्या जंमती ऐकायच्या आहेत कीं नाहीं?"

"ऐकायच्या, ऐकायच्या—" एवढ्या तार स्वरांत चंदू हें ओरडला कीं, बुलबुल आली असावी हें ओळखून उमाबाई उत्सुकतेनें बाहेर आल्या. त्या दिसतांच बुलबुल पटकन् जाऊन त्यांना बिलगली.

आजपर्यंत घरच्या मोकळ्या वातावरणांत वाढलेल्या बुलबुलला दिवसभर बांधल्यागत वाटत होतें. घरीं येतांच तिला किती हलकें वाटलें.

शाळेंत घडलेल्या बारीक सारीक गोष्टी, आपली मुलींची शाळा असली तरी चौथीपर्यंत मुलांना प्रवेश असल्यामुळें आपल्या वर्गांत ५।७ मुलगे आहेत ही अजब घटना, आठवलीं तेवढीं मुलींचीं नांवें वगैरे सांगितल्यावर बुलबुलनें साडेतिसऱ्या यत्तेची गमत सांगितली. आणि ती म्हणाली, "अन् आई, माझ्या वर्गांतल्या दोनच मुली माझ्याप्रमाणें लांडे फ्रॉक घालतात ग. बाकीच्या पायघोळ फ्रॉक नाही तर परकर-पोलके नेसतात नि एक मुलगी तर साडी नेसते. नि आई, वीणा नांवाची एक मुलगी आहे ती मला फार आवडली ग. तिची नि माझी खूप गट्टी जमलीय. आई, मीं तिला आपल्या घरीं बोलावलंय. तिला किनई, व्याकरण खूप छान येतं. ती रोज दुपारच्या सुट्टींत मला तें शिकवणार आहे. नि तिचा गणितविषय थोडा कच्चा आहे तो मी तिला शिकवणार. कशी आहे जंमत? अन् आई, आम्हांला आज पांच गणितं घातलीं—"

बुलबुलचा बोलण्याचा ओघ थांबविणें जिवावर येऊनहि उमाबाई मध्येंच म्हणाल्या, "बुलबुल, पांच गणितं नाहीं म्हणायचीं—पांच उदाहरणं. गणित म्हणजे सगळा गणित विषय—कळलं ना?"

"अय्या! विसरलेंच मी! बरं झालं हं आई, तूं आठवण केलीस तें! नाहीं तर मुलींनीं माझी टिंगल केली असती कीं, मारे पांचहि उदाहरणं बरोबर करून बाईकडून शाबासकी मिळवते नि उदाहरणांऐवजीं गणितं म्हणते ही वृंदा!"

बुलबुलनें किती खुबीनें, द्यावयाची ती बातमी दिली नि मुलींचे शब्दहि किती बरोबर उच्चारले!

उमाबाईच्या मनांत आलें, 'बाई, बाई! मोकळ्या जगाशीं संबंध येतांच एका दिवसांत आपली बुलबुल कशी मोठ्यासारखी बोलूं लागली!'

तेवढ्यांत दिवाणखान्यांतून शंकररावांचे शब्द आले, "अरे, कुठें गेली आमची बुलबुलांची जोडी!"

—त्याबरोबर खाण्याची बशी तशीच टाकून बुलबुल व तिच्या मागोमाग चंदूहि बाहेर धांवला. उमाबाई फडक्याला हात पुसत पुसत बाहेर आल्या व म्हणाल्या, "अं! आज लौकर कसे घरीं आलां?"

त्यावर शंकरराव हंसून उत्तरले, "आपल्या ह्या बुलबुलाला आज शाळेच्या पिंजऱ्यांत अडकवलंय ना? सकाळीं तिच्याबरोबर शाळेंत जायला जमलं नाहीं मला. तेव्हां म्हटलं, मुद्दाम जरा लौकर घरीं यावं नि बुलबुलच्या तोंडून शाळें-तल्या गंमती जमती ऐकाव्यात. अं? बुलबुल, सांग बघूं काय काय झालं तें!"

नि मग बुलबुलची मघांपेक्षांहि अधिक जोरांत बडबड सुरू झाली. मघां सांगितलेली हकीकत आतां बाबांना सांगून झाल्यावर ती म्हणाली, "अन् आई, सुंद्रीच्या त्या मामेबहिणीनें बुलबुल ह्या नांवावरून मला चिडविलं असं म्हटलं ना मीं तुला सकाळीं? तर शाळेंत गंमतच झाली. लीला नांवाची एक मुलगी माझ्या बाजूला बसते तिला मीं पटकन् माझं बुलबुल हें घरांतलं नांव आहे असं आपलं सांगून टाकलं! नि तिला तें नांव इतकं आवडलं कीं, ४।५ दिवसांपूर्वीं तिला छोटी बहीण झालीय तिचं बारश्याच्या वेळीं म्हणे बुलबुलच

नांव ठेवायला सांगणार आहे ती तिच्या आईला! कशी गंमत आहे, नाहीं बाबा?"

—हें व असें मग किती तरी वेळ चालू होतें. 'नि बाबा' किंवा 'बरं का ग आई' नाहीं तर 'ऐकलंस का चंदू' ह्या पालुपदांनीं सुरुवात करून बुलबुलनें शाळेंतल्या ५॥-६ तासांतली एकूण एक हकीकत सांगितली.

तिचीं पांचहि उदाहरणें बरोबर आलीं हें ऐकतांच जणूं आपणच गणितविषयांत शंभर टक्के मार्क मिळवल्यासारखा तिच्या आईवडिलांना आनंद झाला! व त्याबद्दल तिनें मुळींच आत्मप्रौढी मारली नाहीं हें पाहून त्यांना फारच समाधान वाटलें! पण ह्याबद्दल तिच्या तोंडावर तिची फार स्तुति केल्यास तिच्या स्वभावांत अद्यापि असलेला निगर्वी साधेपणा नष्ट होईल हें शंकररावांना व उमाबाईंना ठाऊक होतें. पण मुलांना त्यांच्या हुषारीबद्दल, चांगल्या वागणुकीबद्दल उत्तेजनपर शाबासकी अधूनमधून द्यावयाला हवी, नाहीं तर मुलांना उमेद कशी वाटेल? ह्याचीहि त्यांना जाणीव होती व त्यामुळें तिनें पहिल्याच दिवशीं मिळवलेल्या यशाबद्दल योग्य कौतुक करण्यासाठीं उमाबाई म्हणाल्या, "बुलबुल, असंच यश मिळवीत जा हं शाळेंत! इतर मुलांप्रमाणें प्रारंभापासून तुला शाळेंत न घालतां घरीं मास्तर ठेवून तुझा अभ्यास करून घेतल्यामुळें तुझं नुकसान होईल, शाळेंत गेल्यावर इतर मुलींच्या मानानें तूं मागें रहाशील असा तर्क होता तुझ्या मालुमावशीचा. व तो खरा होईल काय अशी मला धास्ती वाटे. पण ती व्यर्थ होती असं तूं आज दाखवून दिलंस म्हणून मला फार आनंद झाला! बाळ, हें मिळवलेलं यश मात्र कायम टिकव हं."

आईच्या ह्या शब्दांनीं बुलबुलला फार आनंद वाटला. तिनें सानंद तृप्ततेचा एक निःश्वास सोडला.

त्यासरशीं आपण एक हुरहुरता सुस्कारा सोडीत चंदू म्हणाला, "ए, उद्यांपासून मी येऊं तुझ्याबरोबर तुझ्या वर्गांत?"

"अरे वेड्या, मी तिसरींत आहें नि तुझं अजुनि पहिल्या यत्तेचं पुस्तक चाललंय! मग तुला कसं माझ्या वर्गांत बसतां येईल?" बुलबुल हंसून उत्तरली.

"मग ताई, मी लौकर लौकर पहिलीचा नि दुसरीचा अभ्यास पुरा करतों नि तुझ्याबरोबर येतों. अं?"

"पण चंद्या, तोंवर मी पाचवींत नाहीं का जाणार?" बुलबुलनें गंभीरपणें प्रश्न केला.

त्यावर शंकरराव म्हणाले, "हें बघ, चंदू, तुझ्या नि ताईच्या वयांत दोन वर्षांचं अंतर आहे तें कधीं कमी होऊं शकेल का? तूं सहा वर्षांचा आहेस, ताई आठ वर्षांची आहे. तूं सात वर्षांचा झालास कीं ती नऊ वर्षांची होईल! म्हणजे हें दोन वर्षांच अंतर कायमच रहाणार! तूं कितीहि धांवपळ केलीस तरी ताईला तूं गाठूं शकणार नाहींस! त्याचमुळें शिकण्यांतहि ताई तुझ्यापुढें दोन यत्ता रहाणारच!"

"अन् ताई नापास झाली तर?" चंदूनें अचूक प्रश्न केला.

शाळेंत मिळविलेल्या यशाबद्दल नुक्ताच गौरव झाल्यामुळें व तिच्या अंगीं खिलाडू वृत्ति जरा कमी असल्यामुळें बुलबुल किंचित् रागानें उद्गारली, "नि तूं नापास झालास तर?"

मुलांचीं हीं अजब प्रश्नोत्तरें ऐकून शंकररावांना व उमाबाईंना हसूं आलें.

तें कसें तरी दाबीत शंकरराव म्हणाले, "पण दोघांनींहि नापास होऊन दोन यत्तांचं अंतर कायम ठेवण्यापेक्षां दोघांनीं पास होऊन तसं केलं तर अधिक चांगलं नाहीं का?"

बुलबुलला बाबांच्या ह्या बोलण्यांतली गंमत कळली व ती खुदकन् हंसली व ती हंसली म्हणून चंदू हंसला.

त्यासरशीं उमाबाई म्हणाल्या, "खरंच, मुलांनों, मघां तुम्हीं 'शुभ बोल रे नाऱ्या'सारखीच गत केलीत हं--"

आईच्या ह्या बोलण्यांतलें चंदूला थोडें तरी कळलें. नि तें म्हणजे कोणा तरी नाऱ्या नावाच्या मुलासंबंधींची कांहीं तरी गंमतीची गोष्ट आहे. व म्हणून तो उत्सुकतेनें म्हणाला, "ए आई, सांग ना आम्हांला त्या नाऱ्याची गोष्ट. सांग ना!"

"गोष्ट नव्हे रे ती—एक म्हण आहे झालं! हें पहा, नाऱ्या नांवाचा एक जरा अर्धवटसा मुलगा होता. तो एका ठिकाणीं लग्नाला गेला होता. तर नेहमींप्रमाणें कुठें तरी कांहीं तरी भकेल तो असं भय वाटून मांडवांत गेल्यावर

तिथल्या आयाबायांकडे हात करून नाऱ्याच्या आईनें त्याला सुचवलं कीं, भोंवतीं एवढीं माणसं जमलीं आहेत. नि तिनें बजाविलं, 'शुभ बोल रे नाऱ्या—' तर नाऱ्या उत्तरला, 'बोडक्या होतील साऱ्या!' म्हणजे ह्या बसलेल्या साऱ्या बायका बोडक्या म्हणजे विधवा होतील, त्यांचे नवरे वारतील!"

उमाबाई हें सांगतात तोंच मुलांना खूप हंसू कोसळलें. जराशानें उमाबाई पुढें म्हणाल्या, "तर बरं का मुलांनों, तुम्ही कधीं असा नाऱ्यासारखा वेडेपणा करतांय असं मला वाटलं तर मी हळूच 'नाऱ्या' असं पुटपुटीन हं—म्हणजे तुम्ही भानावर याल. कबूल?"

"हो, हो! कबूल!" मुलें हंसत ओरडलीं.

व मग चंदू बुलबुलला म्हणाला, "ताई, चल ग आपण चंबूला तुझ्या शाळेंतल्या जमती सांगू या."

ह्या बहीणभावांची हीच भारी कौतुकास्पद गोष्ट होती कीं, कधींमधीं तीं दोघं भांडत, पण पुनः लगेच त्यांची एकी होई—आतां हातांत हात घालून तीं दोघं चंबूकडे जावयाला निघालीं लगेच!

इतक्यांत शंकरराव म्हणाले, "अन् बरं का चंदोबा, जूनमध्यें ताईच्याच शाळेंत दुसऱ्या यत्तेंत तुझं नांव घालायचं ही बातमीहि दे हं चंबूला! मात्र तोंवर पहिलीचा अभ्यास अगदीं पुरा व्हायला पाहिजे हो!"

वडिलांचे हे शब्द ऐकून चंदूला फार आनंद झाला. व उद्यांपासून दुपारीं चंबूबरोबर खेळणें, खिदळणें कमी करून त्या वेळांत अभ्यास करावयाचा असा त्याच्या हातून एकहि दिवस पाळूं न शकण्यासारखा भयंकर कठीण निश्चय त्यानें आपल्या मनाशीं केला!

× × ×

## ६.

# दुरुस्तीचा शनिवार

बुलबुल आतां शाळेच्या जगांत चांगलीच रमली. तिच्या बऱ्याच मैत्रिणी झाल्या. नि गट्टी नि कट्टी ह्या भानगडीहि तिला कळून आल्या.

त्याचें असें झालें, तिच्या सर्व वर्गभगिनींना सागरगोटे खेळण्याचा फार नाद होता. अर्थातच मैत्रिणींचें तेवढें चांगलें अशी परिचयाच्या ह्या पहिल्या दिवसांत बुलबुलची प्रामाणिक समजूत असल्यामुळें तीहि मोठ्या आवडीनें सागरगोटे खेळूं लागली. पण एक दिवस खेळतांना गुलाब नांवाच्या एका मुलीच्या हाताला खरजीचे फोड असलेले तिनें पाहिले व ती म्हणाली, "गुलाब, तुझ्या हाताला फोड आले आहेत खरजीचे. ती लागते ग म्हणे! मग आम्ही तुझ्याबरोबर खेळलों तर आम्हांलाहि नाहीं का खरूज होणार? ए, तुझी खरूज बरी होईस्तोंवर तूं न खेळणं बरं नाहीं का?"

बुलबुलचे हे शब्द ऐकून गुलाब भयंकर चिडली व म्हणाली, "हो, होऽ! ठाऊक आहे तुम्ही मोठ्या स्वच्छतेच्या पुतळ्या आहांत त्या! तुला मिजास असली तर तूं नको येऊंस खेळायला. मोठी आलीय आम्हांला स्वच्छता शिकवणारी!"

गुलाब वर्गात वयानें सर्वांत मोठी होती. त्यामुळें सर्व मुलींना साहजिकच तिचा वचक वाटे! त्यामुळें आतां गुलाबनें असें म्हणतांच वीणा व लीला ह्या दोघींखेरीज इतर साऱ्या जणींनीं गुलाबचाच शब्द उचलून धरला.

दुसऱ्या दिवशीं बुलबुल वर्गांत आली तर एकहि मुलगी तिच्याशीं बोलेना. वीणा गैरहजर होती नि लीला बहुमताला बळी पडून गुलाबच्या पक्षांत मिसळली होती. त्यामुळें बुलबुल अगदीं रडकुंडीला आली. पण झाल्या गोष्टींत आपली कांहीं चुकी नाहीं ही तिची खात्री होती. म्हणून स्वाभिमानाच्या जोरावर ती बाह्यतः स्वस्थ दिसत होती. अशा रीतीनें तीन दिवस गेले. वर्गाचा अबोला चालूच होता, पण आतां वीणा येऊं लागल्यामुळें बुलबुलला हा अबोला आतां तितकासा त्रासदायक वाटत नव्हता.

अन् चौथ्या दिवशीं ती शाळेंत आली तर लीला व बुलबुलशीं हल्लीं अबोला धरलेल्या आणखी पांच-सहा मुली आपण होऊन तिच्याकडे बोलावयाला आल्या. बुलबुलला आश्चर्य वाटलेंच, पण आनंद अधिक झाला. ती नेहमीं-सारखी त्यांच्याशीं बोलूं लागली. एवढेंच नव्हे तर तीन दिवसांच्या अबोल्याचा वचपा काढण्यासाठीं कीं काय, ती नेहमींपेक्षांहि अधिक बडबडत होती. त्यामुळें वीणा तिथें आली तरी बुलबुलचें तिथें लक्षच गेलें नाहीं. एवढ्यांत लीला वीणेला म्हणाली, "वीणे, आज कित्ती बोलतोय् हा बुलबुल! ऐक तरी."

लीलेचे हे शब्द व आपल्या टोपणनांवाचा उल्लेख ऐकून बुलबुल चमकली. नुकत्याच आपल्याकडे बोलूं लागलेल्या ह्या मुली आतां ह्या टोपणनांवावरून आपली मस्करी करणार नि त्या मस्करीची कुस्करी होऊन परत अबोल्याचा प्रसंग येणार असें बुलबुलला भय पडलें. व म्हणून ती लौकर लौकर विषय बदलण्याचा प्रयत्न करणार तोंच सुशीला ह्या नांवाच्या एका मुलीनें विचारलें, "लीले, काय म्हटलंस ग तूं? बुलबुल? नि तें कां?"

"अग, ह्या वृंदेचं घरचं नांव बुलबुल आहे हो!" लीलेचें हें उत्तर ऐकतांच बुलबुलनें एक खोल निःश्वास सोडला. झाऽलं! लीलेनें आपलें बिंग फोडलेंच. पण तेवढ्यांत सुशीला म्हणाली, "काय? बुलबुल हें टोपणनांव आहे ह्या वृंदेचं? अय्या! कित्ती छान आहे! वृंदा ह्या नांवापेक्षां नि आमच्या सर्व-जणींच्या त्याच नि त्याच नांवांपेक्षां हजारपटीनें सुंदर आहे ग, हें! ए वृंदे, तूं बुलबुल हेंच नांव लाव ना! नाहीं का ग मुलींनों? तुम्हांला नाहीं हें आवडलं?"

"आवडलं तर! सुंदरच आहे तें!" मुली एकसुरांत ओरडल्या.

ह्या बालवयांत आपल्या मित्रांच्या किंवा मैत्रिणींच्या मताची मुलांमुलींना कमालीची अपूर्वाई वाटत असते! त्यामुळें मुलींनीं आतां आपल्या टोपणनांवाच्या तर्फे कौल देतांच बुलबुलला हुश्श वाटलें. मघांपासून भयापायीं लौकर लौकर होणारा तिचा श्वासोच्छ्वास आतां नेहमींसारखा होऊं लागला.

आज मुलींचा अबोला सुटला ह्यांतच तिला मघांपासून सारें भरून पावलें होतें. त्यांचा अबोला कसा सुटला हें विचारण्याची तिला आवश्यकताच वाटली नाहीं. पण वीणा बरी एवढ्यावर गप्प बसणार? तिनें लीलेला सरळ प्रश्न केला, "काय ग लीले, आज तुम्ही आमच्याशीं बोलायला कशा आलांत?"

वीणेचा हा प्रश्न ऐकून लीला अंमळ खिजली व हळूंच म्हणाली, "कारण ह्या वृंदेचं नव्हे—बुलबुलचं सांगणं आम्हांला पटलं!"

"अग, म्हणजे त्या गुलाबच्या खरजेचा दोघीचौघींना चांगलाच प्रसाद मिळाला. तेव्हां आमचे डोळे उघडले." सुशीलेनें आंतबाहेर न करतां स्पष्ट सांगून टाकलें.

अशा रीतीनें मुलींचा अबोला सुटल्यापासून बुलबुलला आपल्या वर्गभगिनींबद्दल फारच अगत्य व आपुलकी वाटूं लागली.

तोंवर नाताळचा सण जवळ आला व शाळेला दहा दिवसांची सुटी पडली. पण पहिले २–३ दिवस बुलबुलला करमेना अगदीं. सारखी वीणा नि लीला नि सुशीला नि ही नि ती तोंडांत नाचत तिच्या.

पहिल्यांदा चंदूनें तिच्या मैत्रिणींचें हें नामसंकीर्तन सहानुभूतीनें ऐकलें. पण मग जरा वाईट तोंड करून चंदूनें तिला विचारलें, "म्हणजे ताई, तुझ्या ह्या मैत्रिणी तुला माझ्यापेक्षां नि चंबूपेक्षां अधिक आवडूं लागल्यात कीं काय?"

चंदूचा हा प्रश्न ऐकून बुलबुलला एकदम धक्काच बसला. व उमाबाई बाजूला फाटक्या कपड्यांची दुरुस्ती करीत बसल्या होत्या त्यांनाहि नवल वाटलें.

बुलबुल उमाबाईंना म्हणाली, "आई, बघ ग, चंदू कसा वेडा आहे तो? कांहीं तरीच विचारतो झालं."

"पण बुलबुल, त्याच्या त्या कांहीं तरीच प्रश्नाला तूं नीट उत्तर देऊन समाधान कर कीं त्याचं."

तेव्हां पुष्कळसें हंसत बुलबुलनें म्हटलें, "बरं का चंदुनाना, भाऊ तो भाऊ नि मैत्रिणी त्या मैत्रिणी! भावाची सर मैत्रिणींना कशी येईल? किंवा मैत्रिणी भावापेक्षां अधिक कशा आवडूं शकतील?"

"शाबास बुलबुल! छान उत्तर दिलंस. पण हें उत्तर नुसतं ओठांपासून येऊन नाहीं हं भागणार—अगदीं पोटांपासून हवं, बरं? अन् चंदू, तूंहि लक्षांत ठेव हो. तुलाहि ताईपेक्षां मित्र अधिक आवडतां नयेत ह. मुलांनों, असंच एकमेकांवर प्रेम ठेवा बरं!"

"मग ताई, आतां सारखीं तुझ्या मैत्रिणींबद्दलचीं हीं बोलणीं पुरे करून जरा माझ्याबरोबर नि चंबूबरोबर खेळायला चल कीं."

"पण चंदू, आज दुरुस्ती-दिवस आहे ना? मग ह्या तुझ्या तुमानीची नि बाबांच्या सदऱ्याची एवढी दुरुस्ती पुरी करून येतें मी—अं? तोंवर तूं अभ्यास करीत बैस इथें. हो गड्या, चंदू, हातानें मी शिवते नि तोंडानें तूं नि मी रामरक्षा म्हणूं या, नाहीं तर? हं!"

ही सूचना चंदूला फार पटली. व मुलें आपल्या सुरेल, मंजुळ आवाजांत रामरक्षा म्हणूं लागलीं.

उमाबाईनीं ओळखलें कीं, आपल्या तोंडून नकळत मैत्रिणीपुराण उमटूं नयें म्हणून बुलबुल ही खबरदारी घेत आहे! नि त्याबद्दल उमाबाईना बुलबुलचें फार कौतुक वाटलें! त्यांच्या मनांत आलें, मोठ्या माणसांनीं धडा घेण्यासारखी आहे ही बुलबुलची वागणूक! आम्हीं मोहाला बळी पडणार नाहीं अशी मिजास मारून ती विषाची परीक्षा पहावयाची नि बहुधा त्या परीक्षेंत नापास व्हावयाचें त्यापेक्षां मोहाचा मार्गच टाळावा हें उत्तम नाहीं का?

समाधानानें मनाशीं स्मित करीत त्या हातांतील फ्रॉकची डागडुजी करूं लागल्या.

दर महिन्यांतील तिसऱ्या शनिवारला उमाबाईनीं 'दुरुस्तीचा शनिवार' असें नांव दिलें असून त्या दिवशीं दुपारीं घरांतील सर्व फाटक्या कपड्यांची त्या डागडुजी करीत. गेलें वर्षभर त्या बुलबुललाहि डागडुजी शिकवूं लागल्या होत्या. त्यामुळें अनेक गोष्टी साधत. कपडा जरा फाटला कीं टाकून द्यावयाचा ही गैरमिजास मुलांच्या मनांत मूळच धरूं शकत नसे. स्वावलंबनाचा आयताच

व्यावहारिक पाठहि मिळे नि तास, दोन तास एका ठिकाणीं बसून काम केल्यानें अंगीं चिकाटीहि येई.

अन् स्वतःच्याच कपड्यांची दुरुस्ती करण्यांत लहानाला कांहींच गंमत वाटणार नाहीं हें ओळखून उमाबाई मुद्दामच बुलबुलला भावाच्या, वडिलांच्या कपड्यांची दुरुस्ती करावयाला सांगत. कधीं कधीं आपलें पोलकें, चोळीहि तिच्याकडून दुरुस्त करून घेत. त्यामुळें बुलबुलला ही डागडुजी करण्यांत मोठेपणा वाटे. तिनें पहिलेंच ठिगळ लावलें तें चंदूच्या तुमानीला. व मग आपल्या त्या हस्तकौशल्याचा तिला एवढा अभिमान वाटला कीं, ठिगळाची ती तुमान चंदूला रात्रीची घालावयाला उमाबाईनीं सांगितलें असूनहि चंदूनें चौपाटीवर फिरावयाला जातांना घालण्याच्या लायकीची ती आहे असें बुलबुलला प्रामाणिकपणें वाटे!

उमाबाईहि बरोबर शिवूं लागत व त्या वेळीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मुलांना त्या गोष्टी वगैरे सांगत. त्यामुळें बुलबुलला हा दुरुस्तीचा शनिवार कंटाळवाणा न वाटतां आपण कांहीं तरी उपयुक्त काम केल्याची जाणीव वाटून तिला समाधान होई!

आतां मुलाची रामरक्षा म्हणून होतांच उमाबाई म्हणाल्या, "बुलबुल, हा बघितलास का तुझ्या फ्रॉकला मीं रफू केलाय तो?"

"अय्या! आई, कित्ती छान केलास ग! अगदीं ओळखूं सुद्धां येत नाहीं. मग आई, हा फ्रॉक शाळेंत जातांना घालायला काय हरकत आहे?"

"हो. घाल कीं तूं थोडे दिवस शाळेंत जातांना—"

"अन् आई, रफू केलेला फ्रॉक घातला म्हणू कुणीं मला चिडवलं तर?" परत उलट उडी मारीत बुलबुलनें विचारलें.

"तर त्या मुलीला तूं समजावून सांग कीं, म्हणावं, वेळींच एक टाका घातला कीं नऊ टाके घालण्याचे श्रम वांचतात ह्याचं उदाहरण आहे हें! खरंच, ही म्हण फार उपयुक्त आहे हं. जेव्हांच्या तेव्हां काम केलं कीं तें थोड्या श्रमांत होतं. लक्षांत ठेवा हं, मुलांनो. आणि दुसरी गोष्ट अशी कीं, प्रत्येकानें आपलं आंथरूण बघूनच पाय पसरणं इष्ट! अस्वच्छ, फाटके कपडे घालणं आपल्यासारख्या मध्यम स्थितींतल्या माणसांना शोभत नाहीं. पण किंचित्

डागडुजी केलेले स्वच्छ कपडे घालण्यांत मुळींच कमीपणा नाहीं ! आतां, वितीएवढालीं मोठीं ठिगळं नि तींहि वेगळ्याच कापडाचीं लावलेले कपडे घालून चारचौघांत जाणं बरं दिसणारच नाहीं. अशा माणसांना विक्षिप्त म्हणतात. ”

“ हो, हो. आई, तूं त्या कुठल्याशा ठिगळे बुवाची गंमत सांगितली होतीस कीं, एकदां ! तो म्हणे ठिगळाशिवायचा कपडा घालीतच नसे ना ? ” बुलबुल उद्गारली.

“ होय ना. कोरे कपडे फाडून त्यांना नाना रंगांचीं ठिगळं लावून घेतल्यावरच ते घालायचा तो ! लोकांत प्रसिद्धि मिळावी, चारचौघांचं लक्ष आपल्याकडे जावं म्हणून असा विक्षिप्तपणा करीत असे तो !”

“ मग आई, आपल्या चंदूलासुद्धां ठिगळेबुवा म्हणायला हरकत नाहीं तर ! गेल्या दुरुस्तीच्या शनिवारीं त्यानें थोडा असला विक्षिप्तपणा केलाच, नाहीं का ? ” बुलबुलनें आठवण केली व ती आणि उमाबाई हसूं लागल्या.

चंदूनें अंमळ खजील होऊन अर्धवट हंसरी मुद्रा केली.

आदल्या दुरुस्तीच्या शनिवारीं ती मोठी गंमतच झाली होती.

त्या दिवशीं सकाळीं नेहमींप्रमाणें उमाबाई फाटके कपडे गोळा करूं लागल्या. पण तीनचारच तसले कपडे निघाले. व मग दुपारीं त्या व बुलबुल डागडुजी करीत बसल्या असतां चंदू आपली तुमान घेऊन तिथें आला व उमाबाईंना म्हणाला, “ ए आई, माझ्या ह्या तुमानीला ठिगळ लावायला हवंय ग. बरं झालं नाहीं का, आज कपडे कमी होते दुरुस्तीला तर ही तुमान मिळाली माझी ! ”

नि उमाबाई पहातात तर त्या तुमानीच्या पायाला व्यवस्थित कात्रीनें कापून भोक पाडलेलें. त्या नवलानें उद्गारल्या, “ हें रे काय चंदू ? तूं भोक पाडलंस हें ? ”

“ अं—अं—म्हणजे, आज तुला नि ताईला ठिगळ लावायला एकहि कपडा नव्हता म्हणून—अं—मी—ह्या—पण आई, जुनीच होती ग ही तुमान—नि फाटलेली शिवलेलीहि होती ! ”

चंदूच्या ह्या स्पष्टीकरणावर काय बोलावें तेंच उमाबाईंना कळेना. एवढ्यांत बुलबुल हसूं लागली. त्यामुळें उमाबाईनाहि हसूं लोटलें होतें.




‘ ऐट आहे बुवा एका माणसाची ’

अन् आतां ह्या आठवणीनेंहि त्यांना पुनः हसूं आलें.

"बरं का चंदू," उमाबाई हसून म्हणाल्या, "आतां हळूहळू मी तुलाहि शिवायला शिकवणार आहें. म्हणजे असे मुद्दाम कात्रीनें कपडे तर तूं फाडणार नाहींसच, पण जरा फाटले कीं लगेच शिवून टाकशील. कारण जरासा फाटलेला कपडा वेळींच शिवला कीं थोडक्यांत काम होतं नि काटकसरहि होते."

"पण आई, मुलगे कुठें शिवण करतात काय?" चंदूनें प्रश्न केला.

"अरे, तसं मुलीइतकं शिवणकाम नको असलं तरी मुलांनाहि कामापुरतं शिवण यायलाच हवं. थोडं फाटलेलं शिवणं, किंवा सदऱ्याला वगैरे गुंड्या, बटनं टांचणं हें मुलालाहि आलं पाहिजे. कळलं ना चंदू?"

"मग आई, मला ह्यापेक्षां जरा जास्त शिवण शिकव ग. म्हणजे मी चंबू-साठीं एक झूल शिवीन. अं?" चंदू उत्सुकतेनें म्हणाला.

झालं! मुळींच शिवण न शिकण्यावरून लगेच लाडक्या चंबूसाठीं झूल शिवण्यापर्यंत चंदूनें उडी मारली.

खरंच, आतां थंडी पडूं लागली होती. रात्रीं चंबूला पांघरूण घालण्याची व्यवस्था करीत उमाबाई. पण चंबूला झूल करण्याची कल्पना कांहीं कुणाला सुचली नव्हती ती चंदूला सुचली. त्यामुळें बुलबुलला थोडा खेद वाटला. आपल्या बुद्धीचा हा कमीपणा आहे असें मनांत आलें तिच्या. पण एवढ्यांत तिला एक कल्पना सुचून ती म्हणाली, "चंदू, अजुनि तुला एक टाकाहि घालायला येत नाहीं. ह्यापुढें शिवायला शिकून तूं झूल शिवणार कधीं? त्यापेक्षां मीच शिवतें चंब्यासाठीं झूल. हं? आई, कसल्या तरी छानशा कापडाची झूल देशील वेतून?" एवढ्यांत बुलबुलचें लक्ष चंदूच्या खट्टू चेहऱ्याकडे गेलें व आपल्या चतुर स्वभावानुसार ती पुढें हंसून म्हणाली, "अन् चदू, ती झूल तूं घालायचीस बरं का चंबूला. तूंच घालायचीस नि तूंच काढायचीस—अं?"

बुलबुलनें नेमकी मोक्याची जागा शोधून काढली. तिचे हे शब्द ऐकून चंदू खूष झाला! बस्स! बस्स! उद्यांपासून चंबुरावाला आपण रात्रीं किंवा संध्याकाळींच झूल घालायची नि आपणच ती सकाळीं काढायची! छान! नाहीं तरी चंदूनें आव खूप आणला असला तरी झूल शिवण्याच्या कल्पनेनें तो अंमळ भ्यालाच होता. आतां आयती झूल शिवून देणार ताई हें बरेंच झालें.

त्यानें हंसून ताईकडे बघितलें. आपण झूल शिवल्यानें आपला मोठेपणा कायम राहणार ह्या कल्पनेनें ताईसाहेबहि खूष झाल्या होत्या. त्याहि हंसल्या.

नि मग चंदू धावत चंबूकडे गेला व खालीं वांकून त्याच्या कानांत बोलला, "बरं का मिष्टर, उद्यां झूल मिळणार तुम्हांला. ऐट आहे बुवा एका माणसाची!" नि ह्यावर चंबूनें त्याचा गाल चाटतांच झूल मिळणार म्हणून चंबूलाहि आनंद झाला आहे असें वाटून चंदू फारच खूष झाला.

× × ×

म. ए. सो. ... शाळा.
शा. क्र. ............ नों. दि. ......
वि. ................ क्र. ................

. ७ .

# मुलांचें हळदकुंकु !

अन् मग जानेवारीच्या पांच तारखेला बुलबुलची शाळा परत उघडली. नाताळच्या सुटींत नंतर ती चंदू व चंबू ह्यांच्याबरोबर पुष्कळ खेळली होती. त्यामुळें तिची शाळा आतां सुरू होतांच चंदूला जरा वाईट वाटलें. तो उमाबाईंना म्हणाला, "आई ग, ताईच्या शाळेला आणखीन् थोडी सुट्टी दिली असती तर काय बिघडलं असतं ग ?"

"हें बघ चंदू, खेळाच्या वेळीं खेळ नि अभ्यासाच्या वेळीं अभ्यास, अशी व्यवस्थित वांटणी करायलाच हवी नेहमीं. सारखा अभ्यास केल्यानें त्रास वाटेल तसा सारखं खेळत राहिल्यानेंहि कंटाळा येईल! अन् आतां थंडीचे दिवस असल्यामुळें अभ्यास केल्यानें तितकासा थकवा येत नाहीं म्हणून विश्रांतीसाठीं दहाच दिवसांची सुटी देतात. उन्हाळ्यांत घामामुळें त्रास होतो म्हणून त्या वेळीं चांगली दीड महिन्याची मोठी सुटी मिळते."

"मग आई, वर्षभर उन्हाळाच राहिला तर छानच होईल! दर वेळेला मोठीच सुटी मिळेल!" चंदू उद्गारला.

बिचाऱ्या उमाबाईंच्या मनांत आलें, आपण आतां एवढा व्यवस्थित उपदेश केला तो उपड्या घागरीवरील पाण्याप्रमाणें व्यर्थच गेला तर! पण त्यांच्या अंगांत चिकाटी व सहनशीलपणा मोठ्या प्रमाणांत होती. त्यामुळें आतां व्यर्थ गेल्यागत वाटलेला उपदेश वेगळ्या रीतीनें चंदूला पटविण्याचा त्यांनीं निश्चय केला. व त्याच दिवसापासून त्याची सुरुवातहि केली.

त्यांनीं त्या दिवशीं सकाळच्या जेवणांत मुद्दाम चदूच्या आवडीची बटाट्याची भाजी करावयाला स्वयंपाक्याला सांगितलें. मग पुनः संध्याकाळींहि बटाट्याचीच भाजी चंदूच्या पानांत आली.

"अरे वा:! आतांहि बटाट्याचीच भाजी? पण आई, सकाळसारखीच कां केली? वेगळी तरी करायची. पण मला हीं आवडते म्हणा!" नि असें बोलत चंदूनें सकाळीं खाल्ली त्याहून थोडी कमी भाजी रात्रीं खाल्ली.

अन् दुसऱ्या दिवशीं सकाळींहि त्याच पद्धतीची बटाट्याची भाजी स्वयंपाक्यानें वाढतांच चंदू उद्गारला, "अरेच्चा! आतांहि हीच भाजी?"

"होय ना. चंदू, तुला हीच भाजी फार आवडते म्हणून रोज हीच करायला सांगितलंय मीं केशवाला." उमाबाई म्हणाल्या.

जेमतेम चारपांच दिवस चंदूनें सकाळ-संध्याकाळ तीच ती भाजी खाल्ली. व मग तो उमाबाईंना म्हणाला, "आई, आतां दुसरी कसली तरी भाजी करायला सांग ग केशवाला. मला ह्या बटाट्याच्या भाजीचा आतां कंटाळा आलाय्. मला न आवणारी गवारीची भाजी त्यानें संध्याकाळीं केली तरी ती खाईन मी आवडीनें!"

उमाबाईंना हेंच हवें होतें! चंदूला जवळ घेऊन त्या म्हणाल्या, "चंदू, पाहिलंस ना? एकादी गोष्ट चांगली वाटली, आवडली तरी सारखी तीच मिळूं लागली कीं तिचा चांगुलपणा आपल्याला नाहींसा झाल्यासारखं वाटतं! नि एरवीं न आवडणाऱ्या गोष्टीहि बदल म्हणून आवडूं लागतात! चंदू, चार दिवस रोज आवडती बटाट्याची भाजी खातांच तुला ती नको झाली. मग वर्षभर रोज उन्हाळाच राहिला तर कसा आवडेल तुला? नी सारखीच मोठी सुटी मिळाली तर त्या सुटीची गंमतच वाटणार नाहीं हेंहि पटलं ना तुला? अं?"

"अरेच्चा! आई, त्यासाठीं तूं ही युक्ति केली होतीस होय? वा:! आतां मी परत कधीं अशी कुरकुर करणार नाहीं हं. खरंच, अभ्यासाच्या वेळीं अभ्यास व शाळा नि खेळाच्या वेळीं खेळ नि सुट्टी हें पटलं मला." चदू उत्तरला.

"होय ना? तसा शहाणाच आहेस तूं! बरं, आतां कसली भाजी सांगूं, संध्याकाळसाठीं?"

" कसलीहि आवडेल मला. पण बटाट्याची मात्र नको ! ए ताई, तूंही लक्षांत ठेव हं हें ! " मोठ्यासारखा आव आणून चंदू बुलबुलला म्हणाला.

पण बुलबुल अशी त्याला बधणार ? ती लगेच उत्तरली, " अरे, मला हें चांगलं पटलंय्‌च मुळीं. म्हणूनच तर शाळा उघडण्याची वाट बघत होतें मी. आईनें तुला धडा मिळावा म्हणून बटाट्याच्या भाजीचा हा तडाका सुरू केलाय हें ओळखलं होतं मीं. "

" मग मला कां ग सांगितलं नाहींस तूं ताई ? "

" वाः ! अरे, आई जर मुकाट्यानें तुला पटवून देऊं पहात होती तर मी तुला कसं रे सांगणार तें ? खरं कीं नाहीं ग आई ? "

बुलबुलचा हा प्रश्न ऐकून उमाबाई हंसून म्हणाल्या, " तें खरं. पण बुलबुल तूं लहानपणापासूनच अश्शी वस्ताद आहेस हं ! एकदां काय झालं, चंदू कांहीं तरी दोन-अडीच वर्षांचा होता नि कुणाचं तरी ऐकून किंवा मीच कौतुकानें त्याला कधीं म्हटलं होतं तें लक्षांत ठेवून एक दिवस तो म्हणायला लागला कीं, 'आई च्यावत, बाब्बा च्यावत.' सारखा हा मंत्रच घेतला जसा—तेव्हां मला कळेल अशा सोप्या इंग्रजींत तुमच्या बाबांनीं मला सुचवलं कीं, 'त्याच्या बोलण्या-कडे लक्ष देऊं नको. त्याला त्याचा अर्थ न कळून तो कांहीं तरी बडबडतोय, अंमळशानें विसरेल तो—' नि ह्यावर बुलबुल एकदम म्हणाली, 'बाबा काय बोलले तें कळलं मला.' चार-साडेचार वर्षांची तर होती ही—नि तिला काय इंग्रजी कळणार ? म्हणून मीं तिला म्हटलं, 'मग सांग तर बाबा काय म्हणाले तें—' त्यासरशीं लबाड सांगते कशी—कीं म्हणे, 'आई, चंदूला कळूं नये म्हणून जर बाबा मुद्दाम इंग्रजींत बोलले तर मी तें मराठींत कसं सांगूं ? कळेल ना मग तें त्याला ?' अशी लहानपणापासूनच वस्ताद आहेस तूं, बुलबुल ! "

ताईच्या लहानपणींची ही गंमत ऐकून चंदू मनापासून हंसला व बुलबुल जरा ओशाळत हंसली.

प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळीं करण्यांतच गंमत असते हें चंदूला पटलें व त्यांतच घरांत संक्रांतीची गडबडहि सुरू झाली. त्यामुळें ताईची गैरहजेरी चंदूला आतां तितकीशी जाणवत नव्हती.

पहांटे उठून उमाबाई तिळगूळ घोळवीत बसत. नि मुलें तिथेंच घोळ घालीत असत—किती सुंदर कांटा आला होता तिळगुळांवर!

"आई, कसा येतो ग हा कांटा?" चंदूनें नवलानें प्रश्न केला.

"हात्तेच्या!" बुलबुल मध्येंच म्हणाली, "अरे, तुझ्या पाठीवर जरा चांचपलं कीं जसा कांटा येतो तसा!"

"हो. आणि झुरळ जवळ आलं कीं तुझ्या अंगावर येतो तसा!" चंदूनें लगेच उसनें फेडीत म्हटलें. व तें अगदीं खरें असल्यामुळें बुलबुलला त्यावर कांहीं योग्य उत्तर सुचेना व निव्वळ ताईपणाच्या जोरावर चंदूला हटकणेंहि तिला रुचेना. एवढ्यांत चंदू म्हणाला, "मी मोठा झालों कीं ह्याचं कारण शोधून काढणार आहें."

हें ऐकून उमाबाई हंसल्या व बुलबुलहि एक सुटकेचा श्वास सोडून हंसली.

लहानपणापासून चंदूचा कल असाच प्रत्येक कार्याचें कारण शोधून काढण्याकडे होता. चार महिन्यांपूर्वीं त्याची चावीची मोटर बंद पडली. त्यासरशीं चंदूनें ती मोटर उसकटली. मोटर बंद पडण्याचें कारण नाहींसें केलें कीं मोटर परत चालू झालीच पाहिजे असा कार्यकारणभाव त्यानें लढविला. नि खरंच, मोटरीची स्प्रिंग सटकल्यामुळें ती चालत नव्हती—चंदूनें ती स्प्रिंग परत त्या लोखंडी सळीवर बसवली नि मोटर व्यवस्थित चालूं लागली.

नि त्याच्या ह्या स्वभावामुळेंच शंकररावांना वाटे कीं, मोठेपणीं त्याची ही वृत्ति कायम राहिल्यास तो खराखुरा संशोधक खास होईल! असो!

उमाबाईंची हळदकुंकवाची जुळवाजुळव सुरू झाली. यंदा बुलबुलच्या मैत्रिणी पुष्कळच वाढल्यामुळें ती उमाबाईंकडे हट्ट घेऊन बसली कीं, "तुझ्या हळदकुंकवादिवशीं माझ्या शाळेंतल्या नि आजूबाजूच्या मैत्रिणी बोलावून हळदकुंकू करणार मी मुलीमुलींचं. करूं ना?"

उमाबाईंनीं तिला परवानगी देतांच चंदू म्हणाला, "आई, मग मीहि माझ्या मित्रांना बोलावून मुलांचं हळदकुंकू करणार तर!"

चंदूचे हे शब्द ऐकतांच उमाबाईंना हंसूं लोटलें. त्या म्हणाल्या, "अरे वेड्या, मुलगे हळदकुंकू लावतात काय? मग मुलांचं हळदकुंकू रे कसं करणार तूं?"

२८८६१ 
२७३७
३१।१।६१

आईचे हे शब्द ऐकून चंदूनें लाजून आईच्या ओंच्यांत तोंड खुपसलें. जरा वेळानें त्यानें विचारलें, " मग आई, मुलांच्या हळदीकुंकवाला काय म्हणतात तर ? "

" चंदू, हळदकुंकू हा समारंभच मुळीं बायकामुलींचा आहे. आपल्यांत मुंज ही जशी निव्वळ मुलांचीच होते तसं आहे हें ! "

" मग तूं नि ताई हळदकुंकवादिवशीं गंमत करणार नि मी काय करूं ? " चंदू गाल फुगवीत म्हणाला.

" तूं तुझ्या मित्रांना त्या दिवशीं तिळगूळसमारंभासाठीं बोलाव नि त्यांना तिळगूळ, तिळाचा लाडू, अत्तर, गुलाब नि पान दे म्हणजे झालं. अं ? आवडली तुला ही कल्पना ? "

" हो, हो ! फार आवडली ! तिळगूळ-समारंभ ! तिळगूळ समारंभ ! गंमत रे गंमत ! " चंदू खुषींत ओरडला व ही खूषखबर चंबूला कळविण्यासाठीं तो घरांत धांवला.

आणि मग एकाच दिवशीं हे तीनहि समारंभ उत्तम रीतीनें पार पडले.

दिवाणखाना मोकळा करून उमाबाईंनीं तिथें बैठक घालून घेतली होती. बाजूला गच्चींत मुलांमुलींसाठीं व्यवस्था केली होती. व म्हणून बायकांना आमंत्रण ४ ते ७ चें होतें तर छोट्यांना ५॥ ते ७ चें होतें.

वस्तुतः असल्या हळदकुंकवाला आरास करण्याचा प्रघात नसतो. चैत्रगौरीच्या हळदकुंकवाला आरास मांडतात. पण उमाबाई चैत्रांतील हळदकुंकू करीत नसल्यामुळें मुलांच्या हौसेखातर यंदा ह्या हळदकुंकवाच्या वेळीं आरास मांडण्याचें त्यांनीं ठरविलें. व संक्रांतीदिवशीं त्यांनीं जीं सुगडें पुजलीं होतीं तीं उमाबाईंनीं एका कोंपऱ्यांत उंचशा घडवंचीवर विणलेला रुमाल टाकून त्यावर ठेवलीं. व मुलांनीं आवडीनें समोर थोडीं चित्रें, बाहुल्या, दिवे वगैरे मांडले.

सुवासिनींना 'वाण' देण्यासाठीं चांगलें दीड पेला विरजण मावेल एवढीं चिनी मातीचीं 'बकमें' ऊर्फ 'सट' आणलीं होतीं व बुलबुलच्या मैत्रिणींना देण्यासाठीं वेताच्या छोट्या पर्सेस व चंदूच्या मित्रांना देण्यासाठीं हातरुमाल मुलांना नकळत आणले होते. आतां आपल्या मित्रमैत्रिणींना आईप्रमाणें आपण हीं वाणेंहि द्यावयाचीं हें कळून मुलें फारच आनंदलीं.

बुलबुलच्या शेजारपाजारच्या मैत्रिणी व शाळेंतील बऱ्याचशा वर्गभगिनी आल्या. गुलाब मात्र आली नाहीं. तिचा 'प्रसाद' मिळालेल्या त्या २।३ मुली हाताला पट्टया बांधून आल्या होत्या.

गच्चींत ह्या छोट्या लोकांनीं खूप मजा केली. मुलींच्या फुगड्या, झिम्मा, मुलांची लंगडी, आंधळी कोशिंबीर वगैरे खेळ झाले. मुलांच्या खेळांत मुलींनींहि भाग घेतला. अगदीं सात वाजून गेले, उमाबाईंच्या सगळ्या निमंत्रित बायका येऊन गेल्या तरी मुलांना घरीं जाववेना. मुलांसाठीं ठेवलेला, घरगुती सरबताचा खास कार्यक्रमहि आटोपला. नि मग उशीरच झाल्यामुळें नाइलाजानें मुलगे व मुली जावयास निघालीं. शंकरराव नुकतेच घरीं येऊन मुलांचा आनंद पहात तिथेंच उभे होते.

इतक्यांत एका मुलानें दुसऱ्याला म्हटलें, "ए रवी, चल रे, जाऊं या आतां."

तें ऐकतांच म्हाळसाकाकूंची सुंद्री फिसकन् हंसत उद्गारली, "काय पण नांव! म्हणे रवी! ताक घुसळायचंय का हो ताक? ही बघा, रवी आहे आयती!"

सुंद्रीच्या ह्या शब्दांनीं रवीच नव्हे, तर त्याची बाजू घेऊन सर्वच मुलगे चिडले. व मग 'मुलींचीं नांवं तरी काय असतात?' 'सुंद्री—बांद्री' वगैरे बोलण्यास त्यांनीं सुरुवात केली. आतांपर्यंतचें स्नेहाचें, गंमतीचें, वातावरण पार नष्ट झालें व मुलामुलींचे दोन वेगळे तट पडले.

एवढ्यांत बुलबुल पुढें होऊन म्हणाली, "अरे, असे कां चिडतां? रवी म्हणजे साधी, ताक घुसळण्याची रवी नव्हेच मुळीं! देवांनीं आणि राक्षसांनीं समुद्रमंथन केलं ना, त्या वेळीं वापरलेली छानशी रवी हो! कळलं ना सुंद्रे?"

बुलबुलच्या ह्या शब्दांनीं मुलांचा खवळलेला समुद्र बरीक लगेच शांत झाला.

ज्या मुलांमुलींना समुद्रमंथनाची कथा ठाऊक होती त्यांना गंमत वाटली व ज्यांना ती ठाऊक नव्हती त्यांना उत्सुकता वाटली व त्यांनीं बुलबुलला म्हटलें, "समुद्रमंथन म्हणजे काय ग? अन् त्या वेळीं कसली रवी वापरली होती? आम्हांला सांग ना ती गोष्ट—अगदीं थोडक्यांत, लौकर सांग म्हणजे फार उशीर नाहीं होणार आम्हांला—हं, सांग."

"अय्या! थोडक्यांत नि लौकर सांगायचं मला नाहीं जमणार! माझ्या बाबांनीं ती मला सांगितली. तेव्हां त्यांनाच तुम्हांला ती सांगण्याची मी गळ घालतें म्हणजे झालं!"

बुलबुलचें मघांपासूनचें चातुर्य पाहून शंकररावांना भारी कौतुक वाटलें होतें. त्यामुळें बुलबुलनें त्यांना गोष्ट सांगण्याबद्दल विचारतांच त्यांनीं मोठ्या आनंदानें हें कबूल केलें.

त्या सर्व बालश्रोत्यांना खालीं बसावयास सांगून ते म्हणाले, "हं, आतां ऐका समुद्रमंथनाची कथा—महाभारत म्हणून आपला ग्रंथ आहे ना? त्याच्या आदि पर्वांत समुद्रमंथनाची ही कथा सांगितली आहे. भगवान् नारायणानें एकदां ब्रह्मदेवाला सुचविलं कीं, 'हे ब्रह्मदेवा, अमृत मिळवण्यासाठीं देव व राक्षस ह्यांनीं क्षीर-समुद्राचं मंथन करावं. म्हणजे त्यामधून अमृत निघेल. त्यासाठीं तुम्ही सर्व औषधी व रत्नं जमवून तीं समुद्रांत मिसळा व त्याचं मंथन करून अमृत काढा.'—ह्याप्रमाणें करण्याचं ठरल्यावर शेष नांवाच्या सापाकडून मंदर पर्वत उपटून आणून तो त्या समुद्रांत रवी म्हणून उभा ठेवला व ह्या रवीभोंवतीं बांधण्यासाठीं वासुकी नांवाच्या सापाचा दोरीऐवजीं उपयोग करून एका बाजूला देव व दुसऱ्या बाजूला राक्षस उभे राहिले व ह्या मंदर रवीनें त्यांनीं क्षीरसमुद्र घुसळला. तेव्हां त्यांतून चौदा रत्नं निघालीं. आपल्या लग्नसमारंभांत 'लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा' हा श्लोक म्हणतात ना, त्यांत ह्या चौदाहि रत्नांचीं नांवं आहेत. नि त्यांपैकीं एक जसं सर्वोत्कृष्ट अमृत होतं तसं एक हलाहल ह्या नांवाचं अतिउग्र विषहि होतं. त्या विषाच्या निव्वळ वासानेंसुद्धां सगळं त्रैलोक्य मूर्च्छित झाल्यामुळें ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरून श्रीशंकरानें तें विष पिऊन टाकलं व त्यामुळें त्याचा कंठ निळा होऊन त्याला नीलकंठ असं नांव पडलं! अशी कथा आहे ही! कळलं?"

मुलांना ही कथा कळली व आवडली. आणि मघांचा तो आपापसांतला तंटा व मतभेद विसरून शंकररावांनीं सांगितलेल्या ह्या अमृतमंथनाच्या कथेवर विचार करीत सर्व मुलें आपापल्या घरीं गेलीं.

× × ×

· ८ ·

# ताईचा 'दादा'

अशा रीतीनें दिवस जातां जातां बुलबुलची मराठी तिसरीची परीक्षा झाली व तिचा दुसरा नंबर येऊन ती चौथींत गेली.

चौथी इयत्ता म्हणजे मराठी शाळेच्या मंदिराचें शिखर! त्यामुळें चौथींत जाणें म्हणजे मुलांमुलींना त्या वयांत मोठेंच कर्तृत्व वाटत असतें! नि तीं चौथीचीं पुस्तकें विकत घेणें—अहा! एक मोठा सोहाळाच असतो तो! अर्थातच बुलबुल ह्याला अपवाद नव्हती!

पण चंदूला त्यांतलें कांहीं कळत नसूनहि तो ताईच्या आनंदानेंच आनंदला होता.

खरंच, आपल्या माणसांच्या सुखदुःखांशीं सहजीं तादात्म्य पावण्याची बाळपणींची ही वृत्ति जर मोठेपणीं टिकली तर माणसांचे परस्परसंबंध किती सुखकारक होतील? पण तें शक्य होत नाहीं. जगाच्या व्यवहारी बाजाराशीं संबंध आल्यावर बाळपणींच्या ह्या विशुद्ध भावनांना नकळत हिणकस स्वरूप येऊं लागतें. माझें तें तुझें नि तुझें तें माझें ही बाळपणींची गोड, निष्पाप मनोवृत्ति बदलून माझें तें माझें नि तुझें तें तुझें ही व्यवहारी रोखठोक भावना मनाचा ताबा घेते!

पण चंदू अजुनि लहान म्हणून निष्पाप असल्यामुळें तो बुलबुलच्या आनंदाशीं संपूर्णपणें समरस झाला व मोठ्या हुरुपानें बुलबुलबरोबर पुस्तकांच्या खरेदीसाठीं भटकला!

दरवर्षी उन्हाळ्यांत उमाबाई मुलांसह लोणावळ्यास जात. शंकररावांच्या साहेबांचे लोणावळ्याला बंगले होते. त्यांतील एका बंगल्यांतील आउट हाऊस ते शंकररावांना थोड्या भाड्यांत देत. यंदाहि बुलबुलच्या शाळेला सुटी पडतांच उमाबाई मुलांसह लोणावळ्यास गेल्या. शंकररावांच्या जेवणाचे हाल होऊं नयेत म्हणून केशव स्वयंपाक्याला त्यांनीं मुंबईलाच ठेवलें व तिथें धुण्याभांड्यांसाठीं सुका गडी लावून विश्रामला लोणावळ्याला नेलें.

दर वर्षींचा उमाबाईंचा हाच प्रघात होता. लोणावळ्यास आल्यावेळीं त्या स्वतः स्वयंपाक करीत. त्यामुळें बुलबुलला आपोआपच त्यांच्या हाताखालीं लुडबुडण्याची लहान वयापासूनच इच्छा व संवय झाली. व आपण हातांनीं स्वयंपाक करणें कमीपणाचें नाहीं अशी तिची मुळापासूनच धारणा झाली.

आजकाल, खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या कुटुंबांत स्वयंपाकाला बाई किंवा ब्राह्मण ठेवण्याची रीत असल्यामुळें मुलींना स्वयंपाक करणें अपमानास्पद, कमीपणाचें वाटतें. आपल्या लेकीच्या कानांत तें वारें शिरूं नये म्हणून उमाबाईंनीं पहिल्यापासूनच अशी खबरदारी घेतल्यामुळें लोणावळ्याच्या मुक्कामांत भाजी मोडणें, तांदूळ निवडणें, कणिक भिजवणें, ताक करणें, वाटणें वगैरे कामें बुलबुल अगदीं आवडीनें करीत असे.

मुलींच्या सर्वांगीण शिक्षणाचा हा एक आवश्यक भाग आहे अशी खात्री पटल्यामुळें बुलबुलचें मन ह्या गृहकृत्यांत रमे. शिवाय, प्रत्येक गोष्टीची उपयुक्तता मुलांना पटवून ती करण्याची गोडी त्यांना लावावयाची अशी उमाबाईंची पद्धत असे. निव्वळ वडीलकीच्या जोरावर किंवा माराच्या अगर शिक्षेच्या धाकानें मुलांनीं आपली आज्ञा पाळावी ह्यांत त्यांना आनंद वाटत नसे. त्यामुळें आईबाबांनीं सांगितलेली प्रत्येक गोष्ट आपल्या हिताची असते असें वाटून बुलबुल व चंदू त्यांची हरेक आज्ञाच काय, क्षुल्लक इच्छासुद्धां मोठ्या आवडीनें पाळीत.

शंकरराव व्यायामाचे मोठे चहाते होते. व त्यांनीं शिकविल्याप्रमाणें मुलें रोज सकाळीं नियमानें नमस्कार, बैठका वगैरे व्यायाम करीत.

चंदूनें मुलांना व्यायाम करतांना जेव्हां पहिल्यांदा पाहिलें त्या वेळीं त्याची अशी कल्पना झाली कीं समोरासमोर राहून हीं दोघें एकमेकांशीं मारामारी

करीत आहेत. त्यामुळें तो जरा गोंधळला. या भांडणांत चुकी कोणाची आहे हें त्याला कळेना. पण त्याला ह्या घरीं आल्याला दोनच दिवस झालेले होते तरी चंदूची आपल्यावरील माया त्याला चांगली कळून आली होती. त्यामुळें आपल्या कोणत्याहि चुकीवर पांघरूण घालणाऱ्या चंदूची बाजू आपण घेणेंच योग्य असें त्याला वाटलें व तो बुलबुलच्या अंगावर ओरडूं लागला. अर्थातच हें पाहून चंदूला व बुलबुलला गंमत वाटली व तीं दोघें हसूं लागलीं. त्याबरोबर हें भांडण नसून कुत्र्यांच्या जातींत न आढळणारी ह्या माणसांची ही कांहीं तरी मौज आहे अशी चंबूची खात्री झाली व तो गप्प राहिला.

मात्र त्यानंतर रोज व्यायामाच्या वेळीं चंबू हजर राही व मुलें व्यायाम करतेवेळीं तो येरझारा घालीत राही. चंदू म्हणे कीं, हा त्याचा व्यायाम आहे!

लोणावळ्यास आल्यावरहि मुलें नियमित व्यायाम करीत व सकाळीं, संध्याकाळीं पायीं हिंडत.

उमाबाईचें लोणावळ्यास जाण्याचें ठरतांच आदल्या दिवशीं राधाकाकू त्यांच्याकडे आल्या व म्हणाल्या, " उमाबाई, माझी एक विनंति मान्य कराल का? "

उमाबाई किंचित हसून उत्तरल्या, " विनंति? इश्श! अशा नाटकी भाषेंत कां आज बोलतांय काकू! सांगा ना काय तें."

" म्हणजे असं कीं, तुमच्या मुलांना जशी रीतभात आहे तशी माझ्या पहाण्यांत तरी दुसऱ्या कोण्णाच्या मुलांना नाहीं. आमचा बंड्या तसा बरा आहे हो! पण अंमळ दंगेखोर आहे, बाई. तेव्हां ८।१० दिवस लोणावळ्याला तुमच्या हाताखालीं ठेवून तुम्ही जर त्याला सुधाराल तर फार बरं होईल! मग कराल कां एवढं?"

" हें बघा, काकू. आम्ही उद्यां सकाळच्या गाडीनें जाणार. तेव्हां उद्यां आमच्याबरोबर बंड्याला न्यायला जुळणार नाहीं. पण ह्यांना मी आज सांगतें नि त्यांनीं परवानगी दिली तर पुढल्या शनिवारी लोणावळ्याला येतांनां ते बंड्याला आणतील. अं? "

व त्याप्रमाणें शंकररावांनीं परवानगी देतांच उमाबाईनीं राधाकाकूंना कळविलें होतें आणि ह्या योजनेनुसार दुसऱ्या दिवशीं बंड्या लोणावळ्यास येणार होता. त्यामुळें बुलबुलचंदूला व विशेषतः चंदूला फार आनंद झाला होता.

आदल्या संध्याकाळीं फिरावयाला जाण्यासाठीं कपडे करण्याची सूचना उमाआईनीं देतांच चंदू म्हणाला, "उद्यां संध्याकाळीं बंडू असणार आपल्याबरोबर, ताई. गंमत वाटेल नाहीं ग, उद्यां? आम्ही दोघे मुलगे—" चंदू बोलतां बोलता एकदम थांबला व मग घाईघाईनें म्हणाला, "ए ताई, तूं माझा भाऊ होणार होतीस तें राहिलंयच कीं ग—आतां उद्यां बंड्या आल्यावर तूं मुलगा हो. म्हणजे आपण तिघे मुलगे—"

"ऊं हूं—चंदू, तुला हवंच असलं तर मी आज मुलाचे कपडे घालतें, पण तो बंड्या आल्यावर मी नाहीं घालणार."

"बरं. आज तर आज. पण ताई, कसली पॅंट आवडेल तुला? निळी कीं पांढरी? कीं खाकी आणूं?" चंदूनें केवढ्या हुरुपानें प्रश्न केला. पण मागें, चंदूला आपली 'बहीण' बनवितेवेळचा बुलबुलचा हुरूप आतां पार मावळला होता. फक्त दिलेला शब्द मोडावयाचा नसतो, ही आईची शिकवण मनांत ठसली असल्यामुळें तिला चंदूचा 'दादा' बनणें भाग होतें!

चंदूनें धांवत जाऊन आपला एक निळ्या काड्यांचा शर्ट व लांडी पॅंट आणली.

आतां सगळा उलटा प्रकार झाला. बुलबुलचा फ्रॉक चंदूला पायघोळ झाला होता. तर चंदूचा शर्ट बुलबुलला दाटूं लागला व लांडी पॅंट अगदीं चड्डीएवढी झाली. आणि बुलबुलच्या वेण्या आतां वेगळ्या रीतीनें अडवूं लागल्या. बुलबुलला आधींच चंदूची टोपी लहान झाली असती, त्यांत तिच्या वेण्या दिसूं नयेत म्हणून त्यांचा डोक्यावर गोळा करून त्यावर ती टोपी बसविण्याची चंदूची धडपड कशी यशस्वी होणार?

एवढ्यांत चंदूला कांहीं तरी आठवलें. त्यानें पटकन् आंतून शंकररावांची काळी घडीची टोपी आणली व बुलबुलच्या वेण्या डोक्यावर ठेवून त्यावरून ती टोपी घातली.

मागें चंदूला आपली 'बहीण' करतेवेळीं त्याच्या वेण्यांचा अभाव बाबांच्या काळ्या पायमोज्यांच्या मदतीनें बुलबुलनें भरून काढला होता. आतां बुलबुलला आपला 'दादा' करतेवेळीं तिच्या वेण्यांचा अभाव बाबांच्या टोपीच्या मदतीनें चंदूनें निर्माण केला.

चंदूची लांडी, घट्ट शॉर्टस्, दाटणारा शर्ट, बाबांची सैल टोपी व स्वतःचे बायकी, उंच टाचांचे बूट अशा घेडगुजरी पेहरावांतील हा 'दादा' चंदूला 'छान'च वाटला !

तो मनापासून उद्गारला, "एहेऽ! ताई, आतां तूं थेट मुलगा दिसतेस बघ—अरेच्चा! अग, कुंकवाचा थोडासा डाग दिसतोय कीं कपाळाला—" असें बोलत चंदूनें आपल्या सदऱ्याच्या टोकानें तो डाग नीट पुसून काढला व तो आनंदानें म्हणाला, "हंऽ हंऽ! आतां मात्र सुरेखच जमलं ताई,—नव्हे, दादा. दोघे भाऊ झालों हं आपण--चल, आईला तिचे दोन मुलगे दाखवूं या." मागचे ताईचे शब्द आठवीत चंदूनें मोठ्या आवडीनें असें म्हटलें खरें; पण बुलबुल पटकन् उत्तरली, "चंद्या, तुझ्या ह्या घट्ट होणाऱ्या कपड्यांमुळें जखडल्यागत वाटतंय् मला. एक पाऊलसुद्धां चालवणार नाहीं माझ्यानें. आईलाच तूं बोलाव हवं तर इथें—" व मानेला दिलेल्या झटक्यामुळें भुंवयांपर्यंत खालीं आलेली बाबांची सैल टोपी तिनें हळूच वर सरकविली.

एवढ्यांत चंदूच्या मागून उमाबाई तिथें आल्या.

मुलीच्या वेषांत चंदू जसा विचित्र दिसत होता तशी बुलबुल कांहीं विचित्र दिसत नव्हती असें उमाबाईंच्या मनांत आलें. पण हा तुलनात्मक शेरा उघड न करतां त्या म्हणाल्या, "वा! बरा दिसला हं चंदूचा दादा!"

"बरा म्हणजे काय? छानच, सुरेखच दिसला!" चंदू उड्या मारीत ओरडला.

तें ऐकून बुलबुलला व उमाबाईंना हसूं आलें. "खरंच बुलबुल," उमाबाईंनीं विचारलें, "तुझ्या नेहमींच्या फ्रॉकपेक्षां हे कपडे जास्त सुटसुटीत वाटत असतील ना?"

"आई, ते माझ्या अंगचे असते तर वाटले असते कदाचित् सुटसुटीत! पण चंदूचे हे कपडे मला घट्ट नि तोकडे होताहेत ना? बरं, चंदोबा, आतां उतरतें हं मी हा उसना वेष!"

"हें ग काय? एवढ्यांतच काढतेस हे कपडे?—मग ताई, तूं कशी छान दिसते आहेस तें तरी पहा एकदां आरशांत—"

वस्तुतः बुलबुलला हें दादापण फारसें आवडलें नसलें तरी चंदूनें दोनदां

मनापासून स्तुति केल्यामुळें व आतां उमाबाईच्या चर्येवरहि कौतुक दिसल्यामुळें आपण कशा दिसत असूं ह्याबद्दल तिलाहि कुतूहल वाटत होतेंच. त्यामुळें आरशांत पहाण्याच्या चंदूच्या सूचनेचा लगेच फायदा घेत बुलबुल आंत पळाली.

घट्ट कपड्यांमुळें तिला मघां एक पाऊलहि टाकणें जड वाटत होतें नि आतां बरी पटकन् ती नेहमींसारखी धांवत गेली. व आरशांत स्वतःचें तें वेषांतर पाहून तिला गंमत वाटली. पण तसें उघड न बोलतां आपल्या नेहमींच्या मुत्सद्दी वृत्तीनें ती म्हणाली, "चंदू, तूं म्हटलंस तेंच खरं हं. तुझा 'दादा' कांहीं अगदींच टाकाऊ दिसत नाहीं!"

भाबडा चंदू खूष होऊन उत्तरला, "वाः वाः! टाकाऊ कसली दिसते आहेस तूं? तूं किनई,—खरंच, ताई, टाकाऊ ह्याच्या उलट शब्द काय ग?"

"टाकाऊ ह्याच्या उलट? अं —" बुलबुललाहि प्रश्न पडला.

"ताई, धराऊ काय ग?" चंदूनें सुचविलें.

"धराऊ? छट्! कांहीं तरीच बोलतोस तूं, चंदू —"

"मग टाकणं ह्याच्या उलट धरणं नाहीं का?" चंदूनें विचारलें.

"तें खरं रे. पण टाकाऊप्रमाणें धराऊ नाहीं कांहीं म्हणत —" बुलबुलनें म्हटलें.

"मग काय म्हणतात तर?"

आलाच परत तो प्रश्न!—पण बुलबुल मोठी प्रसंगावधानी होती. ती हंसून म्हणाली, "अरे, मघां तूं म्हटलंस त्याप्रमाणें छान, सुरेख, उत्तम असंच कांहीं तरी म्हणायचं. कळलं?"

एरवीं चंदूनें ह्यावर ताईकडे कित्ती वाद घातला असता! पण आज ताईनें आपला शब्द मानला व मुलाचे कपडे केले ह्यामुळें तो तिच्यावर एवढा खूष झाला होता कीं, त्या भरांत त्यानें तिचें हें सांगणें कळल्याचें व पटल्याचें दर्शविलें. व तो हंसून म्हणाला, "मग ताई, तूं ह्याच कपड्यांत चल कीं फिरायला. अं?"

"अरे, पण हे कपडे मला भारी घट्ट होताहेत. ते घालून हिंडायला कसं जात्रवेल रे मला? तूं जसा थोडा वेळ बहीण झालास तशी मी थोडा वेळ भाऊ झालें! संपलं!"

बुलबुलच्या ह्या बोलण्याला चंदूनें मान्यता दिली. त्या क्षणीं बुलबुलनें त्याला शंभर हुकूम फर्मावले असते तरी त्यानें ते मुकाट्यानें बजावले असते! कारण साधारणतः, वडील माणसांनीं सांगावयाचें व लहानांनीं त्याप्रमाणें वागावयाचें अशी आपली वागण्याची पद्धत असल्यामुळें एकाद्या वेळीं मोठ्या माणसांनीं लहानाचें ऐकलें कीं, आपला कांहीं तरी मोठा मान केल्यासारखें लहानाला वाटून त्या मोठ्या माणसाबद्दल विशेषच आदर व कौतुक वाटतें!—मोठ्या माणसानीं अधूनमधून करून पहाण्यालायक प्रयोग आहे हा! ह्यामुळें लहान मुलें चढेल होतील असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं! लहानाला, त्याचप्रमाणें मोठ्यालाहि शाबासकी जशी उत्तेजनपर वाटत असते तसेंच आहे हें! पूर्वीपासूनच चंदूला बुलबुलची फारच अपूर्वाई वाटत असे ती ह्या घटनेमुळें आणखीच वाढली! तो स्वःतवर, ताईवर व साऱ्या जगावरच बेहद्द खूष झाला!

× × ×



‘ ताई ’चा ‘ दादा ’ !

## .१.

## बंडूच्या सहवासाचा छोटा परिणाम !

दुसऱ्या दिवशीं बंडू शंकररावांबरोबर लोणावळ्यास आला तो फारच आनंदांत.—व त्याला पाहून चंदूला व बुलबुललाहि आनंद झाला तरी उमाबाईंना मात्र थोडी भीति वाटली.

—नाहीं तरी बंडूला आपल्या घरीं लोणावळ्यास रहावयास येण्याची परवानगी द्यावी कीं न द्यावी ह्याबद्दल निश्चित ठरवितांना त्या उभयतांना जरा विचारच पडला होता. कारण बंडूच्या हूडपणाचा व त्या भरांत प्रसंगीं वडील माणसांची अवज्ञा करण्याचा कित्ता तर आपलीं मुलें गिरविणार नाहींत ना, अशी रास्त भीति त्यांना वाटली—

—पण पुनः त्यांच्या मनांत आलें कीं, चंदू मुलगा आहे. मुलाच्या जातील जरा दंगामस्तीची, धिटाईची आवड असणेंच इष्ट ! त्यांतून आपलीं मुलें कांहीं बंडूच्या घरीं रहावयास जाणार नाहींत; बंडूच इथें येणार आहे. म्हणजे, मुलें आपल्या नजरेखालींच बसणार, उठणार, खेळणार ! तेव्हां बंडूच्या सहवासाचा अनिष्ट परिणाम होऊं लागला तर तो आपल्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं व मग वेळींच आळा घालतां येईल आपल्याला—

असा सर्व आगाऊ विचार जरी उमाबाईंनीं केला होता तरी बंडू प्रत्यक्ष येतांच व आपल्याला झालेला आनंद व्यक्त करण्यासाठीं त्यानें आल्याबरोबर पुढल्या लांब रुंद ओटीवर ४।६ गोलांट्या मारतांच व लगेच चंदूनें त्याचें अनु-

करण करण्याच्या प्रयत्नांत आपला डावा खांदा थोडा लचकून घेतांच उमाबाईंना जरा भीति वाटलीच—पण त्यांनीं मुलांना तसें दिसूं दिलें नाहीं. मात्र त्यामुळें बंडूची मस्ती थोडी मर्यादित राहील ह्या कल्पनेनें त्यांनीं बंडूच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें, "बंडू, बाळ, इकडे मजा करा—आनंदांत रहा हं. मात्र बुलबुल नि चंदू तुझ्यापेक्षां लहान आहेत हें लक्षांत ठेवून त्यांच्याशीं खेळ हो, तूं."

अर्थातच बंडूनें हें लगेच कबूल केलें. पण तोंडानें कबूल केलेल्या साऱ्याच गोष्टी बंडूसारखीं आडदांड मुलें थोडींच आचरणांत आणतात?

दुसऱ्याच दिवशीं सकाळीं तिन्ही मुलें चंबूसह बागेंत खेळत असतांना झाडाच्या शेंड्यावर असलेला एक कच्चा पेरू काढण्यासाठीं बंडू पेरूच्या झाडावर चढूं लागला. त्यासरशीं बुलबुल म्हणाली, "बंडू, अरे, पेरू पिकूं दे तो. मग माळ्याला विचारून तो काढायचा असं आईनें सांगितलंय्. मालकांचीं आहेत हीं सारीं फळं, फुलं—"

"मालकांचीं? तीं कशीं? तुम्हीं भाडं नाहीं का त्याला दिलंत? मग तुम्ही इथें असेतोंवर तुमचाच हक्क आहे ह्या सर्वांवर! मुंबईला आमच्या ब्लॉकवर आमचाच हक्क मानतों आम्ही — ए बुलबुल, एक जंमत सांगूं का तुला? अग, आमचा मालक आम्हांला खूप सांगतो कीं, खिळेबिळे मारूं नका म्हणून — पण मी रोज माझ्या खोलीच्या भिंतींना २।४ खिळे मारतो व दुसऱ्या दिवशीं तेच उपटून दुसऱ्या जागीं मारतों!—" बंडूनें ऐटींत सांगितलें.

पण बुलबुल उत्तरली, "हें बरं नव्हे हं, बंडू. आम्हीहि भाड्याच्या जागेंतच रहातों मुंबईला. पण आपलं घर शक्य तेवढं स्वच्छ, सुरेख ठेवण्याबद्दल आई, बाबा नेहमीं बजावतात आम्हांला. आपण भाड्याची जागा गलिच्छ ठेवली, खराब केली तर घरमालकाचं तर नुकसान होतंच, पण दुसऱ्याची वस्तु वाईट रीतीनें वापरण्याचं पाप आपल्या हातून घडतं व आपल्याला गलिच्छ घरांत रहावं लागतं!" बुलबुलनें आपल्याला मिळालेलें ज्ञान बंडूला पुरविलें पण त्याला तें मुळींच पसंत पडलें नाहीं. तुच्छतापूर्वक हंसून तो म्हणाला, "अग, मग म्हाळसाकाकूंच्या मुलांच्या एकेक लीला ऐकून तूं काय म्हणशील तर? घरमालकानें रंग काढून द्यावा भिंतीला, जमिनीला थोडंसं उखणलं असेल तें दुरुस्त करून

द्यावं, म्हणून सुंद्री नि तिचा भाऊ वामन मुद्दाम भिंतींचा रंग आणखी खरवडून काढतात. जमिनीचे व भिंतींचे ढलपे ओरबडून काढतात. व मग झक्कत घर-मालक डागडुजी करून देतो."

"आणि म्हाळसाकाकू मुलांना रागावत नाहींत ?"

"त्या कां रागावणार? अग, त्या मुलांना ह्या कामीं मदतच करतात ना?"

हें ऐकून बुलबुलला धक्काच बसला. ह्यावर ती काय बोलली असती कोण जाणे! पण सुंद्रीच्या व वामनाच्या ह्या लीला वर्णन करण्यांत रंगलेल्या बंडूचें अवधान सुटून तो तेवढ्यांत झाडावरून खालीं पडला. पडतांना त्याचा पाय एका गुलाबाच्या कुंडीला लागून ती फुटली व बंडूला थोडेंसें ओरखडलें.

हा सर्व प्रकार पाहून बुलबुल व चंदू घाबरलीं—वाईट तोंड करून बुलबुल म्हणाली, "बंडू, मालकाची कुंडी फुटली तुझ्याकडून. आतां भरून द्यावी लागेल ती."

"भरून द्यावी लागेल? अरे ज्या! आपण मुळीं नाकबूलच करायचं. बुल-बुल, तो बघ तिकडे माळ्याचा शेंबडा पोरगा उभा आहे. त्यानें ही कुंडी फोडली असं सांगू या आपण उमाकाकूंना, म्हणजे संपलं! तो माळी नि त्याचा मालक काय तें पाहून घेतील!"

"वा:! म्हणजे आई सांगते तसे एकाच्या ऐवजीं दोन अपराध करूं आपण. पहिला अपराध कुंडी फोडण्याचा नि दुसरा अपराध खोटं बोलून तो अपराध त्या बिचाऱ्या निरपराधी पोरावर ढकलण्याचा! मी नि चंदू मुळींच असं करणार नाहीं. आम्हीं आत्तां जाऊन आईला सारं सांगतों."

"शांगतों—शांगतां म्हणे—काय श्यांगतों ग?" बंडूनें वेडावीत प्रश्न केला.

"सांगतों कीं, आमच्या हातून कुंडी फुटली. "बुलबुलचें हें उत्तर ऐकून बंडूला हुश्श झालें. तरीसुद्धां पुरती खात्री करून घेण्यासाठीं त्यानें विचारलें, "म्हणजे माझं एकट्याचंच नांव तुम्ही नाहीं सांगणार उमाकाकूंना?"

"ऊंहूं! बाबांनीं आम्हांला सांगितलंय् कीं, आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांची शक्य तों गैरसोय किंवा बदनामी करूं नये. पूर्वी तर पाहुण्याला देवासारखा मान देत म्हणे! ह्याला आ-आ—आतिथ्यधर्म म्हणतात!" बुलबुलनें

सांगितलेली ही माहिती चंडूला समजलीच नाहीं. नि तेंहि बरोबरच म्हणा! कारण पाहुण्यांच्या भावनांचे चोज पुरविणाऱ्या ह्या आतिथ्यधर्माची व त्याची तोंड-ओळखहि नव्हती! त्याच्या घरीं जे पाहुणे येत त्यांचीं मुलें चंडूच्या सवाई दंगेखोर व वांड असल्यामुळें स्वतः आगळीक करून तीं मुलें खुशाल चंडूच्या माथीं मारीत व मग त्यांच्याहून वरच्या सप्तकांत चंडू आरडाओरड करी. त्यामुळें पाहुण्यांचें कौतुक करण्याचें हें त्रांगडें कांहीं त्याला कळलें नाहीं. पण एकंदरींत आपण सहीसलामत सुटणार एवढें मतलबापुरतें त्याला कळलें व तो खूष झाला.

बुलबुल व चंदू घरांत गेलीं. व वस्तुतः त्यांच्या हातून न घडलेल्या गुन्ह्याचा त्यांनीं उमाबाईकडे कबुलीजबाब दिला.

तो ऐकून उमाबाई क्षणमात्र स्तब्ध राहिल्या. गेले आठ दिवस बागेंत खेळत असूनहि फुलझाडाला हातसुद्धां न लावणाऱ्या आपल्या मुलांनीं आज कुंडी फोडली? खरें असेल हें? पण आपली ही शंका उघड न करितां त्या म्हणाल्या, "मुलांनों, आतां मालकांची कुंडी आपल्याला भरून देणं भाग आहे. त्याचप्रमाणें तुमच्या हातून ही जी चुकी घडली आहे तिची शिक्षाहि तुम्हीं भोगली पाहिजे. परंतु तुम्हीं आपली चुकी कबूल केलीत म्हणून तुम्हांला शिक्षा थोडीच करणार मी. आजपासून चार दिवस तुम्ही दोघांनीं बागेंत पाऊल ठेवतां नये. अन् आजपासून तुम्ही आपापले कपडे धुवायचे, बिछाने घालायचे व काढायचे. नि ह्या कामासाठीं तुम्हां दोघांना मी प्रत्येकीं २-२ आणे देईन. हे पैसे कुंडी विकत घेण्यासाठीं तुम्ही जमवायचे. कळलं?"

"होय, आई." बुलबुल व चंदू एकसुरांत उत्तरलीं. व लगेच शिक्षा अंमलांत आणण्यांत आली.

पहिल्या दिवशीं चंडूनें तिथें फारसें लक्ष दिलें नाहीं. बुलबुल व चंदू कामें करीत असतांना तो खुशाल शीळ घालीत किंवा पायऱ्यांवरून उड्या ठोकीत राही. त्याचप्रमाणें त्या दोघांना बागेंत जाण्याची मनाई होती तर बाग जणुं आपल्या मालकीची असल्याच्या दिमाखांत चंडू बागेंत बागडे. पण हा त्याचा उत्साह वरकरणी होता व तो जेमतेम दोन दिवस टिकला.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यापासून तो गप्प गप्प होता. शेवटीं दहा वाजण्याच्या सुमारास तो स्वयंपाकघरांत गेला.



'बंडू, मालकाची कुंडी फुटली तुझ्याकडून—आतां भरून द्यावी लागेल ती !'

परकराचा कासोटा मारून बुलबुल चटणी वाटीत होती. व नुकत्याच सोलून झालेल्या चवळीच्या शेंगांची फोलपटें चंदू व विश्राम गोळा करीत होते. उमाबाई चवळीच्या दाण्यांची उसळ फोडणीस टाकीत होत्या.

बंडूला पहातांच त्या म्हणाल्या, "भूक लागली होय, बंडू ? आतां होईल हं जेवण. ही उसळ शिजेस्तंवर मी पोळ्या करतें, बरं."

उमाबाईंचे प्रेमळ शब्द ऐकतांच बंडूचा धीर सुटला. आवंढा गिळून तो म्हणाला, "नाहीं काकू, त्यासाठीं नाहीं आलों मी. माझा अ–अपराध कबूल करायला आलोंय् मी. ती कुंडी माझ्या हातून फुटली. बुलबुल नको म्हणत असतां मी पेरूच्या झाडावर चढलों व बोलण्याच्या भरांत तोल सुटून मी खालीं पडलों नि पडतांना माझा धक्का लागून कुंडी फुटली नि हें पहा त्या वेळीं माझ्या पायानाहि ओरखडलं. काकू, ह्या चुकीबद्दल मला काय ती शिक्षा करा. मी ती मुकाट्यानें भोगीन. पण बुलबुल चंदूनीं निष्कारण शिक्षा भोगणं मला नाहीं सहन होत." बंडूचे—उनाड, दांडगा, बेशिस्त म्हणून गाजलेल्या व आपल्या ह्या 'गुणां'ची त्यांना नुकतीच थोडी चुणूक दाखवणाऱ्या बंडूचे—हे पश्चात्तापाचे शब्द ऐकून उमाबाईंना साश्चर्य समाधान वाटलें. बंडूच्या तोंडावरून हात फिरवीत त्या म्हणाल्या, "शाबास बंडू, तूं केवढं धैर्य दाखवलं आहेस हें आपल्या मनाचं! खरंच, इथल्या हवेचा तुझ्या शरीराबरोबर तुझ्या मनावरहि चांगला परिणाम झालेला दिसतोय् हं."

उमाबाईंची ही शाबासकी मिळतांच बंडूचा काळवंडलेला चेहरा लगेच उजळला.

उमाबाई सूज्ञ होत्या. त्यामुळें त्यांनीं बंडूच्या हातून घडलेल्या चुकीबद्दलची शिक्षा त्याला खरोखरीच त्या दिवसापासून भोगावयाला लावली. त्याचा परिणाम चांगला होणार हें त्यांनीं ओळखलें. मात्र बंडू पाहुणा असल्यामुळें त्याच्याबरोबर आपल्या मुलांची शिक्षाहि त्यांनीं चालू ठेवली. पण मुलांना त्याचा खेद वाटला नाहीं. बंडूची चहाडी केल्याचा दोष आपल्या पदरांत न येतां आपल्यावरील आरोप दूर झाला म्हणून त्यांना फारच आनंद झाला. त्यांना व उमाबाईंना किती मोकळें वाटलें. उमाबाईंनीं खरें काय तें ओळखलें होतें तरी बंडूनें आपण होऊन कबुलीजबाब देतांच त्यांना खरें समाधान वाटलें.

गेले दोन दिवस साहजिकच बंडूशीं नकळत जरा अवघडून वागणारीं तीं मुलें आतां त्याच्याशीं पूर्वींहून अधिक अगत्यानें वागूं लागलीं. त्यामुळें आपण दाखविलेल्या प्रामाणिकपणाचें सार्थक झालें असें बंडूला वाटलें. व आतां बंडू निवळला असें वाटून उमाबाईंना हुश्श झालें! पण—

× × ×

. १० .

# मोठा परिणाम !

पण उमाबाईंनीं बंडूला पुरतें ओळखलें नव्हतें हेंच खरें! चारसहा दिवस मजेंत, शांततेंत गेले.

परंतु वादळापूर्वीची शांतता होती ही!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बंडू शंकररावांबरोबर मुंबईला परत जावयाचा होता. नि आदल्या दिवशीं त्यानें एक चांगलीच चुणुक दाखवली.

नेहमींप्रमाणें हीं तीन मुलें पायीं फिरावयाला भांगरवाडीच्या बाजूला गेलीं. व तिथल्या डोंगरावर चढण्याचा बंडूनें हट्ट धरला. नाइलाजानें बुलबुल व चंदू रेंगाळत त्याच्या मागून जाऊं लागलीं. पण चंदू फार थकला नि पायथ्याशींच बसला. बुलबुल त्याच्या सोबतीला बसली. आणि निव्वळ आपला हेका खरा करण्याच्या ईर्षेनें बंडू थोडें वर जाऊन आला.

आतां उशीर बराच झाला होता. त्यामुळें ऊनहि तापलें होतें. मे महिन्यांतलें—वैशाखांतलें—घाटावरचें ऊन तें! मुलांना तहान फार लागली नि भूकहि सतावूं लागली.

घरीं लवकर पोंचावयाला हवें म्हणून मुलें झपझप् चालूं पहात होतीं. पण चंदूचा पायांत पाय अडकूं लागला. भुकेनें व तहानेनें व्याकुळ झाल्यामुळें तो रडकुंडीला आला.

एवढ्यांत वाटेंत एक भज्यांचें दुकान लागलें. ताबडतोब बंडू तिथें थांबला

व खिशांतून पावली काढून त्यानें भजीं विकत घेतलीं.

बुलबुल पटकन् म्हणाली, " दुकानांतलीं शिळीं, धुळीनें माखलेलीं भजीं कशाला विकत घेतोस ? आमची आई कांद्याचीं भजीं सुंदरच्च करते. तिला सांगू या गेल्याबरोबर करायला. अं ? असं विकतचं खाऊं नये रे."

" ऊं—मी नेहमीं अशा वस्तु खातों. भजीं, शेव-गाठ्या, भेळ—वा: ! काय खमंग असतात ह्या वस्तू ! " जिभल्या चाटीत बंडूनें वर्णन केलें व तें ऐकून चंदूनें लाळेसकट आवंढा गिळला.

भज्यांचा पुडा मुलांच्या पुढें करीत बंडू म्हणाला, " चंदू, घे ना रे एकतरी भजं. बुलबुल, तूं घे आधीं."

" ऊंहूं ! आम्ही नाहीं तीं खाणार." बुलबुल निग्रहानें उत्तरली. चंदूनें नुसतीच्च नकारार्थी मान हलवली.

" नाहीं तर नाहीं ! मीच्च खातों आपला." बंडू बोलला नि एक भलें थोरलें भजें त्यानें तोंडांत टाकलें. व मग तें खात खात बोबड्या आवाजांत तो उद्गारला,, " ओहो ! किट्टी शॉन आहेट हीं भड्डीं ! मुंबईटल्या भड्ड्यांहूनहि उट्टम ! " व त्यानें भजीं खाण्याचा सपाटा सुरू केला.

नि तें पहातांना बुलबुल-चंदूच्या तोंडाला सारखें पाणी सुटूं लागलें व तें गिळतांना त्यांची त्रेधा उडूं लागली.

जरा वेळानें बारीक आवाजांत चंदूनें विचारलें, " बंडू, खरंच छान आहेत का भजीं ? "

" अरे, छान म्हणजे काय ? अगदीं फस्सक्लास आहेत ! बघ तरी खाऊन, अं ? घे घे, हें छोटंसं." नि असें बोलत बंडूनें चंदूच्या हातांत दोन भजीं कोंबलीं व चंदूनें खालच्या मानेनें तीं भराभरा खाल्लीं.

बुलबुलच्या नाकांतहि भज्यांचा वास शिरला होता नि तिचीहि भूक खवळली होती—भज्यांवर इच्छा गेली होती. त्यामुळें चंदूला भजीं खाण्याची मनाई करण्याची इच्छा असूनहि तिच्या तोंडून ते शब्द कांहीं उमटेनात. अन् तेवढ्यांत बंडूनें तिच्याहि हातांत दोन भजीं कोंबलीं नि आपण काय करतों तें कळण्याआधींच तिनें तीं तोंडांत टाकलीं नि त्या भज्यांबरोबर चंदूला रागें भरण्याचा विचारहि तिनें गिळून टाकला.



‘ओहो ! किट्टी शॉन आहेट हीं भट्टीं !’

बंडूनें उरलेल्या भज्यांचे तीन सारखे वांटे केले व एकमेकांच्या नजरेला नजरहि न देतां बुलबुल-चंदूनीं आपापले वांटे खाऊन टाकले.

उमाबाई मुलांची वाट पहात ओटीवर उभ्याच होत्या.

" या. " मुलें दिसतांच त्या म्हणाल्या, " किती उशीर केलात हा आज ! "

" आई, आम्हीं भ—" चंदू हें बोलत असतां बंडूनें बुलबुकडे डोळे वटारून पाहिलें व त्यामुळें चंदूला पुढें बोलूं न देतां बुलबुल एकदम म्हणाली, " होय. आई, आम्ही भ—भटकलों ग पुष्कळ—"

चंदू बिचारा गप्प राहिला. त्याचें सुकलेलें तोंड व बुलबुलची कोमेजलेली चर्या पाहून उमाबाईंना हा थकव्याचा परिणाम आहे असेंच वाटलें. मुलांना तिथेंच हाततोंड धुवायला पाणी देत त्या म्हणाल्या, " हें बघा, नाक्यावरच्या गुऱ्हाळांतून ताजा उसाचा रस पाठवलाय् ह्यांनीं. हाततोंड धुवा नि प्या तो म्हणजे थंडावा वाटून शीण उतरेल—हं ? नि मग जराशानें आंघोळी करा. "

व त्याप्रमाणें मुलांना भरपूरसा रस देऊन उमाबाई स्वयंपाकघरांत गेल्या.

त्यासरशीं बुलबुल सद्गदित कंठानें बंडूला म्हणाली, "बंडू, आईपासून आम्ही कांहीं लपवीत नसतों. चंदू भजीं खाल्ल्याचं आईला सांगतोय् असं वाटून तूं मला कां रे न बोलण्याची खूण केलीस ? मीहि त्याच वेळीं सांगून टाकणार होतें सारं. पण तूं नको म्हणतांच मीं विषय बदलून टाकला. पण मला नाहीं चैन पडत. आम्ही नेहमीं प्रत्येक गोष्ट सांगतों आईला. "

" एऽ हेऽ ! अगदीं सत्यवादी हरिश्चंद्राचा अवतारच जणूं ! अग, आपल्या पोटांतलीं भजीं काय काकूंना दिसणार आहेत, होय ? मग त्यांना न सांगितलं म्हणून काय हरकत आहे ?" बंडूनें आपल्या मतें बिनतोड मुद्दा ठोकून दिला, पण अगदींच फोल ठरला तो !

सुमारें अर्ध्या-पाऊण तासानें उमाबाईंनीं चंदूला आंघोळीला हांक मारली. इतक्यांत तो म्हणाला, "आई, ताईला जाऊं दे ग आधीं आंघोळीला. मी जरा संडासांत जाऊन येतों—"

"संडासांत ? सकाळीं गेला होतास कीं तूं. मग आतां इतक्यांत कां रे पुन्हा ?" उमाबाईंनीं विचारलें.

पण ह्यावर उत्तर द्यावयाला चंदू तिथें होताच कुठें? तो संडासांत धांवला लगेच.

एवढ्यांत बुलबुलच्या पोटांत कळ आली. तिनें हळूच बंडूकडे पाहिलें, पण तो अगदीं स्वस्थपणें शीळ घालीत उभा होता.

क्षणभर चुळबळत बुलबुल म्हणाली, "आई, चंदू संडासांतून आला कीं मी जाऊन येतें संडासांत नि मग आंघोळ करतें."

त्याबरोबर उमाबाई आशंकून उद्गारल्या, "आं? हें ग काय? उन्हांतून आल्याबरोबर रस नि पाणी प्यालयाचा तर परिणाम नाहीं हा?"

कांहीं न बोलतां बुलबुल पाठच्या बाजूला गेली.

ती संडासांतून येतांच बंडूनें आपला नंबर लावला. नि एवढ्यावरच गोष्टी न थांबतां त्या तिघांनाहि लागोपाठ चारचार पांचपांच जुलाब झाले.

उमाबाईंनीं आल्या-लिंबाच्या रसांत हिंग, जिऱ्याची पूड, मीठ व साखर घालून मुलांना प्यायला दिलें. व अंमळशानें जुलाबांचा जोर मंदावला.

आंघोळी न करतां गरम पाण्यानें हातपाय धुऊन टाकण्यास त्यांनीं बुलबुलला व बंडूला सांगितलें व चंदूचे हात-पाय धुण्यासाठीं त्या त्याला मोरींत घेऊन गेल्या.

मोरींत जातांच चंदू म्हणाला, "आई ग, आज आमच्या हातून एक चुकी झाली ग. फिरून येतांना बंडूनें भजीं विकत घेतलीं नि त्याच्या आग्रहावरून आम्हीं तीं खाल्लीं. आई, त्यामुळें आमचं पोट बिघडलं असेल काय ग?"

उमाबाईंना हें ऐकून एकदम धक्का बसला. व त्या म्हणाल्या, "हो— शक्य आहे तें. दुकानांतला माल अस्वच्छ, शिळा, नासका असतो पुष्कळदां—नि सकाळच्या वेळीं तर तो ताजा असणं शक्यच नाहीं—नि तसल्या वस्तू खाणं अगदीं वाईट असं म्हणूनच नेहमीं सांगतें मी तुम्हांला."

"आई ग, मी पुनः कध्धीं असं करणार नाहीं." "चंदू बारीक आवाजांत बोलला.

चंदूनें आपण होऊन असें कबूल केल्यामुळें व जुलाबामुळें तो बराच हैराण झाला आहे हें लक्षांत घेऊन उमाबाई मग अधिक कांहीं बोलल्या नाहींत—

नाहीं तरी त्यांची पद्धत अशी होती कीं, मुलांना रीतीचें कांहीं सांगावयाचें झालें तर त्या एकदांच मोजक्या शब्दांत तें सांगत—सारखें तेंच झिजवीत रहाणें त्यांना पसंत नसे. अशा रीतीनें चावून चिकट केल्यानें मुलांवर चांगला परिणाम होण्याऐवजीं तीं निर्लज्ज बनतात, त्यांना वेपर्वाई वाटते हें त्यांना अनुभवांतीं पटलें होतें.

त्या मोरींतून बाहेर आल्या त्या मात्र कांहींशा उद्विग्न मनःस्थितींत—पण एवढ्यांत बुलबुल त्यांच्याजवळ येऊन मंद आवाजांत म्हणाली, "आई, आज माझ्या हातून एक चुकी झाली ग. दुकानांतलीं भजीं बंडूनें विकत घेतलीं नि मींहि तीं खाल्लीं."

एकूण जरा उशीरां कां होईना, पण बुलबुलनेंहि चुकी कबूल केली तर ? "हुं," उमाबाई उत्तरल्या, "अन् दुकानांतल्या शिळ्या, नासक्या भज्यांनीं आपला परिणाम गाजवला तर हा ?"

"आई, एक वेळ क्षमा कर मला—मी पुनः कधीं, कधीं असं करणार नाहीं." बुलबुल रडव्या आवाजांत म्हणाली.

त्याबरोबर तिच्या पाठीवरून हात फिरवीत उमाबाईंनीं म्हटलें, "ठीक आहे ! मी क्षमा करतें तुला आतां—पण विसरूं नकोस बरं हें."

बुलबुलनें डोळे पुसत मानेनें मनापासून होकार दिला.

उमाबाई ओटीवर आल्या. तिथें बंडू एकटाच बसला होता. उमाबाईंनीं विचारलें, "काय बंडोबा, जुलाबाचं मान कमी आलं ना आतां ?"

खालीं मान घालून बंडू उत्तरला, "होय, आलं. पण काकू, मीं दुकानांतलीं भजीं विकत घेतलीं आणि बुलबुल, चंदू खायला तयार नसतांना मीं त्यांना आग्रह करून माझ्याबरोबर खायला लावलीं. नि आतां त्याचा परिणाम भोगतोंय आम्ही—"

उमाबाई मृदु स्वरांत म्हणाल्या, "बंडू, माझ्यासाठीं एक गोष्ट करशील का तूं बाळ ?"

बंडूला भय पडलें होतें कीं, काकू आतां आपल्याला रागावणार नि उद्यांऐवजीं आजच आपली मुंबईला रवानगी करणार. त्यामुळें त्यांनीं मृदु स्वरांत

असा प्रश्न करतांच बंडू चांगलाच विरघळला. तो पटकन् बोलला, “ हो. करीन काकू. सांगा काय तें. ”

“ हें बघ, ह्यापुढें जिभेवर ताबा ठेवून विकतचा पदार्थ न खाण्याचें वचन देशील का तूं मला ? ”

“ होय काकू. नि तें मी नक्की पाळीन. काकू, तुमच्याइकडे आल्यानें खरंच माझा मोठाच फायदा झाला ! ” बंडू किंचित् अवघडत उद्गारला.

नि त्याच्या ह्या शब्दांनीं उमाबाईंना फार समाधान वाटलें. मोठ्या माणसांनीं दिलेल्या लांबलचक प्रशस्तिपत्रांपेक्षां बंडूसारख्या लहान मुलांच्या तोंडून स्वयंस्फूर्तीनें निघालेल्या ह्या शब्दांची उमाबाईंना अधिक अपूर्वाई वाटली !

व बंडूला शाबासकी देत त्यांनीं मनापासून स्मित केलें.

त्यांना भारी हुश्श् वाटलें ! वास्तविक मुलांना तीं भजींच बाधलीं असें त्यांना कांहीं निश्चित वाटत नव्हतें. अनशापोटीं शिळीं भजीं खाल्लीं तर पचायला जड जाणारच तीं ! पण त्यांतच उन्हांतून आल्याबरोबर प्यालेल्या पाण्याची नि उसाच्या रसाची भर पडली ! पण भज्यांनींच हा पराक्रम गाजविला ही मुलांची समजूत त्यांनीं मुद्दामच दूर केली नाहीं. आणि मुलांना, बंडूलासुद्धां चांगलीच दहशत बसली ही !

अन् मुलांना शिक्षाहि कमी नाहीं मिळाली ! जुलाबापायीं जीव त्रासला होताच, त्यांतच त्या दिवशीं नुसता तूप, मीठ भात खाणें भाग पडलें नि तेंहि समोर अत्यंत आवडीची कणसाची उसळ व कांदे-बटाट्याचा रस्सा दिसत असतांना !

अशा रीतीनें बंडूच्या सहवासाचे लहान-मोठे परिणाम बुलबुल—चंदूला भोवले खरे. पण उमाबाई अत्यंत दक्ष व समंजस असल्यामुळें ह्या वाईटांतून बरें निघालें ! नि तें हें कीं, बंडू पुष्कळच व कायमचा निवळला. अन् त्याच्या संगतीमुळें बुलबुल व चदू ह्यांना पायीं लांब-लांब फिरावयास जाण्याची व फारशी दुखापत होऊं न देतां मुलांच्या जातीला आवश्यक असलेला दांडगेपणा व कणखरपणा अंगांत आणण्याची चंदूला आवड उत्पन्न झाली !

मिळून तिन्हीं मुलांना परस्परसहवासापासून एकंदरींत फायदाच झाला !

नुक्रम २६६५१
वर्ग क्रा वी
क्रमांक २७३७
नों. ३।७।५१

• ११ •

# चंदू शाळकरी बनला !

ठरल्याप्रमाणें जूनमध्यें चंदूला मराठी दुसऱ्या इयत्तेत घातलें. बुलबुल त्याच शाळेंत मराठी चौथींत असल्यामुळें शाळेंत नव्यानें जाणें चंदूला तितकेंसें अवघड वाटलें नाहीं. नि त्याचा स्वभावहि बुलबुलपेक्षां अधिक बोलका असल्यामुळें व त्याच्याकडे ट्रॅमचीं व बसचीं किती तरी तिकीटें, बऱ्याच देशांचे स्टॅम्प्स, कुस्त्यांच्या फोटोंचीं कात्रणें व क्रिकेट मॅचचीं चित्रें असा विविध संग्रह असल्यामुळें व ह्या संग्रहांतील प्रत्येक आकर्षक विभागाचें त्यानें रसभरित वर्णन केल्यामुळें पहिल्या दिवसापासूनच तो शाळेच्या जगांत रुळला.

त्याची अभ्यासांत प्रगति बेताची होती. वर सांगितलेल्या संग्रहांखेरीज आणखी किती तरी महत्त्वाचीं कामें त्याला असत. मग अभ्यासाला वेळ तरी कसा व कितीसा उरणार ?

घरीं असल्या वेळीं चंबूशीं खेळण्यांत त्याचा बराचसा वेळ जाई नि बाकीच्या वेळांत मोटारींचीं निरनिराळीं मॉडेल्स, रेडियोची यांत्रिक रचना, आगगाडीच्या आणि मोटारीच्या एंजिनांची तुलना वगैरे किती तरी गोष्टींची माहिती मिळविण्यांत तो गुंगत असे !

खरोखरीच त्याच्या सात वर्षांच्या वयाच्या मानानें त्याला अनेक गोष्टींचें आश्चर्यकारक ज्ञान होतें ! बुलबुलला असली कांहीं आवड नव्हती. तिला

आपला अभ्यास, शिवण, गाणें नि आईच्या हाताखालीं किंवा आसपास लुडबुडणें एवढेंच ठाऊक होतें.

मुलगा व मुलगी ह्यांच्या मनोवृत्तींतील ही नैसर्गिक तफावत पाहून शंकररावांना मोठें नवल वाटे. व चंदूनें विचारलेल्या अनेक गंमतीच्या व विविध प्रश्नांना ते तत्परतेनें उत्तरें देत. व त्यांनीं सूचना दिल्यामुळें चंदूला घरीं शिकवावयाला येणारे मास्तरहि त्याला न आवडणाऱ्या गणित विषयाचेच वळसे देत न बसतां त्याच्या आवडीच्या ह्या अवांतर गोष्टींबद्दल त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें चर्चा करीत.

पण कधीं कधीं उमाबाई जरा बेचैन होत. त्यांना वाटे, बुलबुल अभ्यासांत किती हुषार आहे, पहिला-दुसरा नंबर काढते ती—नि चंदू मुलगा—आपला एकुलता एक मुलगा—तेव्हां त्यानेंहि नको का अभ्यासांत अधिक मन घालायला ? अशा वेळीं शंकरराव त्यांना समजावून सांगत. ते म्हणत, "हें बघ, मुलगी म्हणजे जणूं ताब्याचं भांडं. चटकन् तापतं पण निवतंहि चटकन्—लहानपणीं मुली अभ्यासांत चमकतात, पण पुढें बहुधा त्या मागें पडतात. अर्थात् इतर सर्व गोष्टींप्रमाणें ह्यालाहि अपवाद असतातच. पण सर्वसाधारण नियम म्हटलां तर लहानपणीं मुली अधिक हुषार वाटतात! कारण मुलगा म्हणजे मातीचं भांडं—तापायला अंमळ वेळ लागेल. पण एकदां तापलं कीं ती उष्णता पुष्कळच टिकते. अन् आपल्या चिरंजीवाला बुद्धि कमी थोडीच आहे ? काय एकेक गंमती-गंमतीचे शोध लावीत असतो तो! गेल्या महिन्यांतली मोटरीची ती मौज विसरलीस तूं ? "

शंकररावांनीं असें म्हणतांच ती आठवण उमाबाईंना झाली व त्यांना हसूं आलें.

आदल्या महिन्यांत शंकररावांनीं चंदूला एक छानशी चावीची छोटी मोटर आणली होती. नि दुसऱ्याच दिवशीं चंदूनें ती मोटर सबंध उलगडली व तेवढीच एक पुठ्याची मोटर तयार केली व पत्र्याच्या मोटरीची स्प्रिंग व चाकें त्या मोटरीला बसविण्याची धडपड सुरू झाली त्याची.

त्या भरांत स्वारीनें घरचा अभ्यास मुळींच केला नाहीं. बुलबुलनें त्याला ही आठवण करतांच रुसक्या आवाजांत तो म्हणाला, "ए ताई, ही पुठ्याची मोटर कशी छान जमतेय् आतां. पांच मिनिटांत पुरी होईल ती!"

"समजलीं तुझीं पांच मिनिटं! बस तूं आपली मोटर घेऊन. मी जातें माझा अभ्यास करायला." बुलबुल फुणफुणली.

नि तेंहि खरेंच! पांच मिनिटें अर्धातास, तास हें सारें चंदूच्या लेखीं सारखेंच होतें. ह्या सर्वांचाच अर्थ थोडा वेळ असेंच मानीत असे तो. व मग त्याच्या पांच मिनिटांनीं म्हणजे वस्तुतः पुऱ्या अर्ध्या तासानें तो धांवत ती पुठ्याची मोटर घेऊन शंकररावांकडे आला—

नि काय चमत्कार? चावी देतांच ही मोटर त्या पत्र्याच्या मोटरीसारखीच चालूं-पळूं लागली? शंकररावांना, उमाबाईंना व बुलबुलाहि त्या वेळीं फार कौतुक वाटलें होतें! अन् आतांहि त्यांना तसेंच कौतुक वाटलें.

तरीसुद्धां वार्षिक परीक्षेंत बुलबुलचा चौथींत पहिला नंबर आला नि चंदोबा सगळ्या विषयांत पास झाले, पण नंबर बरीक दहावा आला, तेव्हां उमाबाईंना जरा खेद वाटलाच!

पण एका निराळ्याच कारणासाठीं चंदूला त्या वेळीं फारच खेद झाल्यामुळें आपल्या खेदाकडे दुर्लक्ष करणें उमाबाईंना भाग पडलें.

त्याचें असें झालें—बुलबुल चौथी पास झाल्यावर तिला दुसऱ्या मुलींच्या शाळेंत घातलें. नि ह्याचेंच चंदूला भारी दुःख झालें. आतां ह्या शाळेंत ताई नाहीं म्हणजे काय? इतर अनेक मुलगे त्याचे दोस्त असले तरी ताई त्याची खास दोस्त होती! अन् ताई म्हणे आतां दुसऱ्या, इंग्रजी शाळेंत जाणार होती! ह्या कल्पनेनें चंदू कासावीस झाला होता. नि एकदम त्याच्या डोक्यांत नेहमींप्रमाणें एक अजब कल्पना आली—तो म्हणाला, "काय ग ताई, तूं नि मी दोघंहि एकाद्या मुलामुलींच्या इंग्रजी शाळेंत गेलों तर? अं? तूं आतां नव्यानें इंग्रजी शिकणार—मींहि नव्यानें शिकेन—अं?"

"पण वेड्या, इंग्रजीबरोबर गणित, इतिहास, भूगोल वगैरे विषयहि असणार ना? मग तुला कसं हें झेपेल?"

बुलबुलनें गणिताचें नांव घेतांच चंदोबाचा उत्साह विरघळला—पण क्षणार्धांत त्याच्या मननें एक गंमतीचा पलटा घेतला. व मघांच्याच उत्साहानें त्यानें म्हटलें, "मग ताई, असं कर ना तूं. मी आतां तिसरींत गेलोंय्—तूंहि माझ्याबरोबर तिसरींत बस—आपण खूप जंमत करूं—तुला गोष्ट्या

खेळायला, लगोरी खेळायला शिकवीन मी—माझ्या सगळ्या मित्रांशीं तुझी ओळख करून देईन.—अं ? येशील माझ्या वर्गांत ? ”

“कांहीं तरीच बोलतोस तूं, चंदू! अरे, दिवसेंदिवस आपण मागें जायचं कीं पुढें ? तुझं हें बोलणं म्हणजे विहिरींत चार इंच वर चढून दोन इंच मागें सरणाऱ्या पालीचं उदाहरण ! ” बुलबुलनें आपल्या आवडत्या गणित विषयांतील उपमा देत म्हटलें—

चंदूला ती उपमा कांहीं कळली नाहीं, पण आपली सूचना ताईला रुचली नाहीं हें वरीक त्याला कळलें. तो बिचारा निरुत्तर होऊन ‘आलिया भोगासी सादर’ झाला !

पण ताई नसलेल्या त्या शाळेंत जाणें चंदूला वाटलें होतें तेवढें अवघड ठरलें नाहीं. कारण उडणारें छोटेंसें विमान करण्याचा छंद चंदूला त्याच सुमाराला जडला.

त्याच्या वर्गांतील ४।६ मुलांना चंदूच्या ह्या मोडण्याजोडण्याच्या कारागिरीचें भारी कौतुक वाटे. नि त्यांच्या मदतीनें दुपारच्या सुटींत हा नवा छंद चंदू हाताळूं लागला.

हातभर लांबी-रुंदीचें एक ब्राउन पेपरचें विमान चंदूनें बनविलें व एक दिवस दुपारच्या सुटींत शाळेच्या दाराशीं बसलेल्या गॅसच्या फुगेविक्याकडून चंदूच्या मित्रांनीं एक डझन् फुगे घेतले नि चंदूच्या सांगण्यावरहुकुम ते सर्व फुगे त्या विमानाच्या वरच्या अंगाला चौफेर बांधले व आपल्या अपेक्षेप्रमाणें तें उडतें काय हें पहाण्यासाठीं चंदूनें तें सोडून दिलें.

विमान अगदीं हलकें होतें. त्यामुळें तें खरोखरीच वर उडालें व हवेच्या झोताबरोबर तें पार कंपाउंडाच्या बाहेर गेलें.

विमान व फुगे हाताबाहेर गेले म्हणून चंदू आणि कंपनीला वाईट वाटलें तरी आपलें संशोधन यशस्वी झालें म्हणजे बड्या-बड्या संशोधकांना त्या पहिल्या क्षणीं जो अवीट, अनिर्वाच्य आनंद होतो तसा आनंद चंदूला झाला होता.

व मग घरीं आल्यावर तो सारखा हीच हकीकत सांगत सुटला. व मोठा झाल्यावर फुग्यांचा व कागदी विमानाचा एक जोड-कारखाना काढण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें ठाम ठरविली.



चंदूचें विमान उडालें.

असलीं विमानें आकाशांत आकाशदिव्याप्रमाणें थोडींफार उडूं शकलीं तरी हवाई प्रवासाला त्यांचा काय उपयोग हें ह्या आनंदाच्या भरांत त्याच्या डोक्यांत शिरेनाच मुळीं. नंतर तें लक्षांत आलें तरी तो फारसा निरुत्साही झाला नाहीं.

चटकन् त्यानें शंकररावांना म्हटलें, "पण बाबा, माणसांचं वजन माझ्या विमानांना नाहीं तोललं तरी पत्र नाहीं का पाठवितां येणार असल्या विमानानें? मग किती थोडक्या खर्चांत टपालाचं केवढं काम भागेल! नाहीं कां?" चंदूनें एवढ्या निर्व्याज उत्सुकतेनें हें विचारलें कीं त्यांतला फोलपणा त्याला उघड करून दाखवावा असें शंकररावांना वाटेना.

टपालाचें ओझें तसल्या विमानाला जरी समजा, झेपलें तरी माणूस आंत बसल्याखेरीज नि विमान हव्या त्या दिशेला चालविण्याची योजना आंत असल्याखेरीज आंतील टपाल योग्य ठिकाणीं कसें पोंचूं शकेल ही उघड, उघड शंका शंकररावांनीं मुद्दामच बोलून दाखविली नाहीं.

कारण चंदूनें आपल्या बालबुद्धीच्या मानानें हा प्रयोग खरोखरीच भारी स्तुत्य केला होता! त्यामुळें त्याचा उत्साहभंग करणें शंकररावांना योग्य वाटलें नाहीं! शिवाय, त्यांच्या मनांत असें आलें कीं, आपल्या हिंदुस्थानांत संशोधक कमी आहेत. संशोधकांची आपल्या देशाला फार आवश्यकता आहे! तेव्हां अशा चुकल्यामाकल्या प्रयोगांतूनच चंदू मोठेपणीं कशावरून एकादें उपयुक्त संशोधन करणार नाहीं?

अशी पितृसुलभ गोड आशा मनाला चाटून जातांच शंकररावांनीं निश्चय केला कीं, मोठेपणीं चंदूनें नौकरी न धरतां संशोधक होण्याची आवड व कल दर्शविला तर त्याला अवश्य पाठिंबा द्यावयाचा.

आणि खरोखरीच आपल्या मुलांच्या विद्यार्थीदशेंतील आवडीनिवडींकडे सगळे पालक जर योग्य लक्ष देतील तर भावी पिढीची बुद्धिमत्ता व उत्साह ह्यांचा देशाला शंभर टक्के फायदा मिळूं शकेल!

पाश्चिमात्य देशांत मुलांना वेगवेगळे खेळ आणून देतात, निरनिराळे हस्तव्यवसाय करण्याची आवड लावतात व त्यांतून मुलांचा नैसर्गिक कल ओळखून काढून त्याप्रमाणें शिक्षणाची दिशा ठरवितात.

आपला देश आधींच दरिद्री ! तेव्हां अशा रीतीनें मुलांप्रीत्यर्थ पैसा खर्च करणें सगळ्याच पालकांना कसें परवडणार ? पण पालकांनीं एवढें तरी करावें कीं, मुलांच्या आवडीनिवडीला त्यांनीं सहानुभूतिपूर्वक महत्त्व द्यावें.

आपल्या समाजांत बहुधा असेंच आढळून येतें कीं, बाप डॉक्टर असला कीं मुलानें डॉक्टर व्हायलाच हवें ! वकील बापाच्या मुलानें कायद्याचाच अभ्यास केला पाहिजे ! योगायोगानें किंवा बाळपणापासून तेंच समोर दिसत असल्या-मुळें बापाच्या धंद्याची जर मुलाला खरोखरीच आवड असली तर मुलानें बापाला हातभार लावणें उत्तमच ! पण मुलाला तशी आवड नसतांहि—किंब-हुना बापाच्या धंद्याबद्दल त्याला पूर्ण अनादर असतांहि—केवळ बापाचा धंदाच त्यानें पुढें चालवावयाला हवा म्हणून सक्तीनें त्याला तें विशिष्ट शिक्षण घ्यावयास लावणें अगदीं गैर आहे !

ह्या शिक्षणावर मुलाचें सर्व भावी जीवन अवलंबून असतें ! अन् म्हणूनच शंकररावांनीं विचारपूर्वक ह्या बाबतींत आपलीं मतें अशीं उदार बनविलीं होतीं !

आणि आतां तर आपला देश स्वतंत्र झाला आहे ! तेव्हां सूज्ञ पालकांनीं भावी पिढीला आपली शिक्षणाची दिशा ठरविण्याचें स्वातंत्र्य देणें इष्ट आहे !

मात्र भावी पिढीनें हें स्वातंत्र्य मिळविण्याची आपली लायकी सिद्ध करावयाला हवी ! शिक्षणाच्या बाबतींत मतस्वातंत्र्य म्हणजे शिक्षणाची हेळसांड करणें नव्हे हें लक्षांत ठेवून त्यांनीं ह्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग बरीक करतां नये !

थोडक्यांत म्हणजे त्यांनींहि बुलबुल व चंदू ह्या बुलबुलांच्या जोडीप्रमाणें सूज्ञ झालें पाहिजे !

एका हातानें टाळी वाजते का कधीं ? पालकांनीं आणि मुलांनीं परस्परपूरक होऊन एकमेकांच्या गुणांचें योग्य चीज केलें तरच दोघांच्याहि श्रमांचें सार्थक होतें.

× × ×

## १२.

# परीदेवता !

वार्षिक परीक्षा झाल्या नि नंतर बुलबुलच्या शाळेचा बक्षीस-समारंभ साजरा झाला.

शंकररावांना व उमाबाईंना आमंत्रण होतें म्हणून चंदूसह तीं दोघें समारंभाला गेलीं.

कार्यक्रमांत इंग्रजी पहिलीच्या—आतां दुसरींत गेलेल्या—मुलींचा फुल-पांखरांचा नाच होता व त्यांत बुलबुलनें भाग घेतला होता. ती परीदेवता झाली होती. अर्थात् चंदूला एकंदर कार्यक्रमांत हा नाचच सर्वोत्कृष्ट वाटला.

अन् तो नाच झालाहि उत्तम! नि त्याच्यानंतर कांहीं कार्यक्रम केल्यास ते फिके पडतील असें वाटल्यामुळेंच कीं काय, नाच सर्वांत शेवटीं झाला!

त्यामुळें पहिले कार्यक्रम चंदूनें अगदीं अधीर मनानें पाहिले. धनुष्याकृति वेताच्या काठ्यांना कागदी फुलें चिकटवून वेली बनविल्या होत्या नि त्या हातांत घेऊन गाण्याच्या ठेक्यांत कांहीं मुलींनीं छान कवाईत केली. चंदूलाहि ती आवडली.

त्याचप्रमाणें ड्रिलचा एक अजब प्रकारहि त्याला आवडला. बारा मुली केस मोकळे सोडून व एका तऱ्हेचीं परकर-पोल्कीं घालून स्टेजवर उभ्या असतांना पडदा उघडला—पण गंमत अशी कीं, त्या सर्व मुलींचे मोकळे केस उलटे वळवून तोंडावरून खालीं छातींवर सोडले असून पाठच्या डोक्याला मुखवटे

घालून स्टेजवर त्या खरं म्हणजे पाठमोऱ्या उभ्या होत्या. प्रारंभीं हें एकदम लक्षांत येत नव्हतें. पण ड्रिल करतांना त्यांनीं दोन्ही हात डोक्यावर, बाजूला, खालीं व समोर ताठ केले कीं, त्या पाठमोऱ्या उभ्या असल्यामुळें त्या पाठी-मागें हात एवढे सरळ व ताठ नेऊं शकतात हें विचित्र भासे! त्याचप्रमाणें त्या अगदीं सहज पुढच्या बाजूला ओणव्या होत, पण त्यांची ती पाटमोरी बाजू आहे असा भास होत असल्यामुळें त्यांचें हें ओणवें होणें अजब वाटे!

नंतर एक इंग्रजी व एक मराठी संवाद झाला, छोट्या मुलींचें हावभावयुक्त संघगीत झालें, मोठ्या मुलींचा गाण्यांत संवाद झाला, क्लबड्रिल झालें. पण दर वेळीं चंदूचा उत्सुक प्रश्न हजर—"आतां ताईचा नाच होणार काय?"

नि मग एकदांची तो नाच आतां होणार अशी घोषणा झाली नि चंदोबाची उत्सुकता पराकोटीला पोंचली.

पडदा उघडला. व्यासपीठावर बागेचा देखावा दाखविला होता. फुलझाडांच्या मोठ्या मोठ्या बारा कुंड्या अर्धवर्तुळाकार ठेवल्या असून त्या प्रत्येकीच्या मागें एकेक मुलगी धावळीं घट्ट लपेटून शक्य तों अंग चोरून बसली होती.

नि एवढ्यांत परीदेवतेच्या भूमिकेंतील बुलबुल रंगभूमीवर आली. भारीच सुरेख दिसत होती ती. तिचा तो भरजरी झगमगणारा पोषाक, अंगावरील फुलांचे अलंकार, मोकळ्या सोडलेल्या कुरळ्या केसांतून चमकणाऱ्या कलाबतूंच्या तारा, डोक्यावरील फुलांचा मुकुट व चमकणारे काळेभोर डोळे ह्यांमुळें ही परीदेवता अतिशय सुंदर दिसली!

तिच्या हातांत फुलें गुंडाळलेली एक राजदंडवजा लहानशी काठी होती. ह्या सगळ्या वैभवांत ताईला पाहून चंदूला विलक्षण आनंद झाला. व त्यानें टाळ्या वाजवून तो व्यक्त केला.

तशा उमाबाई हळूच म्हणाल्या, "चंदू, अरे, पुरे कर तुझ्या ह्या टाळ्या. त्यामुळें बुलबुल घाबरली तर?"

पण उमाबाईंची ही शंका अगदीं फोल ठरली.

बुलबुल जराहि भ्याली नाहीं, गडबडली नाहीं. तिनें श्रोतृवृंदाकडे नजर टाकीत मधुर स्मित करून अभिवादन केलें व आपल्या बुलबुलासारख्या गोड आवाजांत ती गाणें म्हणूं लागली.



‘सुरवंटाचीं फुलपांखरें । बनती कशिं हो झटकन् हीं ॥’

"परीदेवता मी । पहा ही । परीदेवता मी ।
कसें झळकतें स्वरूप माझें सुंदर मूर्ति पहा ही ॥
मनोहर बागेची राणी ।
असें मी किती तरी शहाणी ।
हातीं घेतल्या दंडानें मी घाली सर्वां मोहिनी ॥
हा दंड फिरे जेथें ।
सुरेख स्वरूप ये तेथें ॥"

बुलबुल ह्या शेवटच्या दोन ओळी म्हणत असतां कुंड्यांच्या मागें दडलेल्या व धाबळी लपेटून सुरवंट बनलेल्या त्या मुली एकदम कुंड्यांच्या पुढ्यांत येऊन उभ्या राहिल्या. त्याबरोबर आपल्या हातांतील दंड तिनें त्या मुलींभोंवतीं फिरविला व ती गाऊं लागली—

"सुरवंटांचीं फुलपांखरें ।
बनतीं कशिं हो झटकन् हीं ॥"

बुलबुलनें ह्या ओळीं म्हणतांच त्या सुरवंट झालेल्या मुलींनीं भराभरा आपल्या अंगाभोंवतींच्या धाबळ्या काढून कुंड्यांच्या पाठीमागें फेकल्या व रंगी-बेरंगी झगे आणि खांद्यांना पुढ्याचे, झीग लावलेले पंख अशा पोषाकांत त्या प्रेक्षकांना दिसल्या.

सुरवंटांचीं सुंदर फुलपांखरें झालीं!—प्रेक्षकांना ही गंमत फार आवडली. त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला.

पण चंदूला आतां टाळ्या वाजविण्याचेंसुद्धां भान नव्हतें. आपल्या ताईनें स्वतःच्या हिंमतीनें हा चमत्कार घडविला असेंच त्याला वाटलें व त्यामुळें तो चकित झाला होता.

इतक्यांत परीदेवता बुलबुलच्या भोंवतीं ह्या फुलपांखरांनीं नाच सुरू केला.

आपले पंख हालवीत व तोंडानें पुढील गाणें म्हणत त्या डौलांत नाचूं लागल्या—

"चला, चला उडूं या, खेळूं या ।
अहा ! सुरेख बागीं या ।
चला, चला उडूं या, खेळूं या ॥

गाड मधू रस हा चाखूं या ॥
चला, चला उडूं या, खेळूं या ॥"

नाच-गाणें संपलें. पडदा पडला तरी चंदूच्या डोळयांसमोर त्याची परीदेवता ताई दिसत होती.

अंमळशानें पुनः पडदा उघडला व अध्यक्षांच्या हस्तें बक्षीससमारंभ सुरू झाला.

वर्गांत पहिली आल्याचें एक व गणित विषयांतील प्रावीण्याबद्दल एक अशीं दोन बक्षिसें बुलबुलला मिळालीं. व तिला कपडे बदलावयाला अवधि न मिळाल्यामुळें परीदेवतेच्या वेषांतच व्यासपीठावर ती येतांच प्रेक्षकांनीं टाळ्या दिल्या. चंदूनें टाळ्या देण्याची हौस आतां मनमुराद भागविली.

ह्या टाळ्या मिळतांच बुलबुल खूप लाजली व तिला शाळेतर्फेचीं तीं दोन बक्षिसें दिल्यावर अध्यक्षांनीं तिच्या परीदेवतेच्या भूमिकेची स्तुति करून स्वतःचे दोन रुपये तिला बक्षीस देतांच तर टाळयांचा कडकडाट झाला व बुलबुलचे तेजस्वी डोळे लाजतां लाजतां हसूं लागले.

त्या दिवसापासून चंदूला आपल्या ताईची भारीच अपूर्वाई वाटूं लागली. नि बुलबुललासुद्धां आपण कुणी तरी विशेष आहोंत असें वाटूं लागलें. तिच्या वागण्यांत, चालण्यांत, बोलण्यांत परीदेवतेचा कृत्रिम रुबाब दिसूं लागला. पूर्वींचा तिचा साधेपणा, निर्व्याजपणा लोपला व त्या जागीं अहंमन्यता आली.

उमाबाईना नेमकी हीच भीति वाटत असे. बुलबुल आपल्या आईवडिलांचें पहिलें अपत्य असल्यामुळें त्यांना साहजिकच तिची फार नवलाई वाटली होती—तिचें अधिकउणें कौतुक झालें होतें. त्यांतून ती अतिशय हुषार, दिसावयाला मोहक व स्वभावानें गोड होती. त्यामुळें हें कौतुक घरीं वाढत गेलें नि शाळेच्या जगांतहि तिनें मानाचें स्थान पटकाविल्यामुळें घरींदारीं तिचें कौतुकच होत राहिलें! त्यांत तिच्या परीदेवतेच्या भूमिकेचीहि भर पडली! खुद्द अध्यक्षांनीं तिला ज्यादा बक्षीस दिलें.

अर्थात् हें सारें यश तिच्या डोळयांवर गर्वाची धुंदी चढवील असें भय शंकररावांना व उमाबाईना वाटलें तरी तिच्या यशाचें त्यांनीं कौतुक न करणें गैर ठरलें असतें! तिच्या अंगांत कर्तृत्व होतें, गुण होते, म्हणूनच तिचें

लोकांनींहि जिथें कौतुक केलें तिथें आईबाबांनीं तें केलें नसतें तर तरल बुद्धीच्या बुलबुलला वैषम्य वाटलें असतें ! आईबाबांबद्दल तिच्या मनांत अढी उत्पन्न झाली असती !

तेव्हां घरीं तिचें योग्य कौतुक झालें हें ठीकच झालें.

पण त्यामुळें बुलबुलच्या आजपर्यंतच्या मंजुळ स्वरांत मीपणाचा तीव्र स्वर वारंवार उमटूं लागला ! चंदूला ती तुच्छ गणूं लागली. त्याचा नंबर वर्गांत दहाच्या आसपास असतो म्हणून त्याची टिंगल करूं लागली. एकंदरींत प्रकरण जरा डोईजड होऊं लगलें !

ह्याला आळा कसा घालावा ह्या चिंतेंत उमाबाई होत्या.

आणि अचानक निष्पाप, प्रेमळ चंदूनें नकळत ही कठीण गोष्ट घडवून आणली.

त्याचे असें झालें. त्याच सुमाराला महाराष्ट्रांतील कांहीं भागांत फार मोठा दुष्काळ पडला होता. व तिथल्या लोकांना मदत देण्यासाठीं बुलबुलच्या शाळेच्या चालकवर्गानें तिकिटें लावून करमणुकीचा कार्यक्रम केला. नुकताच बक्षीस-समारंभ झाला असल्यामुळें फुलपांखरांचा नाच ह्या कार्यक्रमांत समाविष्ट केला होता. अर्थात् बुलबुलनें पुनः परीदेवतेची डौलदार भूमिका केली व तिच्या मीपणाचा तीव्र स्वर आणखीच तीव्र, जवळजवळ कर्कशच झाला !

ह्या कार्यक्रमापासून मिळालेले पांचशें-सहाशें रुपये जणुं आपण एकटीनें दुष्काळफंडाला दिले, स्वतःच्या कुवतीवर दिले अशी प्रौढी बुलबुल येतां-जातां चंदूकडे मारूं लागली.

चंदू तिच्या हरेक गोष्टीचें मनापासून कौतुक करीत असला तरी आतांशा अशा वेळीं तो अंमळ खट्टू होई ! आपण कोणीच नाहीं असें वाटून तो खजील व खिन्न होई !

मिळून बुलबुलच्या अंगांत अहंगंड नि त्यापायीं चंदूच्या अंगांत न्यूनगंड उत्पन्न झाला !

नि मग एक दिवस काय झालें—रविवार होता तो—सर्व मंडळी जेवाव-याला बसली. स्वयंपाक्यानें भातावर वरण वाढलें व नेहमींच्या पद्धतीप्रमाणें स्वतः उमाबाई लोणकढें साजुक तूप वाढूं लागल्या—

शंकररावांना वाटलें, बुलबुलला वाटलें नि उमाबाई चंदूला वाढणार तोंच तो म्हणाला, "उंहुं, आई, तूप नकोय् मला."

"तुला आणि तूप नको? चंदू, हा रे काय चमत्कार?" उमाबाईनीं हंसून विचारलें.

"अरे, तुला तर तूप फारच आवडतं!" शंकरराव उद्गारले.

"हो, मला तूप आवडतं तर खरंच! पण—पण—" चंदू किंचित् घोटाळला —व मग त्यानें पटकन् सांगून टाकलें. तो म्हणाला, "आई, माझ्या मनांत असं आलं कीं, आजपासून तूप खायचं मीं सोडावं नि त्याबद्दलीं तूं मला तेवढ्या तुपाचे पैसे द्यावेस—नि मग मीं ते त्या दुष्काळ फंडाला देईन—अं?"

लहानग्या चंदूचा हा प्रेमळ उद्गार ऐकून उमाबाईंना गहिंवरून आलें. शंकररावांनाहि फार कौतुक वाटलें.

ते म्हणाले, "चंदू, त्या गरीब, भुकेल्या लोकांबद्दल माया वाटून त्यांना स्वतः त्रास सोसून मदत करण्याची तुझी ही कल्पना आम्हांला फार आवडली! ही खरी मदत! पण बाळ, तूं रोज तूप खाणं आवश्यक आहे. तेव्हां आपण असं करूं या कीं, नेहमींप्रमाणें तूं सांजसकाळ तूप खा. नि तुझ्या ह्या उदारपणाबद्दल, निःस्वार्थी शहाणपणाबद्दल बक्षीस म्हणून तुला तुझी आई रोज एक आणा बक्षीस देईल व ते पैसे सांठवून तूं तुझ्या नांवानें दुष्काळ फंडाला मदत म्हणून दे—हं?"

शंकररावांचे हे शब्द ऐकून व उमाबाईंची कौतुकाची, समाधानाची नजर पाहून चंदूला भारी सुख झालें.

आणि त्याच क्षणीं बुलबुलची सारी, सारी धुंदी उतरली! तिची चर्या जरा गोरीमोरी झाली. आपल्यापेक्षां चंदूनें कांहीं तरी विशेष केलें हें तिला लगेच उमजलें. नि साहजिकच तिचा स्वाभिमान जरा दुखावला गेला. शंकररावांनीं व उमाबाईनीं तिच्या मनांतली ही खळबळ ओळखली व त्यांना ती ठीकच वाटली! पण अजाण चंदूलाहि कांहीं तरी फरक जाणवला. ताईला कुठें तरी, कांहीं तरी खटकलें असें त्यानें ओळखलें व तिच्यावरील प्रेमामुळें तो पटकन् म्हणाला, "ताई ग, ते पैसे किनई आपण तुझ्या नि माझ्या नांवानेंच पाठवूं या—हं?"

चंदूचे हे शब्द ऐकतांच बुलबुल फारच ओशाळली. पण तशी ती सुस्वभावी होती आणि लहानपणापासून तिला चांगलें गृहशिक्षण मिळालें होतें, त्यामुळें ती लगेच उत्तरली, " नको, चंदूबाळा, तुझ्या शहाणपणाबद्दल तुला बक्षीस म्हणून मिळणारे ते पैसे तुझ्या नांवानेंच देऊं या आपण. नि हें बघ, माझे भाऊबीजेच्या ओवाळणीचे पैसे आहेत. तूं तुझे जेवढे पैसे फंडाला देशील तेवढेच माझ्याकडचे मी देईन नि मग आपल्या दोघांच्या नांवानें ते पाठवूं —अं ? "

हल्लीं कांहीं दिवस आपलीच टिमकी वाजविण्याकडे बुलबुलचा जो अनिष्ट कल झाला होता तो अशा रीतीनें चंदूच्या प्रेमळपणामुळें नष्ट झाला ! व दुसऱ्याला मोठेपणा जे देऊं जाणतात तेच खरे मोठे असतात, हा धडा ती शिकली.

ह्या संधीचा फायदा घेऊन शंकररावांनीं म्हटलें, " खरंच, देवानें आम्हांला अशीं शहाणीं, समजूतदार मुलं दिलीं हे देवाचे केवढे उपकार आहेत ! "

हे शब्द ऐकून व उमाबाईंच्या चर्येवर हाच भाव प्रकट झालेला पाहून बुलबुलचे डोळे पाण्यानें भरले. ती जास्त हुशार होती व थोडी जाणतीहि होती. त्यामुळें गेल्या कांहीं दिवसांतील आपला वेडेपणा विसरून आतांच्या आपल्या शहाणपणाचा, समजूतदारपणाचा गौरव करणारे आपले आईबाबा खरे समजूतदार, शहाणे, चांगले आहेत हें तिच्या नीट ध्यानांत आलें व ती सद्गदित झाली. अन् तिनें त्या क्षणीं निश्चय केला कीं, ह्यापुढें नेहमीं खराखुरा समजूतदार शहाणपणाच अंगांत आणावयाचा !

पण विद्वान तत्त्वज्ञानी म्हणतात ना, कीं संकल्प आणि सिद्धि ह्यांमध्यें कांहीं ना कांही आडवें येतें ! बुलबुलनें आज केलेला संकल्प चांगला होता. पण तो निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल का ? अज्ञानामुळें, मोहामुळें विघ्नें तर नाहीं येणार ? पण असें पुढचें आधीं कळलें तर मौज काय उरली ? खरं ना ? तेव्हां आपल्याहि बुलबुल-चंदूबरोबर त्यांच्याच गतीनें वर्तमानकाळांतून भविष्यकाळांत जावयाला हवें ! पण तुम्हांला घाई झाली असेल म्हणून सांगतें कीं—

× × ×

## .१३.

# मोहाची 'लस'

कालपुरुषानें एक पाऊल टाकलें आहे. मागील प्रकरणांतील घटनेला एक वर्ष झालें आहे.

बुलबुल नुकतीच इंग्रजी तिसरींत गेली असून चंदोबा मराठी चौथी पास झाल्यामुळें जवळच असलेल्या एका मुलांच्या हायस्कुलांत त्याचें नांव घालण्याचें ठरलें आहे.

बुलबुल मराठी चौथी पास झाली त्या वेळीं आपण कांहीं तरी विशेष केलें आहे, आतां आपण नव्या मोठ्या शाळेंत जाणार, ही जाणीव तिच्या चेहऱ्यावर व वागण्याबोलण्यांत अगदीं ओतप्रोत भरली होती. पण चंदोबा चौथी पास झाले तरी हें जणुं त्यांच्या गांवींहि नव्हतें.

उन्हाळ्याच्या सुटीच्या पूर्वीच नांव नोंदविणें इष्ट म्हणून आज अकरा वाजतां शंकरराव त्याला लोकमान्य हायस्कुलांत नेणार होते. नि त्यामुळें आंघोळ वगैरे लौकर आटोपण्याची बुलबुल सकाळपासून चंदूला घाई करीत होती.

आतांसुद्धां घाईघाईनें बुलबुल चंदूला चौथ्यांदा बोलवावयाला आली.

"चंदू, चल ना रे, उशीर होईल मग." बुलबुल किंचित् त्रासून बोलली. ह्यावर तोंडाचा चंबू करून संशोधक चंदोबा उद्गारले, "छेः बुवा! अगदीं भलत्या वेळीं नव्या शाळेची गडबड निघालीय ही! ताई, पाहिलंस का? तेला-शिवाय जळणारा दिवा तयार करतोय मी."

"काय? तेलाशिवाय जळणारा दिवा? म्हणजे रे काय चंदू? अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींतल्या वस्तूसारखं अजब वाटतंय् हें!" आपल्या वाचनाच्या व्यासंगाचा मुद्देसूद उपयोग करीत बुलबुल उत्तरली.

"मग अजबच आहे हा शोध! हें पाहिलंस का ताई, मीं कापराची वात बनवतोंय्. कापराच्या ह्या लहान तुकड्यांना भोकं पाडून ते मण्यांसारखे एकत्र गुंफून—"

पण चंदूच्या तोंडून 'गुंफून' हा शब्द ऐकतांच बुलबुलचें चित्त दुसरीकडेच गेलें. शाळेंत नुकतेंच शिकलेलें गाणें ती गुणगुणूं लागली—"गुंफूं या, बाई गुंफूं या, गुलाबपुष्पें गुंफूं या—"

त्याबरोबर रुसक्या आवाजांत चंदू म्हणाला, "हें ग काय ताई? इतक्या आवडीनें माझा हा एवढा छान शोध मी तुला समजावून देतोंय नि तूं आपली गातच सुटलीस—"

"अस्सं? कसला हा छान शोध रे चंदू? मला तरी सांग." त्याच वेळीं तिथें आलेल्या शंकररावांनीं म्हटलें.

एरवीं चंदू घरांत अंमळ लाजवटपणानें वागे. पण त्याच्या ह्या लाडक्या छंदाविषयीं बोलावयाचें झालें कीं, त्याची जीभ मोकळी होई.

आपले उत्साहानें चकाकणारे डोळे वडिलांच्या चर्येवर क्षणभर स्थिर करीत तो म्हणाला, "बाबा, हें पाहिलंत का? कापराचे हे लांबट तुकडे मण्यांसारखे दोरींत गुंफून त्यांची वात बनवायची. नि दिव्यांत ती घालून पेटवायची कीं झालं! तेल नको नि काय नको! किती थोडक्यांत होईल हें काम!"

नि—शंकररावांच्या मनांत आलें—किती थोडक्या वेळांत जळून जाईल ती वात!—पण तसें उघड न बोलतां ते म्हणाले, "हें बघ, चंदू, असले हे शोध मोठ्या वयांत लावायचे. आतां शाळेंत नीट शिकायचं."

"पण बाबा, असल्या शोधांना गणितविषयाची कुठें गरज लागते आहे? मग तें कशाला शिकायला हवं मीं?"

"वा:! असं कसं? व्यवहारांत अनेकदां गणितविषयाची गरज भासते आपल्याला. तुझ्या ह्या वातीची लांबी मोजायला किंवा अमुक लांबीची वात इतकीं मिनिटें जळते तर तमुक लांबीची किती मिनिटं जळेल हें ठरवायला

गणित नको का यायला ?" शंकररावांनीं मुलाबरोबर मूल होत हा प्रश्न विचार-तांच चंदूची समजूत पडली. तो सर्व पसारा आंवरूं लागला.

पण त्या पसाऱ्याकडे पहातांना शंकररावांना भारी गंमत वाटली—त्यांच्या मनांत आलें, 'हें पोरगं गणितांत कसं रमणार? ह्याच्या ह्या कल्पनेच्या काव्यापुढें गणित म्हणजे रुक्ष गद्य! पण छेः! ह्या वयांत अभ्यास करायलाच हवा त्यानें—' नि म्हणून मनांत वाटणारें कौतुक शंकररावांनीं मुद्दामच उघड केलें नाहीं.

त्याच दिवशीं नव्या शाळेंत चंदूचें नांव घातलें व उन्हाळ्याच्या सुटीनंतर तो इंग्रजी पहिलींत व बुलबुल तिच्या शाळेंत इंग्रजी तिसरींत असा व्यवस्थित क्रम सुरू झाला.

नि एक दिवस संध्याकाळीं बुलबुल घरीं आली ती लालबुंद डोळ्यांनीं नि रडव्या चेहऱ्यानें! उमाबाईंना कांहींच कळेना.

गेल्या वर्षीसुद्धां एक दिवस अशीच बुलबुल रडवेली होऊन शाळेंतून घरीं आली होती. उमाबाईंनीं घाबऱ्याघुबऱ्या तिला जवळ घेऊन विचारलें होतें, "काय झालं माझ्या ह्या बुलबुलाला? अं? कां रडतेय् माझी बाई?" नि बुलबुलनें मुसमुसत उत्तर दिलें होतें, "आई ग, आमच्या म्हाताऱ्या पेठे-मास्तरांची मु–मुलगी दे–देवाघरीं गेली म्हणे! म्हणूनच मास्तर काल आ–आले नव्हते शाळेंत—आ–आज ते आले नि–नि–वर्गात ते–ते–र–रडले ग ऽ आई—नि आम्हांलाहि रडूं आ–आ–आलं!"

हें ऐकून त्या वेळीं उमाबाईंना गंमत वाटली तरी समाधानहि झालें. इतरांच्या सुखदुःखाशीं तद्रूप होण्याचा बुलबुलचा हा प्रेमळपणा त्यांना भारी गोड वाटला!

त्याचप्रमाणें वार्षिक परीक्षेचा निकाल असेल त्या दिवशीं बुलबुल हटकून डोळे सुजवून घेऊन घरीं यायची! आपल्याला मिळालेल्या यशामुळें आनंदित होण्याऐवजीं मैत्रिणींच्या अपयशानें ती कष्टी व्हायची! पण आज कांहीं परीक्षेच्या निकालाचा दिवस नव्हता. तेव्हां कुणाच्या तरी सांसारिक दुःखानेंच आपला बुलबुल कळवळला असणार असें वाटून उमाबाईंनीं बुलबुलचें मुख कुरवाळीत विचारलें, "आज काय झालं ग बुलबुल? अं? सांग ना बाळ."

अन् स्फुंदत-स्फुंदत बुलबुल उत्तरली, "म–मला बाई आज रा–रागावल्या."

हें अनपेक्षित उत्तर ऐकून उमाबाई स्तंभित झाल्या. बाईनीं रागावण्यासारखें काय घडलें असेल आपल्या लेकीच्या हातून?

बुलबुल सर्वगुणसंपन्न नसली तरी पुष्कळच गुणी होती. अभ्यासांत तर उत्तमच होती. तिच्या प्रगति पुस्तकामध्यें छानच शेरे मिळतात तिला, ते काय उगीच?

उमाबाईनीं घाईनें प्रश्न केला, "बाई रागावल्या तुला? नि तें ग कां?"

आपला गोरामोरा झालेला चेहरा आईच्या पदरांत लपवीत बुलबुल रडत रडत म्हणाली, "मीं–मीं–ए–एका–मुलीची कॉ–कॉपी के–केली म्ह–म्ह–म्हणून—"

"का ऽऽ य?—तूं कॉपी केलीस? कुणाची?" एकदम गंभीर होत उमाबाईनीं विचारलें.

"सु–सुनंदा फ–फ–फडणीसची—"

"सुनंदा फडणीस? ही कोण? हिचं नांव मीं नाहीं तें तुझ्या तोंडून कधीं ऐकलं?"

"यंदाच माझ्या वर्गांत आलीय ती. नि हल्लींच तिची नि माझी मैत्री जमलीय. माझ्या शेजारींच बसते ती वर्गांत." बुलबुलनें सांगितलें व आई आपल्यावर विशेष चिडलेली दिसत नाहीं असें वाटून जरा धीर आला तिला व एक आवंढा गिळीत ती म्हणाली, "ए आई, रोज गणिताच्या तासाला ती माझी कॉपी करते ग. अन् आज बाईनीं आम्हांला इतिहासाचे प्रश्न घातल्या-वेळीं मला एक सन आठवेना तर तिनें आपल्या चोपडींतील पाहून लिही असं सुचवलं—नि मीं तसं केलं. बाईनीं नेमकं हें पाहिलं नि त्या मला खूप रागावल्या—म्हणजे सुनंदा माझी कॉपी करते तें चालतं वाटतं बाईंना?"

त्यासरशीं उमाबाई तटकन् बोलल्या, "बुलबुल, तूंच कां बोलते आहेस हें? त्या सुनंदेनं तुझी कॉपी केल्याबद्दल बाई समजा, तिला रागावल्या नसल्या तरी तिचं तें कृत्य चांगलं ठरेल का कधीं? नि बाई तुला रागावल्या हें गैर केलं होय त्यांनीं? हें बघ बुलबुल, ज्या मुली नेहमीं चांगला अभ्यास करतात,

चांगलं वागतात त्यांनीं नेहमीं तसंच वागावं, त्यांच्या हातून चुकी घडूं नये अशीच इच्छा असते बाईंची ! समजलीस ? म्हणून त्या तुला रागावल्या—"

"होय. बाईंहि असंच म्हणाल्या मला. आई, आई—" आपला आंसवांनीं माखलेला चेहरा वर करून क्षणभर उमाबाईंकडे पहात बुलबुल म्हणाली, "चुकलें ग मी—पुनः कध्धीं असं करणार नाहीं मी. खरं म्हणजे, ती सुनंदा फारशी हुषार नाहींच. पण मला जो सन आठवेना तोच नेमका तिला आठवला होता. नि तो पाहून लिही असं तिनें म्हणतांच मला मो—मोह पडला—"

बुलबुलनें अगदीं प्रांजळपणें घडलेली ही हकीकत सांगतांच उमाबाईंचा त्यावर विश्वास बसला.

स्वतःशींच कांहीं विचार करीत त्या अंमळ स्तब्ध राहिल्या— एवढ्यांत चंदू शाळेंतून घरीं आला—

बुलबुलची रडवी चर्या पाहून चंदू कावराबावरा झाला. तेव्हां "शाळेंत बाई तिला रागावल्या," असें उमाबाईंनीं मोघम सांगितलें.

तें ऐकतांच चंदू उद्गारला, "अस्सं ? मग ताईच्या वर्गांतील सर्वच मुलींना रागावल्या असतील तर बाई !"

चंदूचे हे शब्द ऐकून व त्यांत ध्वनित होणारी बुलबुलच्या चांगुलपणाबद्दलची चंदूची खात्री ध्यानांत येऊन उमाबाईंना पुष्कळ धीर आला.

बुलबुल क्षणिक मोहाला बळी पडली हेंच खरें! थोड्या वेळानें तिला तो सन आठवलाहि असता, पण तितक्यांत सुनंदेनें तिला मोह पाडला !

पण कांहीं असलें तरी सुनंदेसारख्या मुलीची संगत अपायकारकच!— व म्हणून मुलांचें चहा-खाणें आटोपल्यावर बुलबुलला जवळ घेऊन उमाबाई समजुतीच्या स्वरांत म्हणाल्या, "हें बघ बुलबुल, उत्तम आंबा नासक्या आंब्याशेजारीं ठेवला तर तो उत्तम आंबा नासतो. वाईट संगतीचा असा परिणाम होतो बरं! तेव्हां तूं आपली शक्य तर त्या सुनंदेपासून लांबच बसत जा वर्गांत— "

"होय, आई," बुलबुल बारीक आवाजांत म्हणाली, "माझी जागा बदलण्याबद्दल सांगून पाहीन मी बाईंना— पण आई, तशी बदलणं जमलं नाहीं

नि सुनंदा माझ्या शेजारींच बसली तरी पुनः कधींहि माझ्या हातून अशी चुकी घडणार नाहीं !”

बुलबुलचा हा निश्चय ऐकून उमाबाईंना फार बरें वाटलें.

तरीसुद्धां संध्याकाळीं शंकरराव ऑफिसांतून आल्यावर त्यांना ही सर्व हकीकत सांगितल्यावर एक निश्वास सोडून त्या म्हणाल्या, “खरंच, मघां माझं डोकं कसं सुन्न झालं! मी म्हणतें, आपण मुलांना इतकं जपून वागवीत असतांना असा घोटाळा कां व्हावा?”

त्यावर शंकरराव हंसून उत्तरले, “अग, पण मुलं म्हणजे निर्जीव बाहुल्या का आहेत? अन् हें बघ, केव्हां तरी असं व्हायलाच हवं! रोगांशीं झगडण्यासाठीं मुलांच्या अंगांत प्रतिकारशक्ति आणली, उत्पन्न केली म्हणजे त्यांचं शारीरिक आरोग्य जसं ठीक रहातं त्याप्रमाणें मुलांचं मानसिक आरोग्य ठीक रहाण्यासाठीं त्यांनीं कधी तरी मोहाशीं असे दोन हात करणं परिणामीं हितकारकच ठरेल! म्हणजे असंच समज ना कीं, काल झालेली ती चुकी म्हणजे बुलबुलला टोंचवलेली मोहाची ‘लस’ — आपण देवीची ‘लस’ टोंचवतों ना, तशी! नि तूं पूर्ण खात्री बाळग कीं, ह्यापुढें बुलबुल कधींहि असलं काम तर करणार नाहींच, पण इतरहि कसली गैर गोष्ट तिच्या हातून घडणार नाहीं!”

शंकररावांनीं केलेलें हें मार्मिक विवेचन ऐकून उमाबाईंना पुष्कळच निश्चित वाटलें.

पण अतिस्नेही नि म्हणून पापशंकी असणारें आईचें हृदय ना तें?—त्या निश्चिततेमधूनच त्यांना थोडी चिंता वाटे!

नि मग तीनचार दिवसांनीं त्यांनीं हळूच बुलबुलला सहज म्हणून म्हटलें, “बुलबुल, तूं त्या सुनंदेला गणिताच्या तासाला आपली कॉपी नाहीं ना करूं देत आतां? असं करणंसुद्धां गैरच आहे!”

बुलबुलचा चेहरा क्षणभर गोरामोरा झाला. ती म्हणाली, “आई, कालपासून बाईंनीं तिची जागा बदललीय — नि त्यामुळें तिला फार राग आलाय् नि ‘वृंदेनें माझी कॉपी केली म्हणून बाईंनीं माझी जागा बदलली,’ असं सारखं ती मला चिडवीत सुटलीय् कालपासून. तें ऐकून मला भारी लाज वाटते.

नि आई, माझ्या सगळ्या मैत्रिणींना सुनंदेचा फारच राग आलाय् ग तेव्हां-पासून. नि त्या म्हणतात कीं, आपण तिच्याशीं अबोला धरूं या म्हणजे तिची बडबड बंद होईल! आज आम्ही कुणीच तिच्याशीं बोललों नाहीं."

बुलबुलचें हें उत्तर ऐकून उमाबाईंना वाटलें, बरेंच झालें, आयता सुंठी-वांचून खोकला गेला!

अन् 'ह्यांचें' म्हणणें ठीकच होतें तर? मोहाची 'लस' टोचल्यामुळें मोहाचा प्रतिकार करण्याची चांगलीच शक्ति पोरीच्या अंगीं आली हं! छान!

व समाधानानें हंसत बुलबुलच्या पाठीवरून हात फिरवीत उमाबाई म्हणाल्या, "बाकी, हें कांहीं तुम्हीं गैर नाहीं हो केलंत-म्हटलंच आहे ना, कीं, भांडणा-पेक्षां अबोला बरा! अन् एकादी गोष्ट वाईट आहे हें कळल्यावर आपल्या हातून ती शक्य तों घडूं नये म्हणून काळजी घेणं हें शहाण्या मुलांचंच लक्षण आहे! नि आमची बुलबुल फार शहाणी आहे!"

आईचे हे शब्द ऐकून बुलबुलला अतिशय आनंद झाला. तिनें तो शब्दांनीं बोलून दाखविला नाहीं. पण तिची चर्या समाधानानें उजळून निघाली व तिनें एक तृप्ततेचा सुस्कारा सोडला.

हें पाहून उमाबाईंची उरलीसुरली चिंताहि पार पळाली.

बुलबुलचा स्वभाव लहानपणापासूनच निश्चयी व अभिमानी आहे हें ठाऊक असल्यामुळें ह्यापुढें ती असल्या मोहापासून चार पावलें दूर तरी राहील किंवा मोहाशीं चार हात करून त्याच्यावर पूर्ण विजय तरी मिळवील अशी त्यांची पूर्ण खात्री झाली.

x x x

## ·१४·

# भीतीचा बळी

बुलबुलच्या बाबतींत उमाबाई पुष्कळच निश्चिंत झाल्या तर एक दिवस चंदोबांनीं त्यांना काळजींत टाकलें.

रोज संध्याकाळीं बुलबुल व तो साधारणपणें पांचाच्या सुमाराला घरीं येत. बुलबुल हल्लीं मैत्रिणींच्या सोबतीनें येत असे व विश्राम चंदूला घेऊन येत असे. पण आतांशा चंदूला गड्याबरोबर येण्याची लाज वाटूं लागली. वर्गांतील मुलगे त्याला 'भागूबाई' म्हणून चिडवूं लागले. त्यामुळें गड्याला न पाठविण्याबद्दल त्यानें उमाबाईंना फार गळ घातली. पण तो घरीं येईपर्यंत उमाबाईंना साहजिकच चैन पडत नसे.

नि त्या दिवशीं तर साडेपांच वाजून गेले तरी चंदूचा पत्ता नाहीं. पावणेसहा झाले तशा त्या स्वतः चंदूच्या शाळेंत जावयास निघाल्या. बुलबुलहि त्यांच्याबरोबर जाण्यास तयार झाली.

एवढ्यांत एका मित्रासह चंदू येतांना दिसला. बुलबुल खालीं धांवली व तिनें म्हटलें, "चंदू, किती उशीर झाला रे तुला? काय करीत होतास तूं?"

चंदू कांहीं बोलणार तोंच त्याचा मित्र म्हणाला, "आज सरनीं आमच्या सबंध वर्गाला शिक्षा केला होती."

"शिक्षा?—ती कां? चंदूनें काय अपराध केला?" बुलबुलनें पटकन् विचारलें.

" अं–चंदूनें नाहीं कांहीं अपराध केला. इतर पांचसहा मुलांनीं 'सरां'चा अपमान केला म्हणून सगळ्या वर्गालाच शिक्षा केली त्यांनीं. आपली आई नि ताई काळजी करीत असतील असं चंदू म्हणाला म्हणून मुद्दाम मी आलों त्याच्याबरोबर. " चंदूच्या मित्रानें सांगितलें.

बोलत बोलत तीं तिघें एव्हांना पायऱ्या चढून वर आलीं होतीं. त्यामुळें दाराबाहेर उभ्या असलेल्या उमाबाईनीं चंदूच्या मित्राचें बोलणें एकलें व त्या म्हणाल्या, " तूं आलास सोबत तें बरं केलंस हो. पण थोड्याशा अपराधासाठीं सर्वांनाच शिक्षा करायची म्हणजे काय बाई ? अन् ही त्या निरपराधी मुलांनाच नव्हे तर त्यांच्या आईबापांना, प्रेमळ बहीणभावालासुद्धां शिक्षा होते ! बरं पण बाळ, नांव काय तुझं ? "

" वामन पाटकर. "

" अय्या ! म्हणजे तूं चंदूच्या वर्गाचा मॅनिटर आहेस तर ? " बुलबुल पटकन् म्हणाली. वामनानें ऐटींत होकार दिला.

" वामन, तूं चंदूबरोबर घरापर्यंत आलास हें छान झालं हं-आतां हाततोंड धू नि खाणं खा थोडं." उमाबाई प्रेमानें बोलल्या.

पण वामन घाईघाईनें म्हणाला, " नको, नको—जातों मीं–उशीर झालाय मला—"

नि मग चंदूच्या खांद्यावर हात टाकून घरांत जातांना बुलबुल म्हणाली, " चंदू, हें बाबा विचित्रच तुझ्या शाळेचं ! थोड्यांनीं चूक केली म्हणून काय सगळ्यांनाच शिक्षा द्यायची ? अन् मग आपल्या पाठीमागच्या रस्त्यावर रहाणाऱ्या त्या बाबूलाहि शिक्षा भोगावी लागली तर ! तोहि तुझ्याबरोबरच आला काय रे ? "

पण ह्यावर कांहींच उत्तर न देतां चंदू स्तब्ध उभा राहिला.

एवढ्यांत उमाबाई त्याच्यासाठीं बटाटेपोहे बशींतून घेऊन आल्या. पण नेहमींप्रमाणें तो हात, पाय धुवावयाला गेला नाहीं हें पहातांच त्या म्हणाल्या, " अं ? हें रे काय चंदू ? हात-पाय धुतोस ना बाळा ? किती भूक लागली असेल माझ्या सोन्याला ! जा, लवकर धुऊन ये. कीं आज मी धुऊं माझ्या

२८.८.६१ ग्रा. नं. ७७२७ मा. सं. ३/गां. ६१

छोट्या बाळाचं हात-तोंड ? " असें हंसत, हंसत बोलत उमाबाई त्याच्याजवळ येतांच चंदूचें तोंड खरकन् उतरलें.

रडव्या आवाजांत तो म्हणाला, " आई, आम्हांला शि-शिक्षा नव्हती केली 'सर'नीं—वर्गातल्या मुलांबरोबर मी क्रिकेटची मॅच बघायला गेलों होतों म्हणून उशीर झाला मला–"

उमाबाई हतबुद्ध झाल्या. चंदूनें—नऊ वर्षांच्या चंदूबाळानें—खोटेपणा केला आपल्याशीं. आहे तरी काय हें ?

" कुठल्या क्रिकेट मॅचला गेला होतास तूं चंदू ? " त्यांनीं व्यथित स्वरांत विचारलें.

" आमच्या शाळेची त्या सिटि हायस्कूलबरोबर गवालिया टॅंक मैदानावर मॅच होती नि सगळीं मुलं ती पहायला गेलीं नि त्यांनीं फार आग्रह केला म्हणून मीहि गेलों. "

" अन् मला न विचारतां तूं गेलास हें बरोबर केलंस कां तूं ? "

" ना–नाहीं—"

" चंदू, मीं तुझ्याकडून अशी अपेक्षा केली नव्हती. तूं माझ्याशीं लबाडी करशील असं वाटलं नव्हतं मला ! अन् तूं आज दोन अपराध केलेस. मला न विचारतां मॅचला गेलास नि झालेल्या उशीरावर पांघरुण घालण्यासाठीं मास्तरांनीं सबंध वर्गाला खोळंबून रहाण्याची शिक्षा केली असं खोटंच सांगितलंस तूं—" उमाबाई रुक्ष, कठोर स्वरांत म्हणाल्या.

" पण आई, " त्यांचा हा अपरिचित कठोर स्वर ऐकून बावरलेली बुलबुल मध्येंच बोलली, " चंदूनें नाहीं तसं सांगितलं. त्याच्या त्या मॉनिटरनें—वामन पाटकरनें—सांगितलं तें. "

" नि त्या वेळीं गप्प राहून चंदूनें त्याच्या त्या खोटं बोलण्याला दुजोरा दिला ! म्हणजे त्यानें स्वतः खोटं बोलण्यांतच जमा तें ! " उमाबाईंचे हे शब्द चाबकाच्या फटक्यासारखे चंदूला झोंबले.

" आई, " खालीं मान घालून तो म्हणाला, " तूं काय ती शिक्षा कर मला ह्या अपराधांबद्दल—मी मुकाट्यानें ती सोशीन. "

क्षणभर विचार करून उमाबाई म्हणाल्या, "मुलांनों, तुम्हीं चांगलं निपजावं म्हणून रात्रंदिवस मीं नि तुमचे बाबा झटत असतों. त्यामुळें तुम्हीं अशा चुका केल्यात म्हणजे मला भारी दुःख होतं. माझ्यावर तुम्हां दोघांचं फार प्रेम आहे हें मला ठाऊक आहे! पण आईवरील प्रेमामुळें आपल्या मनावर ताबा कांहीं धरवत नाहीं तुम्हांला—खरं ना?"

नुकत्याच झालेल्या सुनंदाप्रकरणालाहि उद्देशून आई हें बोलतें आहे हें बुलबुलनें ओळखलें. गोरामोरा चेहरा झाला तिचा.

"तेव्हां मुलांनों," उमाबाई पुढें म्हणाल्या, "तुमच्या अपराधाला एक वेगळीच शिक्षा ठरवलीय् मीं! नि ती ही कीं, तुम्हीं असा अपराध केला् कीं, मी माझ्या हातावर पांच छड्या मारून घेणार—जा बुलबुल, तुझी फूटपट्टी घेऊन ये."

"नको, नको—आई, आमच्या अपराधाबद्दल तुला कां शिक्षा?" रडव्या मुद्रेनें बुलबुल बोलली.

व मोठ्यांदा रडत चंदू म्हणाला, "आई, नको ग. तूं मला मार, पण तुला नको मारून घेऊंस. मी पुनः कध्धीं असं करणार नाहीं. एक वेळ मला क्षमा कर."

"ठीक आहे. क्षमा करीन मी आतांची खेप—पण चंदू, खरं सांग हं, मास्तरांनीं शिक्षा केली अशी थाप मारायची हें तूं नि त्या बामनानें आधींच ठरवलं होतं ना?" उमाबाईनीं ही गोष्ट पुरती धसाला लावण्याच्या हेतूनें विचारलें.

त्यावर चंदू मनापासून म्हणाला, "नाहीं ग आई. तुला असं खोटं सांगण्याचं मुळींच ठरवलं नव्हतं आम्हीं! त्या पाटकरानें मधां एकदम तुला तसं सांगून टाकलं ग—"

"मग त्याच वेळीं त्याला तूं कां अडविलं नाहींस चंदू?"

"कसं अडवणार ग आई? तो मॉनिटर आहे ना आमच्या वर्गाचा? वर्गांतील एकादा मुलगा त्याच्या मनाविरुद्ध वागला तर 'सर'कडे नांव सांगतो तो त्या मुलाचं नि मग शिक्षा होते ग त्या मुलाला—"

"म्हणजे तो पाटकर आपल्या सत्तेचा दुरुपयोग करतो तर! पण चंदू, तुम्हीं मुलं अशीं त्याला घाबरून वागूं लागलांत तर अधिकच शेफारून जाईल तो! त्यापेक्षां तुम्हीं एकजुटीनें मास्तरांना ही वस्तुस्थिति सांगावी हें बरं!"

"माझ्या मित्रांना सांगून पाहीन मी हें. पण त्यांना पटेल काय कोण जाणे! आई, मला एवढी एक वेळ क्षमा करशील ना तूं?"

"होय. करीन. कारण तूं स्वतः फारशी चुकी केलेली नाहींस हें माझ्या लक्षांत आलंय! मुलांच्या मताधिक्याविरुद्ध जाऊं न शकण्याचा दुबळेपणा तुझ्या अंगीं असल्यामुळें हें घडलं! पण चंदू, असं करून कसं चालेल? मॉनिटर कागाळीं करील—"

"अन् आई, वर्गांतलीं मुलंसुद्धां कट्टी करण्याचा धाक घालतात ग. आज तसंच झालं. मी मॅचला नाहीं येत म्हटलं तर मुलांनीं कट्टी करण्याचं ठरविलं माझ्याशीं—"

"पण असं मुलांना भिऊन तूं मुलं सांगतील तें करणार काय? म्हणजे बुल-बुल मोहाला बळी पडली, तूं आज भीतीला बळी पडलास! पण बुलबुलनें तेव्हांपासून तिला मोह पाडणाऱ्या त्या मुलीची मैत्री सोडली—"

"मग आई, मीहि आजपासून पाटकरला नि तशीच दादागिरी करणाऱ्या इतर मुलांना भिण्याचं सोडून देईन!" चंदू उद्गारला.

"पण आई," बुलबुल म्हणाली, "मराठी शाळेंत असतांना चंदू असा भित्रा नव्हता ग—त्यानें विमान बनवलं होतं ना, त्या वेळीं कांहीं मुलांनीं त्याची पुष्कळ टिंगल केली, पण आपला चंदोबा मुळीं भ्याला नाहीं. नि मग तें विमान डौलांत उडून गेल्यावर तीच मुलं विमानशोधक म्हणून त्याचं कौतुक करूं लागलीं."

बुलबुलनें ही आठवण करून देतांच मघांपासून काळवंडलेला चंदूचा चेहरा क्षणांत उजळला. तो उत्सुकतेनें बोलला, "ताई, बरी आठवण केलीस हं ही—पण तिथल्यापेक्षां इथलीं मुलं फार दंगेखोर आहेत ग—नि भांडखोर-सुद्धां—पण ताई, मी आतां नीट लक्षांत ठेवीन कीं, मला जर निरनिराळे शोध लावायचे आहेत तर असं मुलांना भिऊन कसं चालेल?" आपली चिमु-

कली छाती फुगवीत चंदू म्हणाला, “हो, मी तेलाशिवाय जळणाऱ्या दिव्याचा शोध लावणाराय् आतां—”

“तेलाशिवाय जळणारा? म्हणजे तोच ना तो कापराची वातवाला?” बुलबुलनें हंसून विचारलें.

“ऊंहुं—तो बाद केला मीं—आतां मेणबत्त्यांच्या वितळलेल्या मेणाची लांब वात करून ती दिव्यांत घालायचं ठरवलंय् मीं. फुकट जाणाऱ्या मेणाचा उपयोग होऊन बिनपैशांत दिवा जळेल!”

चंदूचा हा नवीन शोध ऐकून उमाबाईंना गंमत वाटली. पण त्याच वेळीं त्यांच्या मनांत आलें, ह्याला निसर्गतःच संशोधनकलेचें अंग आहे व म्हणून ह्या त्याच्या अंगच्या कलेची वाढ करण्यास त्याला शक्यतों मदत करावयाची असें ‘हे’ म्हणतात तें खोटें नाहीं!

व मघांपासून त्रासिक बनलेली त्यांची चित्तवृत्ति ह्या विचारानें पुष्कळ निवळली!

× × ×

## ·१५·

# रोजनिशींतील नोंद व शेरे

कालवृक्षावर दोन कळ्या उमलून गेल्या आहेत.

इंग्रजी तिसरीपर्यंत फ्रॉक व चौथींत फ्रॉक व अधूनमधून स्कर्ट, ब्लाऊज, परकर, पोलके घालणारी बुलबुल आतां पांचवींत जातांच साडी नेसूं लागली आहे. तेरा वर्षांच्या मानानें बुलबुलची चार फूट अकरा इंच उंची व सत्त्याऐंशी पौंड वजन म्हणजे छानच आहे.

घरांत आई, वडील व शाळेंत शिक्षकिणी बुलबुलला नानारीतीनें शिक्षण देत होतींच, पण आतां निसर्गानेंहि तिला धडे द्यावयाला सुरुवात केली. तिच्या हालचालींत आपोआप वेगळेंच मार्दव येऊं लागलें. तिचा दांडगेपणा बराच मंदावला. तरीसुद्धां चंदूला चंबूबरोबर धांवाधांवी खेळतांना पाहिलें कीं तिलाहि हुकी येई.

निसर्ग देत असलेल्या धड्यांचा तिला पार विसर पडे, आपली मुलीची जात व वाढतें वय तिच्या ध्यानांतच रहात नसे.

एका शनिवारीं दुपारीं दादरहून तिची मालुमावशी त्यांच्या घरीं बसावयास आली होती नि बुलबुलला हुंदडण्याची त्याच वेळीं हुकी आली. आपल्या पांचवारी साडीचा कासोटा मारून ती चंदूबरोबर पाटशिवणीचा खेळ खेळूं लागली.

तें पाहून मालुमावशीला विस्मय वाटला. तिच्या समोरून धांवत जाणाऱ्या

बुलबुलला हांक मारून तिनें म्हटलें, "बुलबुल, हें ग काय? असा वांडपणा करायला लहान का आहेस तूं आतां? माझी पद्मा तुझ्याचएवढी पण मीं नाहीं बाई, तिला असा धुडगूस घालूं देत — "

मावशीचा हा भडिमार ऐकून बुलबुलचा चेहरा उतरला. ती ह्यावर कांहीं बोलणार असें वाटलें, पण ती बोलली नाहीं. आपले ओठ तिनें घट्ट मिटून घेतले. व कांहीं क्षणांनीं तिथेंच बसलेल्या उमाबाईंकडे पाहून तिनें मंद स्मित करीत विचारलें, "आई, जाऊं मी खेळायला?"

"जा हो बाळ," उमाबाईंनीं सस्मित उत्तर केलें. व मग बुलबुल नाचऱ्या पावलांनीं बाहेर जातांच त्या मालुताईला म्हणाल्या, "मालू, बरं झालं आज हा विषय निघाला! आज माझ्या बुलबुलला धांवतां-पळतांना पाहून तूं चकित झालीस तशीच त्या दिवशीं तुझ्या पमीला पाहून मी स्तंभित झालें. नुसती आजीबाई बनवली आहेस ग तूं तिला! मोजकंच बोलायचं, मोजकंच चालायचं!"

"मग तूं बुलबुलला जो दांडगोबा करून ठेवलं आहेस तें बरं होय?"

"ह्या वयांत खात्रीनेंच बरं! मालू, तुला ठाऊकच आहे कीं, लहानपणापासूनच बुलबुल फार मस्तीखोर, खेळकर आहे—आतां हळूहळू तिला समज येतोय्, जाणीव होतेय नि ती आपोआपच थंड होते आहे. अन् तेंच योग्य आहे! मुलींचं हें वय जरा चमत्कारिक असतं! त्यांनां स्वत्वाची ओळख पटत असते, पण वडील माणसांनीं सारखा त्यावरच भर दिला, तूं मोठी झालीस अशी धांवूं-पळूं नकोस, तूं मोठी झालीस अमकं करूं नकोस, असं कानीं-कपाळीं ओरडत राहिलं तर मुली बावरून जातात. त्यांच्या भावना दुखावतात नि पटकन् ह्याची प्रतिक्रिया म्हणून त्या वडील माणसांनां रागाच्या भरांत कांहीं तरी बोलतात—"

"अगबाई! आक्का, मघां मीं बुलबुलला रागावलें ना, तेव्हां ती तटकन् मला कांहीं तरी बोलणार असं क्षणभर वाटलं मला—पण ती निमूट राहिली अन् ती नि तूं एकमेकींकडे पाहून हंसलांत नि ती बाहेर गेली—" किंचित् गोंधळून मालुताई बोलली.

त्यावर उमाबाई हंसून म्हणाल्या, "वाः! तें लक्षांत आलं तर तुझ्या? तें

किनई, माझं नि बुलबुलचं गुपित आहे. पण बुलबुलच्या वयाची लेक आहे तुझी, म्हणून तुला सांगतें मी तें— हें बघ, मघां मीं तुला सांगितलं ना, त्याप्रमाणें मुलांमुलींचं हें वय भारी गुंतागुंतीचं असतं— जणु विजेची उघडी तार! स्पर्श होतांच झिणझिण्या येतात— हल्लीं बुलबुलचा स्वभावहि असाच बनला होता. आपलं बाळपण संपलं म्हणून तिला वाईट वाटत होतं नि ह्या अपरिचित वाढत्या वयामुळें मनाला एक प्रकारचं वैषम्य टोचत होतं, त्यांत वडील माणसांनीं नेमकं त्यावरच बोट ठेवलं कीं तिला पटकन् चीड येई. नि रागानें ती कांहींतरी अधिकउणं बोले. नि नंतर तिला पश्चात्ताप होई !"

"हंऽ! मग मघां ती असंच कांहीं तरी बोलणार होती वाटतं मला— पण वेळींच सावरलंन् तिनं स्वतःला— "

"होय. त्याचं असं झालं मालू, दोन चार वेळां बुलबुलचा स्वतःच्या मनावरील ताबा सुटलेला मीं पाहिला. नि मीं तिला समजुतीनें सांगितलं कीं, हा तापटपणा तिनें माझ्यापासून घेतला आहे— "

"काय ? तुझ्यापासून ?" मालुताई विस्मयानें उद्गारल्या, "आक्का, तू तर कित्ती कमालीची शांत आहेस !"

"शांत बनलें मी, मालू. आपल्या आईनें मला उपदेश केला होता कीं, असा रागाचा पारा एकदम चढल्यावेळीं मनाशीं दहा अंक मोजावे. तेवढ्यानें पारा न उतरल्यास आणखी दहा मोजावे. नि हाच उपदेश मीं बुलबुलला केला."

"अस्सं ? म्हणजे मघां मीं बोललें त्याचा तिला विषाद वाटला, पण तोंडावाटे अधिक-उणं येऊं नये म्हणून मनाशी आंकडे मोजीत होती ?"

"होय. नि तिनें जिभेवर ठेवलेला हा ताबा माझ्या लक्षांत आला हें तिला कळावं म्हणून मीं उत्तेजनार्थ स्मित केलं."

उमाबाईंचे हे शब्द ऐकतांच मालुताईचें अंतःकरण भरून आलें. "आक्का किती समंजसपणा हा तुझा ! आतां तुझ्याकडून दीक्षा घेणार हं मी. अन् आक्का, आतां बुलबुलचा तापटपणा थंडावलाय् तर ?"

"होय ना. पुष्कळच थंडावला. पण मीं आणखी एक युक्ति केली. परवांच्या जानेवारींत मीं बुलबुलला एक मोठीशी रोजनिशी आणून दिली. नि त्यांत रोज रात्रीं दिवसभरांत घडलेल्या बऱ्या, वाईट गोष्टींची नोंद करायला सांगितलंय

मीं तिला. ही नोंद केल्यावर तिनें रोजनिशी माझ्याकडे आणून द्यायची असं ठरलंय् आमचं ! नि माल्, तिनें लिहिलेलं मी वाचतें नि खालीं लहानसा शेरा लिहितें. आतां आज रात्रीं तिनें मवां ओठांवर आलेले रागाचे शब्द प्रयत्न-पूर्वक गिळले ह्याचं चार शब्दांत कौतुक लिहिणार मीं. त्यामुळें आपलं चुकतं कुठें हें पहायला वडील माणसं टपत असतात असं न वाटतां आपल्या गुण-दोषांची योग्य चिकित्सा केली जाते अशी बुलबुलची खात्री होते व तिचा माझ्यावरील विश्वास कायम रहातो ! ”

“ आक्का, आदर्श आई आहेस हो तूं ! माझ्या पमीवर मी जी भारीच करडी नजर ठेवतें ती आजपासून सैल करीन हं ! ” मालुताई मनापासून म्हणाली.

“ माल्, मुलीवर काय नि मुलांवर काय, आईबापांची नजर तर हवीच ! करडी नजरहि हवी—पण त्या करड्या नजरेला निव्वळ अविश्वासाची, धाकाची धार असूं नये. विशेषतः आई लेकींत तर फार खेळीमेळीचं नातं असावं ! ” उमाबाई प्रत्येक शब्द विचारपूर्वक उच्चारीत होत्या.

“ पण म्हणजे आक्का, मुलीला आईविषयीं आदर नको का वाटायला ? ” मालुताईनें मध्येंच विचारलें.

“ हवा तर ! मुलीला आपल्या आईविषयीं आदर वाटत नसला तर सुकाणूं नसलेल्या होडीप्रमाणें तिचं जीवन कुठें तरीच वहावत जाईल ! तेव्हां तिला आदर तर वाटायला हवाच ! पण हा आदर भीतींतून उत्पन्न व्हायला नको—प्रीतींतून उत्पन्न व्हायला हवा—तरच तो तिला खरा मार्गदर्शक होईल ! मालु, रागावूं नकोस हं. तुझ्या मुलांना किनई, तुझ्याबद्दल आदर वाटतो, पण तुझी भीति अधिक वाटते. आईनें सांगितलेली हरेक गोष्ट ऐकायलाच हवी नाहीं तर आई रागावेल असं मुलांना वाटण्याऐवजीं आईचं सांगणं योग्य असतं म्हणून त्याप्रमाणें वागायला हवं असं मुलांना वाटलं पाहिजे ! ”

“ आक्का, तुझा शब्द न् शब्द मला पटतो. खरंच, आजपासून मुलांकडे वेगळीच वागणार मी—”

“ पण मालु, एक लक्षांत ठेव हं—मुलांना अगदीं कडक शिस्तींत वागवीत होतीस तूं—ती शिस्त एकदम सैल करूं नकोस ! अतिशिस्त वाईट नि अजि-बात शिस्त नसणंहि वाईट ! संसारांत हरेक गोष्टींत सुवर्णमध्य राखायला हवा

आपण! तेव्हां तूं असं कर, तुझ्या पमीला अधूनमधून इकडे पाठव. बुलबुलच्या सहवासांत स्वातंत्र्याचा दुरुपयोग न करतां तें कसं उपभोगावं हें शिकेल ती!"

"हो, हो! असंच करीन मी आक्का. तूं तिला मघां आजीबाई म्हटलंस तें खोटं नाहीं. जरा अकालप्रौढच बनलीय् माझी पद्मा—"

"माले, अग, नाचण्याउनाडण्याचे हे दिवस पुढें लाभतील का कधीं त्यांना? बाळपण हें परतीच्या लाटेप्रमाणें बघतां बघतां दूर जात असतं! अन् आपण स्वतःवरून पारख करावी ग—तूं नि मी लहानपणीं काय कमी हुंदडत होतों?"

"अन् आक्का, झाडावर चढण्याचं किती वेड होतं आपल्याला—" पूर्वस्मृती उजळीत मालुताई उद्गारली.

"होय ना—अन् आपण साड्या नेसूं लागतांच आईनें आपल्याला झाडावर चढण्याची मनाई केली तेव्हां तूं किती खट्टू झाली होतीस? सरसर झाडाच्या शेंड्यावर चढायला मिळणार नाहीं म्हणून तूं रडली होतीस. आठवतं तुला मालू?"

"होय आक्का. हं ऽ! खरंच, आज पुष्कळ शहाणं, डोळस केलंस हं तूं मला. अन् आक्का, मजेनं फुलपांखरागत बागडणाऱ्या बुलबुलला उगीच मघां नाराज केलं मीं. आतां त्याचीहि भरपाई करतें हं मी."

"कर हो. पण मालू, एक लक्षांत ठेव. आपलं चुकलं तर लहानांकडे शब्दांनीं त्याची कबुली देऊं नये कधीं. त्यामुळें त्यांना अवघडल्यासारखं, खिजवल्यासारखं वाटतं. त्यापेक्षां कृतीनें आपलं बदललेलं मत दाखवून द्यावं. म्हणजे कुणाच्याच पदरीं ओशाळेपणा येत नाहीं!"

"आक्का, तूं माझी बहीण आहेस ह्याचा अभिमान वाटतो ग मला— पण तुझ्या मानानें मी अगदींच ही, डोळे असून आंधळी, असं मनांत येऊन त्याच क्षणीं खेदहि वाटतो ग!" कांहींशा खिन्न स्वरांत मालुताई बोलली.

"माले, फार स्तुति नको हो करूंस माझी! घमेंड चढेल मला अशानें— 'ग'ची बाधा होईल हं!" मुद्दामच मस्करी करीत उमाबाई म्हणाल्या.

त्यावर मालुताईनें हंसून म्हटलें, "तर तर! तुला आणि 'ग'ची बाधा होणार? अन् आक्का, समजा, तशी झालीच तर व्यवस्थित उतारा हजर असेलच कीं तुझ्यापाशीं. पूर्वीं आजीबाईच्या बटव्यांत नाना औषधं नि मात्रा

असत त्याप्रमाणें तुझ्या बटव्यांत संसारांतील हरेक पेचप्रसंगांवर उत्तम सल्ला हजर असतो अशी खात्री झाली माझी!"

एवढ्यांत बुलबुल व चंदू तिथें आलीं. त्यासरशीं मालुताई बुलबुलला म्हणाली, "बुलबुल, उद्यां आमच्या पमीला मी इकडे पाठवणार आहें सकाळींच. दिवसभर मग खूप खेळा, बागडा—हं?"

मालुमावशीचे हे शब्द ऐकतांच बुलबुल थक्क झाली! मावशीच का हें बोलते आहे?

तिनें विस्मयानें विचारलें, "मावशी, खरंच पम्नाला तूं धाडणार इकडे?"

"खरंच ग—तिथं आमच्या बाजूला फारशा मुली नाहींत कुणाच्या. त्यामुळं तिला भारी एकटं एकटं वाटतं." मालुताईनें स्पष्टीकरण केलें.

तेवढ्यांत चंदू म्हणाला, "मग मावशी, पमीताईबरोबर सुधीरलाहि पाठव कीं. म्हणजे आमच्या व्यवस्थित दोन जोड्या होतील!" नि एकदम कसली तरी आठवण होऊन चंदू बुलबुलला म्हणाला, "ताई, जोडीची चौकडी करण्याची आपली ती लहानपणींची जंमत आठवते कां ग तुला?"

अन् ती आठवण होतांच चंदू, बुलबुल व उमाबाई हंसूं लागलीं.

मालुताईलाहि ती गोष्ट ठाऊक असल्यामुळें तीसुद्धां हंसण्यांत सामील झाली.

चंदू हंसत हंसत म्हणाला, "पण ताई, तुझा हल्लींचा फ्रॉक किंवा स्कर्ट ब्लाऊज मला व्यवस्थित झाला असता हं मागच्यापेक्षां. कारण आपल्या उंचींत आतां एकाद्याच इंचाचा फरक असेल! खरं कीं नाहीं ग मावशी?" अन् चंदू बुलबुलच्या शेजारीं ताठ उभा राहिला.

आतां खरोखरीच त्या दोघांच्या उंचींत फारच थोडा फरक होता. अकरा वर्षांच्या मानानें चंदू पुष्कळच उंच वाढला होता. नि अंगानें किरकोळ असल्यामुळें तो आणखीच उंच वाटे.

पण त्याचा पोरकटपणा नि चंबूबरोबर चालणारी लाडीगोडी मात्र कायम होती. आतांसुद्धां डोळांत आपल्या उंचीचें प्रदर्शन करून होतांच तो चंबूबरोबर हातापायांवर सरपटत खेळण्यांत रंगला.

तें पाहून मालुताई चेष्टेनें म्हणाली, "अरे वाः! आक्का, तुझा चंदुबाळ आतांशा रांगायला लागलाय् वाटतं?"

मावशीच्या ह्या मस्करीमुळें चंदू जरासा लाजला. त्याबरोबर बुलबुल पटकन म्हणाली, "मावशी, अग, आपले पूर्वज म्हणजे माकडं ना म्हणे! तेव्हां त्या पूर्वजांबद्दल आदर दाखवण्यासाठीं चंदू कधींमधीं असा हातापायावर चालतो."

ताईनें अशी आपली बाजू घेतलेली पाहून चंदूनें तिच्याकडे बघून हंसत आपली कृतज्ञता व्यक्त केली.

त्या भावंडांचें हें परस्परप्रेम व एकी पाहून मालुताईला कौतुक वाटलें.

इतक्यांत शंकरराव तिथें आले. बुलबुलचा उद्गार त्यांनीं येतां येतां ऐकला होता. त्याला उद्देशून ते म्हणाले, "अन् बरं का मालुताई, आमच्या चंदूनें पूर्वजांचा आणखीहि एक गुण उचललाय. नि तो म्हणजे अनुकरण! अहो, गेल्या वर्षीं नवी पत्र्याची मोटार उलगडून ह्या पठ्ठयानें त्यांतलीं यंत्रं व्यवस्थितपणें आपण बनविलेल्या त्याच आकाराच्या पुठ्ठयाच्या मोटारींत बसवलीं नि ती मोटार चालू केली कीं त्यानें! असलं हें हुषार माकड आहे आमचं!"

शंकररावांनीं चंदूला माकड म्हटलें तरी त्याला त्यामुळें जराहि खेद वाटला नाहीं. कारण हें बोलतेवेळींचा त्यांचा स्वर इतका प्रेमळ व कौतुकपूर्ण होता कीं त्या स्वरांत उच्चारलेली शिवीसुद्धां शाबासकीसारखी वाटली असती!

अन् नाहीं तरी शब्द हे कधींच मुळांत बरे वा वाईट नसतात! अग्नीप्रमाणें त्यांचाहि बरेवाईटपणा उपयोग करण्यावर अवलंबून असतो!

आतां शंकररावांच्या त्या शेऱ्यानें सर्वांनाच गंमत वाटली. व मालुताईच्या मनांत आलें, नुसती आक्काच नव्हे तर ह्या छोट्या कुटुंबांतील सर्वच माणसें आदर्श आहेत. एकमेकांच्या दोषांकडे दुर्लक्ष करून गुणांचा गौरव केल्यानें पुष्कळच सुखसमाधान लाभतें ही महत्त्वाची गोष्ट हीं सर्वच लहानथोर माणसें आचरणांत आणतात हेंच खरें!

नि आपल्याहि संसारांत सुखाच्या ह्या मूलमंत्राचें महत्त्व प्रत्येकाला हळूहळू पटवावयाचें असा मालुताईनीं आपल्या मनाशीं निश्चय केला!

चांगल्या संगतीचें माहात्म्य हें असें असतें! 'आपणांसारीखे करिती तात्काळ! नाहीं काळवेळ तयालागीं!' हें संतवचन अगदीं खरें आहे.

× × ×

# ·१६·

## रँग्लर बुलबुल व संशोधक चंदू !

कालवृक्षावर आणखीहि दोन वर्षकलिका उमलून गेल्या आहेत ! बुलबुल नुकतीच मॅट्रिकच्या वर्गात गेली असून चंदोबा पांचवींत चढले आहेत !

नेहमींप्रमाणें यंदाहि बुलबुलचा पहिला नंबर आलाच—पण गणित-विषयांत तिला शंभर टक्के, पैकींच्या पैकीं, मार्क मिळाल्यामुळें खुद्द प्रिन्सिपल्बाईनीं तिचें फार कौतुक केलें व त्या आशयाची चिठी लिहून त्यांनीं मुद्दाम शंकर-रावांना पाठवली होती.

व आतां तीच वाचून त्याबद्दलच शंकररावांचें व उमाबाईचें बोलणें चाललें होतें.

शंकरराव समाधानें म्हणाले, "भारी हुषार आहे हं ती पोर ! नि गणित विषयाचं तिला पहिल्यापासूनच वेड ! खरंच, बुलबुल मुलगा असती तर कुठून तरी पैसा गोळा करून तिला आय्. सी. एस्. व्हायला विलायतेला धाडलं असतं मीं !"

"पण बुलबुल मुलगी आहे—नि पुढेंपाठीं लग्न करायलाच हवं तिचं !" उमाबाई जरा चांचरत बोलल्या.

"लग्न ! लग्न ! बायकांना लग्न जमविण्याचा भारीच नाद असतो म्हणायचा ! बाळपणीं बाहुला-बाहुलीचं लग्न, तरुणपणीं स्वतःचं नि कलत्या वयांत मुला-बाळांचं !—पण तूं ह्या नियमाला अपवाद असशील असं वाटलं होतं मला."

शंकररावांनीं असें म्हणतांच उमाबाई हंसल्यासारखें करून म्हणाल्या, "तें खरं, पण मालूच्या पमीचं परवां लग्न ठरलं. नि बुलबुलहि तिच्याच एवढी, पंधरा वर्षांची तेव्हां—"

"बुलबुलला मॅट्रिक तरी होऊं देणार कीं नाहीं तूं? अं?"

"होय ना— तिनें मॅट्रिक व्हावं अशी माझीहि इच्छा आहे. नि मॅट्रिक झाल्यावर तिचं लग्न करावं—" उमाबाईनीं पुनः आपलें घोडें पुढें दामटलें.

"शीः! इतक्या लहान वयांत कसलं लग्न करायचं?" शंकरराव अनिच्छेनें उद्गारले.

"पण आजकाल लौकर लग्नं करण्याचाच प्रघात सुरू झालाय् ना? प्रौढ विवाह, अतिप्रौढ विवाह रूढ झाले. त्यांतून पुढें आंतर्जातीय, आंतर्धर्मीय विवाहांचं तण उगवलं नि त्यापायीं समाजाची घडीच विस्कटायची वेळ आली तेव्हां परत बालविवाहावर नसलं, तरी साधारण सोळा ते वीस ह्या वयावर मुलींचीं लग्नं करावीं इथंवर लोकमत आलंय्!" उमाबाई म्हणाल्या.

"होय. आणि ह्या लोकमताला नि घरांतल्या म्हाताऱ्या सासूच्या मताला मान देऊन मालुताईंनीं आपल्या लेकीचं लग्न आपल्या नणंदेच्या मुलाशीं ठरवलंय् नि पुढल्या वर्षी तें पार पडणार, असंच ना? मला ठाऊक आहे तें. पण हें बघ, ही झाली सर्वसाधारण मुलींची गोष्ट. आपली बुलबुल इतर मुलींपेक्षां फारच बुद्धिवान् आहे. तिच्या प्रिन्सिपलबाईनें केलेली स्तुति वाचलीस ना तूं? मीं तर बुवा असं ठरवलंय् कीं, बुलबुलला हवं असेल तेवढं शिकूं द्यायचं. बी. ए., एम्. ए., पी. एच. डी.—उंहुं, असं तोंड वाईट करूं नकोस. लग्न म्हणजेच जीवनाचं साफल्य असं मानण्याचे दिवस गेलेत आतां. अन् त्यांतून आपल्या भारताला नुकतंच स्वातंत्र्य मिळालंय्. आपल्या देशाला आतां सुशिक्षित महिलांची अधिकच गरज आहे. इतर देशांबरोबर बौद्धिक चढाओढ करून त्यांत आपल्या देशाला मानाचं स्थान मिळवून देण्यासाठीं आपल्या तरुण पिढींतील बुद्धिवान् मुलांमुलींनीं आपली बुद्धिमत्ता देशाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं खर्च करणं रास्त नाहीं का? तुला कल्पना नाहीं, पण आपली बुलबुल खरोखरच विलक्षण हुषार आहे! तिच्या बाईनींसुद्धां पत्रांत म्हटलंय् कीं, बुलबुल त्यांच्या शाळेचं भूषण तर आहेच, पण ती आपल्या

समाजाला, देशालाहि ललामभूत होईल. अशी आपल्याला आशा, खात्री वाटते!" अंतःकरणाच्या तळमळीनें शंकरराव एवढें लांबलचक बोलून थांबले.

त्यांच्या बोलण्याचा त्यांच्या अपेक्षेप्रमाणें उमाबाईवर इष्ट परिणाम झाला. किंचित् स्मित करीत त्या म्हणाल्या, "होय. प्रत्येकानं आपल्या आईवडिलांचं, गुरूचं आणि जन्मभूमीचं ऋण थोडं तरी फेडायलाच हवं असं माझे वडील आम्हांला नेहमीं सांगत—"

"अन् अगदीं खरं आहे तें! आणि नुकत्याच स्वतंत्र झालेल्या आपल्या मातृभूमीचे डोळे तर आशेनें ह्या तरुण पिढीकडेच लागलेले आहेत." शंकरराव एवढें बोलताहेत तोंच बुलबुल तिथें आली. त्यासरशीं शंकरराव कौतुकानें म्हणाले, "हं—ही आली आपली तरुण पिढी!" व ते अत्यंत प्रेमानें बुलबुलकडे पाहूं लागले.

उंच, सडसडीत बांध्याची व नीटस नाकडोळ्यांची निमगोरी बुलबुल शंकररावांना भारी प्रिय होती. विशेषतः बुद्धिमत्तेनें चकाकणारे तिचे काळेभोर, स्वच्छ डोळे व भव्य कपाळ त्यांना फारच प्रिय वाटे.

नेहमींप्रमाणें वडिलांच्या खुर्चीपाशीं आपलें आवडतें वेताचें स्टूल घेऊन त्यावर बुलबुल बसतांच तिच्या भावी यशाचीं पूर्वचिन्हें म्हणून शंकरराव तिच्या त्या टपोऱ्या डोळ्यांकडे व विशाल भालपट्टाकडे कांहींशा कुतूहलानें टक लावून पाहूं लागले.

जन्मलेल्या बालकाच्या कपाळावर सटवी त्याचें भवितव्य लिहिते ह्या जुन्या समजुतीवर शंकररावांचा मुळींच विश्वास नव्हता. देवानें म्हणा, दैवानें म्हणा कीं निसर्गानें म्हणा, मनुष्याच्या मनगटांत पराक्रम घातलेला असतो. तरवारीच्या, लेखणीच्या किंवा अवांतर साधनांच्या मदतीनें मनुष्यप्राणी वेगवेगळ्या रीतीनें मनगटांतील पराक्रम व्यक्त करीत असतो, अशीच त्यांची भावना होती व तीच त्यांनीं आपल्या मुलांच्या मनावरहि बिंबवली होती!

—पण व्यक्तीव्यक्तीचें भवितव्य वेगळें असतें आणि त्या त्या व्यक्तीच्या कपाळावरील रूपरेषांवरून त्याच्या भवितव्याच्या रूपरेषेची पुसटती कल्पना येऊं शकणार नाहीं का असें त्यांना अनेकदां वाटे. व आतांहि हीच कल्पना मनांत येऊन ते उत्सुकतेनें बुलबुलच्या कपाळाकडे पाहूं लागले.



संशोधक चंद व गॅलर

त्यांची ती नजर सहेतुक वाटून बुलबुलनें म्हटलें, “बाबा, काय बघतां आहां एवढं टक लावून ? अन् आतां मी आलें तेव्हां ‘ही आली आपली तरुण पिढी’ असं कां म्हटलंत तुम्ही आईला ?”

ह्यावर उमाबाई हंसून म्हणाल्या, “ऐकलंस का बुलबुल, परवां आपल्या पमीचा साखरपुडा झाला ना, त्याबद्दल बोलत होतों आम्हीं.”

“नि ऐकलंस का बुलबुल,” मुद्दाम उमाबाईसारखा हेल काढीत शंकरराव हंसत म्हणाले, “तुझी आई म्हणत होती कीं, आतां बुलबुलचा साखरपुडा केव्हां करूं या ? अन् तेवढ्यांत तूंच आलीस इथें. मग आतां सांग बघूं. कधीं करायचं तुझं लग्न ? अं ? पमीचा साखरपुडा यंदा झाला तरी लग्न पुढल्या वर्षी होणार आहे म्हणे ! मग तुझा साखरपुडा उद्यां नि लग्न परवां करूं या का ?”

ही मस्करी आहे हें बुलबुलनें ओळखलें व म्हणून ती गालांतल्या गालांत हंसली.

तें पाहून उमाबाई मान वेळीत म्हणाल्या, “तरी बरं, उद्यां लग्न नि परवां साखरपुडा करूं या काय म्हणून नाहीं विचारलं लेकीला !”

ह्यावर तीं तिघेंहि पुष्कळ हंसलीं.

आज बुलबुलचें हृदय तृप्त झालें होतें. आधींच विद्यार्थीदशा म्हणजे बाळपणींच्या सुखी काळाचीच दुसरी आवृत्ति ! नि त्यांत आज बुलबुलला मिळालें तसें भरघोस यश परीक्षेंत मिळालें कीं, त्या धुंद, तृप्त मनःस्थितीचा आनंद कांहीं न्याराच असतो !

बुलबुल अशाच निर्व्याज आनंदांत होती. पण एकदम गंभीर होत ती म्हणाली, “आई, बाबा, मी लग्नबिग्न करणार नाहीं हं इतक्यांत. मला खूप खूप शिकायचंय. अगदीं विलायतेला जायचंय्—”

“विलायतेला ?” उमाबाई चपापून उद्गारल्या, “पण बाळ, इतका पैसा कुठून ग आणायचा आपण ? मध्यमस्थितींतल्या माणसांना—”

“छेः, आई,” बुलबुल आर्जवी स्वरांत म्हणाली, “बाबांवर मी एवढा भार कसा घालीन ? मला कळत का नाहीं हें ? पण आमच्या प्रिन्सिपलबाई मला आज म्हणाल्या कीं, जर मॅट्रिकमध्यें मीं असंच यश मिळविलं तर

कॉलेजांत मला स्कॉलर्शिप मिळेल नि फर्स्टक्लास मिळवून जर मीं बी. ए. झालें तर विद्यार्थी साहाय्यक फंडांतून व परदेशीं शिक्षणाला जाण्यासाठीं मदत करणाऱ्या ज्या संस्था आहेत त्यांतून मला स्कॉलर्शिप किंवा कर्जाऊ रक्कम मिळूं शकेल. अन् बाबा, कॉलेजांत जर मीं स्कॉलर्शिप मिळविली तर माझे फीचे पैसे वांचतील ते तुम्ही मला विलायतेच्या वारीसाठीं मदत म्हणून द्याल ना ?"

"वाः अवश्य ! पण बुलबुल, विलायतेला काय शिकायला जाणार आहेस तूं ?"

"गणितविषयाची रँग्लर होणार आहें मीं, बाबा—सीनियर रँग्लर !"

"ओहो ऽ !" शंकरराव कौतुकानें उद्गारले, "म्हणजे बुलबुल, अगदीं सगळा व्यवस्थित विचार करून ठेवला आहेस तर ! रँग्लर ! छान ! बुलबुल, भारतांत अद्यापि कोणी हिंदु स्त्री रँग्लर झाल्याचं ऐकिवांत नाहीं बुवा ! रँग्लर बुलबुल ! वाः ! पोरी, खुशाल हो बरं रँग्लर. अन् हें बघ, तुझ्या प्रिन्सिपल-बाईनीं सांगितल्याप्रमाणें आपण तुझ्यासाठीं शिक्षणसंस्थांतून मदत तर मिळवूंच पण माझ्याकडे जी थोडीफार शिल्लक आहे ती सर्वच्या सर्व तुझ्या नि चंदूच्या शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च करायला तयार आहें मी."

"अगबाई ! अन् मग म्हातारपणीं काय करायचं आपण ?" व्यवहारी उमाबाईनीं विचारलें.

"तें कां ? बुलबुल नि चंदू ह्या दोन प्रॉमिसरी नोटा आहेत आपल्या—" शंकरराव म्हणाले.

"तें खरं ! पण त्यांतली ही थोरली नोट आपला घेणेकरी घेऊन जाईल कीं मागेंपुढें केव्हांतरी—"

"मग छानच होईल ! 'ज्याची होती त्यानें नेली" असं म्हणून कन्यादान करूं आपण आनंदानें. नि आपली छोटी प्रॉमिसरी नोट आहे, ती सांभाळील आपल्याला म्हातारपणीं—"

"चंदू होय ?" उमाबाईनीं प्रश्न केला व शंकररावांनीं होकार देतांच त्या म्हणाल्या, "त्याचं शिक्षण पुरं होऊन तो मिळवता व्हायला पुष्कऽळ अवकाश आहे—"

शंकररावांच्या गुडघ्यावर हात ठेवीत बुलबुल गोड, लाघवी आवाजांत म्हणाली, " बाबा, मला लग्नच करायचं नाहीं. चंदूप्रमाणें मीहि तुम्हां दोघांचा म्हातारपणीं संभाळ करीन मोठ्या आवडीनें !— "

तिचे हे शब्द ऐकून शंकररावांनीं मोठ्या प्रेमानें तिच्या मस्तकावर आपला उजवा हात ठेवीत म्हटलें, " बुलबुल, लग्न कर अशी मी तुला सक्ति करणार नाहीं त्याप्रमाणें लग्न करूं नको अशीहि सक्ति करणार नाहीं ! ज्या योगानें तुला खरं सुख, खरा आनंद लाभेल तेंच तूं कर—तुझ्या सुखानें मी आणि तुझी आई आनंदित होऊं. समजलीस बाळ ? "

बोलतां बोलतां शंकररावांचा कंठ सद्गदित झाला—बुलबुलचे डोळे पाण्यानें भरले व उमाबाईच्या गालांवरून आंसवें ओघळलीं !

त्या तिघांच्या भावभावनाच इतक्या एकरूप होत्या !

हळूच आपले डोळे पुशीत व उमाबाईकडे पाहून हंसत बुलबुल म्हणाली, " खरंच, बाबा, चंदूला मॅट्रिक झाल्यावर कसला कोर्स द्यायचं ठरवलंय् तुम्हीं ? "

" त्या बेट्याला कसलं तरी धंदेशिक्षणच द्यायला हवं—कारण त्यांतच त्याची बुद्धि चांगली चालणार ! अरेच्चा ! हा आलाच चंदू ! "

" चंदू, तुला शंभर वर्षं आयुष्य आहे हं. आत्तां तुझं नांव घेतलं नि तूं आलास— " बुलबुल म्हणाली.

" होय का ? नि ताई, शंभर वर्षांचं आयुष्य चालेल बुवा आपल्याला;— म्हणजे तितके अधिक शोध लावायला सांपडेल मला ! " चंदू हंसत हंसत बोलला.

तो आतां तेरा वर्षांचा होता, इंग्रजी पांचवी शिकत होता नि बुलबुलपेक्षां चांगला अर्धा इंच उंच झाला होता तरी त्याचा पोरकटपणा कायमच होता.

आतां आपला उजवा तळहात शंकररावांच्या पुढें करीत त्यानें म्हटलें, " बाबा, हें काय आहे तें ओळखतां येतंय् का तुम्हांला ? "

चंदूच्या तळहातावर काळसर पिवळ्या रंगाचा एक लिबलिबीत गोळा होता.

कुतूहलानें त्या गोळ्याचें निरीक्षण करीत शंकरराव उत्तरले, " हरलों बुवा मी !—चंदू, आपल्याला नाहीं हा पदार्थ ओळखूं येत. "

"नाहीं?" जराहि निराश न होतां चंदू म्हणाला, "ताई, तुला ग? नाहीं? साबण आहे हा!—नि तो मीं स्वतः बनवलाय्."

"अस्सं? अरे वाः वाः!" शंकरराव.

"खरं रे चंद्या?" उमाबाई.

"अय्या! चंदू, कधीं केलास रे हा प्रयोग?" बुलबुल.

"ताईसाहेब, आपण आपल्या परीक्षेच्या यशांतच दंग होतां ना सकाळपासून? त्यामुळें आपल्याला पत्ताहि लागला नाहीं माझ्या प्रयोगाचा."

"हं, हं!—सकाळपासून ह्या उद्योगांत होतास होय तूं? तरीच तुझी नि चंबूची जाग नव्हती विशेषशी!—" उमाबाई म्हणाल्या.

"आई ग, कपडे धुवायला किती झक्कास साबण आहे हा! ऐसा गरगरीत फेस येतो म्हणून सांगूं?" चंदू उत्साहानें सांगूं लागला. तेवढ्यांत बुलबुल चेष्टेनें म्हणाली, "चंद्रोबा, साबणाच्या ह्या रंगावरून खरं म्हणजे, तो लावल्यानें कपडे अधिक मळतील कीं अधिक उजळतील ह्याची शंकाच वाटतेय् बाबा!"

पण आपल्या नैसर्गिक खिलाडू स्वभावामुळें ह्यावर जराहि नाराज न होतां चंदू अभिमानानें उत्तरला, "तर तर! एकदां लाऊन तरी बघ तुझ्या कपड्यांना नि मग बोल."

चंदूचे हे शब्द ऐकून सर्वांनांच गंमत वाटली. व इतक्या हुरुपानें चंदू स्वतःची ती कृति दाखवीत असतांना आपण त्यांची चेष्टा करायला नको होती असा पश्चात्ताप बुलबुलला वाटल्यामुळें ती म्हणाली, "पण चंदू हा साबण दिसायला अंमळ कसासाच दिसतो नाहीं कां?"

"होय ग—" चंदू उत्तरला, "नि ज्या कृतीवरून मीं तो केला ती कृतीच माझ्या मतें थोडी चुकलीय्. तेल व कॉस्टिक पोटॅश ह्या दोन्हींचं त्यांत लिहिलेलं प्रमाण बरोबर नाहीं असं मला वाटलं. नि म्हणून माझ्या कल्पनेप्रमाणें मीं त्यांत फरक करून हा दुसरा साबण बनवलाय! हा बघ, कसा वाटतो तें."

अन् मघांपासून मागें दडविलेल्या आपल्या डाव्या हाताची मूठ चंदूनें उघडून दाखविली.

२९९५१ पा. वा 2739 3/01/51

आणि खरंच, त्याच्या डाव्या मुठींत मघांच्या नमुन्यापेक्षां पुष्कळच सरस असा पिवळट रंगाचा घट्टसा गोळा होता !

"काय? तूंच केलास हा चंदू ?" शंकररावांनीं विस्मयानें विचारलें.

"होय बाबा, मींच केला. त्यांत रंग व वास घातला कीं तो अंगालासुद्धां लावतां येईल! नि ताई, ह्याचा गुण बघायचाय का तुला? थांब, दाखवतों हं. मीं आत्तांच चंबूला हा साबण लावून आंघोळ घातलीय्. जरा बघ तरी त्याला. चंबू ऽ, ए ऽ चंबू ऽ ऽ" चंदूनें हांका मारल्या.

व पहिल्याच हांकेसरशीं आपलें ओलें अंग व कान झटकीत चंबू तिथें हजर झाला. बुलबुल-चंदूप्रमाणें चंबूहि आतां मोठा झाला होता. नि नुकतीच आंघोळ झाल्यामुळें तो सुरेखच दिसत होता.

"अरे वाः! छानच स्वच्छ दिसतोय हं, चंबू—म्हटलं आई, आतां आपल्याला साबण विकत घ्यायलाच नको!" बुलबुल हंसत म्हणाली.

"पण ताई, त्यांत रंग व वास घालणं मला नीटसं जमेल कीं नाहीं कोण जाणे? तेव्हां अंगाला तो लावायला नाहीं आवडायचं तुम्हांला—पण कपडे धुवायला कांहीं हरकत नाहीं."

"अन् अंगाला तरी काय हरकत आहे रे? हा चंबू बघ कीं कसा पांढरा-शुभ्र दिसतोय! मग मीं तो लावल्यानें माझा हा सावळा वर्णहि जर असा शुभ्र झाला तर गंमतच होईल!" बुलबुल कौतुकानें म्हणाली.

उमाबाई तिच्याकडे पहात थोडेंसें हंसल्या. त्यांनीं ओळखलें कीं, आपल्या उतावीळ स्वभावानुसार बुलबुलनें मघां फटकन् चंदूची मस्करी केली त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न चालला आहे तिचा! आज रात्रीं रोजनिशींत ती आपल्या ह्या चुकीची नोंद करील व त्या चुकीची भरपाई करण्याचा तिनें केलेला प्रयत्न आपल्या लक्षांत आला अशी खालीं टीप घालूं आपण.

रोजनिशी लिहिण्याच्या ह्या उपक्रमामुळें बुलबुलचा तापटपणा व उतावीळ-पणा पुष्कळ कमी झाला होता. व अजुनि ती संवय तिनें चालू ठेवली होती. चंदूलाहि ह्या जानेवारींत उमाबाईनीं रोजनिशी दिली होती. पण तींत व्यवस्थित लिहिणें त्याला मुळींच जमत नव्हतें. त्याऐवजीं आपण रात्रीं

झोंपतांना आईला दिवसाकांठीं घडलेल्या सर्व गोष्टींचा तोंडीं कबुलीजबाब देण्यास त्यानें सुरुवात केली होती. व त्यामुळें उमाबाईंना रोज रात्रीं फार मजेशीर गोष्टी ऐकावयाला मिळत. दर दोनचार दिवशीं चंदूच्या महत्त्वाकांक्षा पालटत. व बहुधा रोज कांहीं तरी नवीन अजब माहिती, ऐकलेली किंवा वाचलेली, तो उमाबाईंना ऐकवी. त्याच्या हातून एकादी वावगी गोष्टहि झालेली असे. पण ती अगदीं मामुली स्वरूपाची!

गेल्या चार वर्षांत उमाबाईंना कधींहि स्वतःच्या हातावर मारून घेण्याचा प्रसंग दोघांहि मुलांनीं आणला नव्हता, हें उमाबाईंच्या गृहशिक्षणाला केवढें मोठें प्रशस्तिपत्र होतें!

आतां बुलबुलच्या रोजनिशींत चांगला शेरा मारण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें रात्रीं चंदूची तोंडी रोजनिशी ऐकल्यानंतर त्याला मनापासून शाबासकी द्यावयाची हेंहि त्यांनीं ठरविलें. व चंदूबद्दलचें कौतुक अंतःकरणांत न माऊन त्या शंकररावांना म्हणाल्या, "खरंच, चंदूच्या आजवरच्या वेडेबागडे, चुकते-माकते शोध लावण्याच्या छंदांतून आज हा किती छान प्रयोग केलाय् नाहीं त्यानें?"

"होय तर!" शंकरराव मनापासून म्हणाले, "चंदू, बुलबुलच्या परीक्षेंतील यशाबद्दल मला जेवढा आनंद व कौतुक वाटलं तेवढाच आनंद, तेवढंच कौतुक तुझा हा साबण पाहून मला वाटतंय्! शाबास, चंदू! एकूण तूंहि आपल्या आयुष्याचं ध्येय आज निश्चित केलंस असं म्हणायला हरकत नाहीं! पुढें तूं चांगला संशोधक होशील अशी खात्री झाली आतां माझी! चंदू, बेटा, प्रयत्नांत कसूर करूं नकोस. अशीच उमेद धर म्हणजे तूं खास उत्तम संशोधक होशील! माझा अंतःकरणापासून आशीर्वाद आहे तुला! आणि बरं का रे चंदू, आपली ही बुलबुल पुढें रँग्लर होणार आहे"

"रँग्लर! अरे बापरे!" सादर विस्मय प्रदर्शवीत चंदू उद्गारला.

"संशोधक? अग बाई!" त्याचें अनुकरण करीत बुलबुल उद्गारली व हंसत हंसत दोघें चंबूसह आपल्या खोलींत गेलीं.

आणि आपल्या आरामखुर्चीत बसल्य[illegible] [illegible]सुखस्वप्न

BVBK-0404561

पाहूं लागले. पी. अँड ओ. च्या आगबोटींतून बुलबुल विलायतेला चालली आहे. आपण सगळींजणं तिला पोंचवायला बंदरावर गेलों आहोंत. तिचा विरह आपल्याला जाणवतो आहे—पण—ती पहा, त्या विलायतेहून येणाऱ्या आगबोटींतून रँग्लर बुलबुल परत येते आहे. बंदरावर लोकांनीं केलेलें तिचें स्वागत, हार, तुरे—वर्तमानपत्रांतून छापून आलेले तिचे फोटो—रँग्लरची पदवी हातांत घेतलेली, गाऊन व टोपी घातलेली बुलबुल—रँग्लर बुलबुल !...

अन् हा चंदू—स्वतःच्या छोट्याशा प्रयोगशाळेंत मोठाले अजब शोध लावून मातृभूमीचें ऋण फेडणारा चंदू !

शर्टाच्या अस्तन्या वर चढवून व अंगांत 'एप्रन्' घालून आपल्या प्रयोगशाळेंत रात्रंदिवस रमणारा संशोधक !—संशोधक चंदू !...

अहाहा !—उघड्या डोळ्यांनीं हीं गोड दिवास्वप्नें पहातां पहातां शंकररावांनीं समाधानाचा निश्वास सोडला !

त्यांचीं हीं दिवास्वप्नें खात्रीनें सत्य होणार !—दोघंहि मुलं आपापलीं ध्येयें गांठणार ह्यांत शंकाच नव्हती ! मात्र त्याला योग्य कालावधि लागणें अपरिहार्य होतें ! पण आज शंकररावांच्या मनाला पुष्कळच विश्वास वाटत होता,—चांगलाच धीर आला होता ! त्यामुळें बुलबुलची रँग्लर बुलबुल व चंदूचा संशोधक चंदू होण्याची ते शांत चित्तानें वाट पहाणार होते !

आणि शंकररावांनीं पुन्हा एकदां समाधानाचा—तृप्ततेचा निश्वास सोडला !

व गेलीं अठरा वर्षें शंकररावांच्या सुखदुःखाची वांटेकरीण असलेल्या उमाबाईंना त्यांच्या हृदयांतील हरेक भावना, त्यांच्या चित्तांतील प्रत्येक विचार न सांगतांहि कळून येत असल्यामुळेंच कीं काय, जणुं आपणसुद्धां हीं गोड दिवास्वप्नें आतां पाहिलीं असल्यासारखा उमाबाईंनींहि समाधानाचा—तृप्ततेचा निश्वास सोडला.

व तीं दोघें एकमेकांकडे पाहून आनंदानें, तृप्ततेनें हंसलीं !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा. क्र. ...७१९६१
वि. ...